CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, ११ जुलै २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक २२३ | पाने १२ | किंमत रु. ८/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



मानवबंधुता जगाला ज्ञात असलेल्या इतिहासाच्या पूर्वकाळापासूनच हिंदू पूर्वजांनी मानव समुदायाला अभंग, अविभाजित मानले. व्यावहारिक जगात वावरणाऱ्या लोकांनी पाहिले की मानवाच्या ऐहिक जीवनात विविधता आहे. तरीही त्यांनी मानवतेला एकात्म, अविभक्तच मानले. सर्वांना या भूमीचे पुत्र मानले. अखिल विश्वाला मानवाने आपले घरटे मानले.

**- स्व. रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

## चाकणकर मानहानी खटल्यात नोटीस

**नवी दिल्ली :** महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी दाखल केलेल्या मानहानीच्या खटल्यात दिल्ली उच्च न्यायालयाने सुषमा अंधारे, अंजली दमानिया, रुपाली ठोंबरे, आशा मिरगे यांच्यासह एकूण २६ प्रतिवादींना नोटीस बजावत उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले. या प्रकरणाची पुढील सुनावणी २३ जुलै रोजी होणार आहे. अशोक खरात प्रकरणानंतर आपली नियोजनबद्ध बदनामी करण्यात आल्याचा आरोप करत चाकणकर यांनी काही महिला, माध्यम संस्था आदींविरोधात दिल्ली उच्च न्यायालयात मानहानीचा दावा दाखल केला आहे.

# राज्यात 'एटीएस'ची छापेमारी

**| १०२ ठिकाणी कारवाई | १११ जण ताब्यात | डिजिटल उपकरणे जप्त | सीमापार नेटवर्कचा भंडाफोड**




मुंबईच्या जोगेश्वरी भागात एका घरावर टाकलेल्या छाप्यावेळी बंदोबस्तासाठी तैनात असलेले निमलष्करी दलाचे पथक

**मुंबई, १० जुलै**

पाकिस्तानात लपून असलेला आणि पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयच्या इशाऱ्यावर भारतात हिंसा घडवण्याचा कट आखणारा कुख्यात गुन्हेगार शहजाद भट्टीच्या संपर्कात असलेल्या महाराष्ट्रातील १११ पेक्षा अधिक जणांना राज्य दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) ताब्यात घेतले. गुरुवारी रात्री ते शुक्रवार सकाळपर्यंत एटीएसच्या ५८ पथकांनी विविध जिल्ह्यात १०२ ठिकाणी छापे टाकले आणि भट्टीच्या मददगारांच्या मुसक्या आवळत सीमापार नेटवर्कचा भंडाफोड केला.

देशाची अंतर्गत सुरक्षा आणि अखंडतेला लक्ष्य करण्यासाठी भट्टीचे समर्थक राज्यात सक्रिय असल्याची माहिती गोपनीय माहिती एटीएसला मिळाली त्याआधारे गुरुवारी रात्रभर धाडसत्र राबवण्यात आले. मुंबई, सांगली, सातारा, मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर आणि विदर्भात १०२ पेक्षा अधिक ठिकाणी छापे टाकण्यात आले. यावेळी संशयाच्या आधारे १११ हून अधिक जणांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. त्यांच्यावर अद्याप गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. एटीएस पथकाने सर्व संशयितांचे मोबाईल फोन जप्त केले असून त्यांच्या समाज माध्यम खात्याची (व्हॉट्सअॅप, इन्स्टाग्राम ) माहिती गोळा केली. याशिवाय कॉल डिटेल रेकॉर्ड तसेच, इतर डिजिटल माहिती फॉरेन्सिक तपासणीसाठी दिली आहे. (वृत्तसंस्था)

## विदर्भातील १० युवक एटीएसच्या ताब्यात

### मोबाईल, चॅट व डिजिटल व्यवहारांची चौकशी

**नागपूर, १० जुलै**

पाकिस्तानातील कुख्यात गँगस्टर आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर शहजाद भट्टी याच्याशी संपर्क असल्याच्या संशयावरून महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाच्या (एटीएस) नागपूर युनिटने विदर्भातील सहा जिल्ह्यांतील १० युवकांना ताब्यात घेतले आहे. नागपूर परिक्षेत्रातील नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, वर्धा आणि यवतमाळ या सहा जिल्ह्यांत एकाचवेळी ही कारवाई करण्यात आली.

ताब्यात घेतलेल्या युवकांचे मोबाईल फोन, सोशल मीडिया अकाऊंट, चॅट, कॉल रेकॉर्ड तसेच इतर डिजिटल व्यवहारांची बारकाईने तपासणी सुरू केली आहे. प्राथमिक चौकशीत संबंधित युवकांचा संपर्क केवळ सोशल मीडियापुरता मर्यादित होता की त्यांचा एखाद्या संघटित नेटवर्क किंवा संशयास्पद कारवायांशी संबंध आहे, याचा शोध घेतला जात आहे. चौकशीच्या निष्कर्षानंतर पुढील कारवाई केली जाणार आहे. (तभा वृत्तसेवा)

### वर्धेतून एक तर चंद्रपुरातून तिघांना उचलले

नागपूर आणि वर्धा एटीएसच्या पथकाने सकाळी ६ वाजताच्या सुमारास एका व्यक्तीला ताब्यात घेतले. प्राथमिक माहितीनुसार, सदर व्यक्ती देवळी तालुक्यातील असल्याचे विश्वसनीय सुत्रांनी सांगितले. तर चंद्रपूर जिल्ह्यातील दुर्गापूरच्या २ आणि घुग्गूस येथील एकाला एटीएसने ताब्यात घेतले. चौकशीनंतर तिघांनाही सोडून देण्यात आले. मात्र, त्यातील एका संशयिताचा भ्रमणध्वनी तपासणीसाठी जप्त करण्यात आला आहे.

### मुंबईत सहा भागांत कारवाई

राज्यव्यापी शोध मोहिमेअंतर्गत मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कुर्ला, वांद्रे, जोगेश्वरी, मीरा रोड आणि भाईंदर यांसारख्या संवेदनशील भागांमध्ये छापे टाकण्यात आले. मुंबईच्या बाहेर सांगली, सातारा, छत्रपती संभाजीनगर आणि विदर्भात कारवाई करण्यात आली.

### स्लीपर सेल सक्रिय करण्याची योजना

तपास यंत्रणांच्या मते, पाकिस्तानी गुंड शहजाद भट्टी, त्याचे साथीदार आबिद जाट उर्फ आबिद छाल, अजमल गुज्जर, हम्माद मेमन, राणा हुनैन आणि अश्रफ बशीर आलम यांच्या मदतीने भारतात स्लीपर सेल स्थापन करण्याची योजना आखत होता. या टोळीची कार्यपद्धती अत्यंत अत्याधुनिक होती. भट्टी फेसबुक, इंस्टाग्राम, टेलिग्राम आणि व्हॉट्सअप यांसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर बनावट प्रोफाइल तयार करून भारतीय तरुणांना लक्ष्य करत आहे.

### तरुणांना पैशाचे आमिष




भट्टी समाज माध्यम आणि भारतातील समर्थकांच्या मदतीने धार्मिक आणि संवेदनशील मुद्द्यांचा वापर करून तरुणांमध्ये असंतोष निर्माण करणे, हिंसा भडकवण्यासाठी प्रवृत्त करणे आणि बेरोजगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल तरुणांना मोठ्या रकमेचे आमिष दाखवून अमली पदार्थांची तस्करी, अवैध शस्त्रपुरवठा आणि गुप्त माहिती गोळा करणे यांसारखे काम सोपवत असल्याची माहिती तपासातून समोर आली.

# कर्जमाफीसाठीची ५० हजारांची अट रद्द



**योजनेतील नवा बदल; आता दोन लाखांपर्यंत लाभ**

**मुंबई,१० जुलै**

राज्यातील शेतकरी कर्जमाफी योजनेत आमदारांच्या मागणीनंतर मुख्यमंत्र्यांनी मोठा बदल जाहीर केला असून, महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत ज्यांना पन्नास हजार रुपयांपर्यंतच लाभ मिळाला होता, अशा शेतकऱ्यांनाही आता दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली जाणार आहे. यासोबतच सन २०२६-२७ मध्ये कर्ज परतफेडीची अट देखील वगळण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी विधिमंडळात स्पष्ट केले.

विधानसभेतील अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, महायुतीच्या सर्व आमदारांनी आज त्यांची भेट घेऊन पन्नास हजार रुपयांची अट काढून टाकण्याची मागणी केली.

**५६ लाखांवर शेतकऱ्यांना फायदा**

मुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना ही आजवरची सर्वात मोठी योजना आहे. आधीच्या महात्मा ज्योतिराव फुले योजनेत दोन लाख रुपयांवर एक रुपया जरी थकबाकी असेल तरी संबंधित शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहत असे. मात्र नव्या योजनेत दोन लाखांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनाही दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली जाणार आहे. विरोधकांनी या योजनेतून बारा-तेरा हजार कोटी रुपयांचाच लाभ मिळेल आणि ३६ लाख शेतकऱ्यांवर अन्याय होईल, असा आरोप केला होता. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, प्रत्यक्षात ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देणारी ही ऐतिहासिक योजना आहे.

कर्जमाफीचा वारंवार होणारा परिणाम बँकिंग व्यवस्थेवर होत असल्याचे प्रवीण परदेशी समितीने निदर्शनास आणून दिले होते. सातत्याने कर्जमाफी मिळत असल्यास शेतकरी वेळेत परतफेड करण्यास टाळाटाळ करतात, आणि यामुळे बँका अडचणीत येतात, असे निरीक्षण समितीने नोंदवले होते. यासंदर्भात दीर्घकालीन व अल्पकालीन उपाययोजना सुचवण्यात आल्या असून, कर्जमाफी घेतलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा योजनेत समाविष्ट करताना काही रक्कम भरण्याची अट घालण्याची शिफारसही करण्यात आली होती. (तभा वृत्तसेवा)

# ऐतिहासिक १८ तास चालले कामकाज

## नागपूर हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबरला

**मुंबई, १० जुलै**

राज्य विधिमंडळाच्या सन २०२६ च्या द्वितीय म्हणजेच पावसाळी अधिवेशनाचे आज सूप वाजले. २२ जून ते १० जुलै या कालावधीत चाललेल्या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी दोन्ही सभागृहांचे कामकाज आटोपल्यानंतर, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि विधानसभेचे अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर यांनी आपापल्या सदनासमोर कामकाजाची सांख्यिकीय माहिती सादर केली आणि दोन्ही सभागृहे स्थगित करण्यात आल्याची घोषणा केली. राज्याचे आगामी हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबर रोजी नागपूर येथे घेण्याचे यावेळी जाहीर करण्यात आले.

या पावसाळी अधिवेशनातील सर्वात उल्लेखनीय आणि ऐतिहासिक बाब म्हणजे गुरुवार, ९ जुलै २०२६ रोजी विधानसभेची बैठक सकाळी ९:३० वाजता सुरू झाली आणि ती थेट दुसऱ्या दिवशी म्हणजेच शुक्रवार, १० जुलै २०२६ च्या पहाटे ३ वाजून ३९ मिनिटांनी स्थगित झाली. एकाच दिवशी तब्बल १८ तास १० मिनिटे इतके विक्रमी कामकाज पार पडले.

अनेक वर्षांनंतर सभागृहाचे कामकाज एवढ्या उशिरापर्यंत चालले असून, विविध जनहितार्थ विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली, अशी विशेष नोंद विधानसभा अध्यक्षांनी आपल्या भाषणात केली. (तभा वृत्तसेवा)

**विधिमंडळ कामकाजाची ठळक वैशिष्ट्ये**

- सभा आणि परिषदेच्या एकूण १४ बैठका
- विधानसभेत १२७ तास ५४ मिनिटे कामकाज
- परिषदेत १०१ तास १० मिनिटे कामकाज
- सभेत ९,०९५ तारांकित प्रश्न प्राप्त. ४१० स्वीकृत
- विधानसभेत २ हजार ९९८ आणि विधानपरिषदेत ९३० लक्षवेधी सूचना प्राप्त
- विधानसभेत २२ शासकीय विधेयके पुरःस्थापित, २१ संमत
- विधानपरिषदेत ९ विधेयके पुरःस्थापित करून ती संमत
- विधानसभेत सदस्यांची सरासरी उपस्थिती ७५.२६ टक्के
- विधानपरिषदेत सरासरी उपस्थिती ७८.५७ टक्के



## हॉटेल मालकाची स्कुटी - रोख रक्कम घेऊन कामगार पसार

**सोलापूर, दि. १० जुलै -**

हॉटेल मालकाचा विश्वास संपादन करून एका कामगाराने मालकाच्याच स्कुटी आणि रोख रकमेवर डल्ला मारल्याची घटना मार्केट यार्ड परिसरात घडली. याप्रकरणी जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

अबरार बाबू हजरत सय्यद (रा. बेळगाव, कर्नाटक) असे गुन्हा दाखल केलेल्या कामगाराचे नाव आहे. बाबालाल म. इस्माईल सय्यद (रा. शास्त्री नगर , सोलापूर)यांनी फिर्याद दिली आहे . फिर्यादीचे मार्केट यार्ड येथे हॉटेल आहे. त्यांच्याकडे काम करणाऱ्या आरोपी कामगाराने विश्वासाचा गैरफायदा घेतला. ८ जुलै २०२६ रोजी सकाळी ९ च्या सुमारास हॉटेलचे सामान आणण्यासाठी फिर्यादीने त्याला बर्गमन स्कुटी (क्र. एमएच १३ ई झेड ७८६२) आणि ४० हजार रुपये रोख देऊन पाठवले होते. मात्र, सामान आणण्याऐवजी आरोपीने स्कुटी आणि रोख रक्कम घेऊन पलायन केले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच फिर्यादीने पोलिसांत धाव येऊन तक्रार दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा तपास हवालदार मस्के हे करत आहेत.

# आजपासून मधुमेह, हृदयरोगावरील गोळ्या मिळणार स्वस्त

### आरोग्यावरील खर्च कमी करण्याच्या दिशेने केंद्र सरकारने महत्त्वाचे पाऊल

**नवी दिल्ली, १० जुलै**

आरोग्यसेवेवर होणारा खर्च कमी करण्याच्या दिशेने केंद्र सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. राष्ट्रीय औषध किंमत निर्धारण प्राधिकरणाने (एनपीपीए) ३९ अत्यावश्यक औषधांच्या किमती निश्चित केल्या आहेत. या निर्णयामुळे रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, संसर्ग आणि इतर गंभीर आजारांवरील अनेक औषधे कमी किंमतीत उपलब्ध होणार आहेत. सरकारच्या या निर्णयाचा फायदा लाखो रुग्णांना होणार असून औषधांच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल.



नवीन दर निश्चित करण्यात आलेल्या औषधांमध्ये रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, कोलेस्टेरॉल, संसर्ग, डोळ्यांचे आजार आणि व्हिटॅमिन डी यांसह विविध औषधांचा समावेश आहे. यामध्ये प्रामुख्याने उच्च रक्तदाबावरील औषधे, मधुमेहावरील औषधे, हृदयविकारावरील औषधे, कोलेस्टेरॉल कमी करणारी औषधे, अँटिबायोटिक्स, डोळ्यांसाठी वापरली जाणारी औषधे, व्हिटॅमिन डी पूरक औषधांचा समावेश आहे. तसेच काही विशेष इंजेक्शन्स आणि ओरल सोल्यूशन्स फार्मा कंपन्यांसाठी कडक नियम करण्यात आले आहे. कोणतीही औषध उत्पादक कंपनी किंवा विक्रेता सरकारने निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त किंमत आकारू शकणार नाही, असेही एनपीपीएने स्पष्ट केले आहे. (वृत्तसंस्था

### काय आहेत नवीन नियम?

सर्व औषध विक्रेते आणि वितरकांनी दुकानात औषधांच्या किमतींची यादी ठळकपणे प्रदर्शित करणे बंधनकारक असेल. ग्राहकांना किंमती सहज पाहता याव्यात यासाठी ही यादी दुकानाच्या दर्शनी भागात लावावी लागेल. निश्चित दरापेक्षा जास्त किंमत आकारल्यास संबंधित कंपनीविरुद्ध कारवाई केली जाईल. जर एखाद्या कंपनीने सरकारने निश्चित केलेल्या किमतीपेक्षा जास्त रक्कम आकारली, तर आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत त्या अतिरिक्त रकमेची व्याजासह वसुली करून ती सरकारी तिजोरीत जमा केली जाणार आहे.

**उच्च रक्तदाबाच्या गोळ्या** - १२.०३ ते १९.५३ रुपये प्रती गोळी

**हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी विकार** - ३.६७ ते २१.४० रुपये प्रती गोळी

**मधुमेहाच्या गोळया** - १९.३० ते १३.२७ रुपये प्रती गोळी

**कर्करोग उपचारातील इमॅटिनिब ओरल सोल्युशन** : ५९.६१ रुपये प्रति मिली



# पंढरपूर तालुक्यात कालव्याचे पाणी बांधावर

## आ. समाधान आवताडे यांच्या पाठपुराव्याला यश; भीमा नदीकाठच्या शेतकऱ्यांना मिळणार पाच तास वीजपुरवठा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १० जुलै-**

पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पाणीटंचाईच्या प्रश्नावर आमदार समाधान आवताडे यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. निरा भाटघर उजवा कालवाद्वारे पंढरपूर तालुक्यातील लाभक्षेत्रात तात्काळ पाणी सोडण्यास सुरुवात झाली आहे. तसेच भीमा नदीकाठच्या शेतकऱ्यांसाठीही वीजपुरवठा पाच तास वाढवण्यात आला आहे.

आमदार आवताडे यांच्या मागणीची पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी तात्काळ दखल घेतली. जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिल्याने आजपासून त्याच्या अंमलबजावणस प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. परिणामी बांधावर पाणी येणार असल्याने शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. वीर धरण परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे निरा भाटघर धरणातील पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली आहे. सुमारे ६ हजार क्युसेक पाणी निरा नदीत सोडले आहे. हे पाणी निरा नरसिंगपूरमार्गे भीमा नदीत मिसळून पुढे कर्नाटकाच्या दिशेने वाहून जाणार असल्याने त्याचा लाभ स्थानिक शेतकऱ्यांना मिळावा, अशी मागणी आ. आवताडे यांनी केली होती. पंढरपूर तालुक्यात अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. भीमा नदीकाठच्या शेतकऱ्यांना दोन तास वीजपुरवठा मिळत असल्याने नदीतील पाणी उचलणे शक्य नाही. परिणामी पिण्याचे पाणी, जनावरांच्या पाण्याचा प्रश्न आणि शेतीचे सिंचन अधिक गंभीर बनले आहे. नदीतील पाण्याचा उपयोग करण्यासाठी किमान ८ तास वीजपुरवठा देणे आवश्यक आहे. तसेच वीर धरणातील वाढता पाणीसाठा लक्षात घेऊन पंढरपूर तालुक्यातील लाभक्षेत्रातील गावांसाठी एनआरबीसी कालव्याद्वारे तात्काळ पाणी सोडण्याची मागणीही त्यांनी केली होती.

**सिंचनासह पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न मार्गी**

मागणीची दखल घेत पालकमंत्र्यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले. पालकमंत्र्यांच्या आदेशावर जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाईचे आदेश काढल्याने कालव्याचे पाणी शेतकऱ्यांच्या बांधावर पोचले आहे. परिणामी खरीप हंगामातील पिकांना पाणी मिळणार आहे. शेतीसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही काही प्रमाणात मार्गी लागणार आहे.

## महत्वाचे...



### मेहता प्रशालेत विवेक स्पर्श व्याख्यान

**सोलापूर, दि. १० जुलै-**

कै. विलासचंद्र मोतीचंद मेहता माध्यमिक प्रशाला, जुळे सोलापूर येथे स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा जागर विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने 'विवेक स्पर्श : छोट्यांच्या गोष्टीतले विवेकानंद' या विषयावरील प्रेरणादायी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे महानगर उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास भंडारी हे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते. प्रा. भंडारी यांनी स्वामी विवेकानंदांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग सांगत विद्यार्थ्यांमध्ये निर्भयता, आत्मविश्वास, चारित्र्य, सत्यनिष्ठा व कर्तव्यभावना विकसित होण्याची गरज अधोरेखित केली. बल हेच जीवन हा विवेकानंदांचा संदेश युवकांनी आत्मसात करावा, कोणत्याही संकटाला धैर्याने सामोरे जावे तसेच अपयशावर मात करून ध्येयप्राप्तीसाठी एकाग्रतेने प्रयत्न करावेत, असे त्यांनी सांगितले. आरोग्याचे महत्त्व, स्वावलंबन घडविणारे शिक्षण आणि राष्ट्रसेवेची भावना यांवरही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी श्रेयस हिप्परगे यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्याचा आढावा सादर केला. तसेच उमेश दादा व रितिका ठुबे यांनीही उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. प्रास्ताविक मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांनी केले. सूत्रसंचालन निलेश व्यवहारे यांनी तर आभार नामदेव गावडे यांनी मानले.

### करमाळा मतदार संघातील शेती पंपासाठी आठ तास वीजपुरवठा करण्याची मागणी

**जेऊर, दि.१० जुलै-**



करमाळा मतदार संघातील शेतकऱ्यांची सध्या वीजेच्या प्रश्नाबाबत नाराजी असल्याचे लक्षात आणुन देऊन शेती पंपासाठी आठ तास वीजपुरवठा दिला जावा अशी मागणी आमदार नारायण पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे केली आहे. राज्याचे पावसाळी अधिवेशन चालू असून आमदार पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानभवन पॅसेज मध्ये भेट घेतली व निवेदन सादर केले. तसेच करमाळा मतदार संघातील वीजेच्या प्रश्नाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समोर शेतकऱ्यांना येत असलेल्या अडचणी सांगितल्या. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन तशा सूचना संबंधित विभागास देण्यात येत असल्याचे सांगितले. या निवेदनात आमदार नारायण आबा पाटील यांनी नमुद केले आहे की करमाळा तालुक्यातील उजनी, भीमा सीना जोडकालवा, सीना कोळगाव, मांगी तलाव तसेच विहिर व कुपनलिका आदी पाणी उपलब्ध असलेल्या ठिकाणी वीजेची कपात झाल्याने केळी, ऊस, डाळींब आदी नगदी पिके जळून चालली आहेत. यामुळे शेतकऱ्यांना करोडो रुपयांचे नुकसान सोसावे लागणार आहे. उजनीत येणाऱ्या पाण्याचा विसर्ग वाढला असला तरी वीजे अभावी पिकांना पाणी देता येत नाही. करमाळा मतदार संघातील अनेक भागात पावसाने दडी मारल्याने दुध संकलनावर याचा गंभीर परिणाम झाला आहे. शेती पंपाशिवाय घरगुती वीजपुरवठा खंडित झाल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासापासून वंचित रहावे लागत आहे. उजनील पाणी साठा मायनस झाल्याने पिण्याचे पाणी राखुन ठेवण्यासाठी वीज कपात केली गेली होती. परंतु आता उजनी पातळी प्लस मध्ये आल्याने तात्काळ शेतकऱ्यांना आठ तास वीज द्यावी, अशी मागणी आ. पाटील यांनी केली आहे.

### मोबाईल पळिवताना अडविल्याने तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. १० जुलै-**

मोबाईल घेऊन पळून जाणाऱ्याला आडविणाऱ्या एका तरुणाला तिघांनि मिळून हातातील कडा व लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना फॉरेस्ट येथील चांदणी चौकात अमन हॉटेल मागे गुरुवारी रात्री आठ वाजता घडली. अक्षय गणेश रास्ते (वय ३३ वर्ष ,रा . बुधवार पेठ सोलापूर) असे त्या मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे . तो गुरुवारी रात्री आठ वाजता चांदणी चौकातून जात असताना त्याचा मोबाईल घेऊन एकटा पळून जात होता .त्याला त्याने अडविण्याचा प्रयत्न केला असता त्याला शैलेश विनोद गायकवाड व इतर दोन जणांनी मिळून हातातील कडा व लाथाबुक्याने मारहाण केली. डोळ्याला जखम व सर्व अंगाला मुका मार लागल्याने तो उपचारा करता येथील शासकीय रुग्णालयात रात्री अकरा वाजता स्वतः दाखल झाला.

## निधन वृत्त...

### श्रीनिवास सोमाणी

**सोलापूर, दि. १० जुलै-**



माहेश्वरी प्रगती मंडलचे भूतपूर्व अध्यक्ष, मार्केट यार्डातील प्रसिद्ध व्यापारी श्रीनिवास गोविंदलाल सोमाणी यांचे (वय ७५) दि. १० जुलै रोजी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा शनिवार, दि. ११ जुलै रोजी सकाळी ११ वाजता त्यांच्या राहत्या घर जोडभावी पेठ येथून निघेल त्यांच्या पश्चात भाऊ, दोन मुलं, दोन मुली, सुन, नातवंड असा परिवार आहे.

### मुकंद सोमाणी

**बार्शी, दि. १० जुलै-**



शहरातील प्रसिध्द व्यावसायिक मुकंद रामचंद्र सोमाणी यांचे हृदय विकाराच्या झटक्याने राजस्थानमध्ये निधन झाले. प्रसिध्द डाळ कारखानदार रामचंद्र सोमाणी यांचे ते जेष्ठ सुपुत्र होते.

## श्री स्वामी समर्थ मंडळातर्फे सागरा प्राण तळमळला नाट्य अभिवाचन



**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. १० जुलै-**

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी दि. ८ जुलै १९१० रोजी जहाजातून उडी मारून फ्रान्सचा किनारा गाठला. त्याचे स्मरण म्हणून ८ जुलै २०२६ रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना अभिवादन करण्यासाठी श्री स्वामी समर्थ मंडळाने मधुसूदन कालेलकर लिखित 'सागरा प्राण तळमळला' नाटकाच्या अभिवाचनाचा शुभारंभ केला.

भारतीय संस्कृती संवर्धक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मोतीबाग कार्यालयात नाट्य अभिवाचन सुधीर मोघे, अनुपमा कुलकर्णी, प्रियांका अभ्यंकर, प्रदीप बर्गे, प्रदीप रत्नपारखी, राजीव कुलकर्णी, लक्ष्मण दाते, संदीप नगरकर, निलेश दातार या कलाकारांनी सादर केले. याची संकल्पना डॉ. शिरीष ठाकूर यांची होती. सूत्र संचलन प्रियांका अभ्यंकर यांनी केले. दिग्दर्शन अनुपमा कुलकर्णी यांनी केले. संगीत संयोजन अनुपमा कुलकर्णी, प्रसाद घोटवडेकर, ध्वनी हरीश ढोकळे आणि चित्रीकरण सहाय्य हर्षद लिमये यांनी केले.

यावेळी उपस्थित नाट्य कलावंतांचा भारतीय संस्कृती संवर्धक मंडळाचे विश्वस्त बाजीराव मणेरे आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक भाऊराव क्षीरसागर यांच्या हस्ते भारतमातेची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. संस्थेचे संजय गिरे,महेश गोडबोले यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे जास्तीत जास्त प्रयोग व्हावेत अशी इच्छा नाट्य कलाकारांनी यावेळी व्यक्त केली.

## श्रीपूर परिसरातील केळी पिके धोक्यात

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १० जुलै-**



श्रीपूर व परिसरात अद्याप कसलाच पाऊस न पडल्याने पिके धोक्यात आली आहेत. जूनच्या पहिल्या आठवड्यात चालू होणाऱ्या पावसाळ्यात निम्मा जुलै महिना संपला तरी या परिसरात कसलाच पाऊस पडला नाही. परिणामी ऊस व केळी पिके पावसाअभावी वाळून जाण्याची स्थिती उद्भवली आहे.

गतवर्षी शासनाने उजनी व वीर धरणाचे पाण्याचे उत्तम नियोजन करत ऐन उन्हाळ्यात मार्च, एप्रिल व मेच्या मध्यापर्यंत कॅनॉलमधून पाणी सोडले होते. कॅनॉलचे पाणी बंद झाल्याबरोबर मे महिन्यात सुमारे ५ इंच (१२५) मि.मी. पाऊस या परिसरात पडल्याने पिके तरली गेली व ओढ्या नाल्यांना पूर आला. विहिरी व बोअरच्या पाण्याची पातळी चांगली वाढली. त्या नंतरही समाधानकारक पाऊस पडल्याने विशेषत: ऊस व केळी ह्या बागायती पिकांना चांगला लाभ झाला. यावेळीही शासनाने मागचेच धोरण राबवित मार्च, एप्रिल व मे महिन्यापर्यंत उजनी कॅनॉलला पाणी सोडले. वीरधरणातून नियमाप्रमाणे पाण्याची आवर्तने सोडली. खरे तर पावसाची आत्ता गरज आहे, नाही तर रानात उभा असलेला ऊस एकतर जनावरांच्या छावण्यांसाठी नाहीतर पाण्या अभावी जळून जाण्याची शक्यता आहे.

याचा फटका जसा शेतकरी वर्गास बसणार आहे तसा कारखान्यासही बसणार आहे. कारखान्यांना पूर्ण क्षमतेने कारखाने चालविणे ही तारेवरची कसरत ठरणार आहे.

**शेतकऱ्यांपुढे दुहेरी संकट**

एक ते दीड महिन्यापूर्वी या परिसरात मोठ्या प्रमाणावर आलेल्या वादळी वाऱ्याने अनेक शेतकऱ्यांच्या केळीच्या बागा व ऊस पिके उद्धस्त झाल्या. शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले. आता कसलाच पाऊस नसल्याने पिकांना धोका निर्माण झाला आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचे चाक नैसर्गिक आपत्तीमुळे रुतल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

### भवानी पेठेत तरुणाची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर, दि. १० जुलै-**

अज्ञात कारणावरून एका ३५ वर्षीय तरुणाने घरातील छताच्या पंख्याला ओढणीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना भवानी पेठ भागातील बसव नगरात आज शुक्रवारी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास उघडकीस आली. दीपक बाळू शिंदे ( वय ३५ वर्ष ,रा . बसवनगर भवानी पेठ सोलापूर ) असे त्या गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे . आज शुक्रवारी सायंकाळी घरात कोणी नसताना दीपक शिंदे यांनी घरातील पत्र्याच्या लाकडीवाशाला स्वतःला गळफास लावून घेतला .ही घटना सायंकाळी उघडकीस आली. सदरची माहिती समजताच जोडभावी पोलीस ठाण्याचे हवलदार एस. आय. जमादार यांनी घटनास्थळी पोहोचून सदरचा मृतदेह इतरांच्या साह्याने खाली उतरवून येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी रात्री आठ वाजता दाखल केला.

## बेकायदा वाळू वाहतूक करणारे ट्रॅक्टर झाले धोकादायक

### अरळी गावातील लहान मुलांचे जीव टांगणीला; पोलिसांचे साफ दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १० जुलै-**

तालुक्यातील अरळी गावात अवैध मुरूम व वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरपासून गावातील बालकाच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे. महसूल प्रशासनाचे याकडे सोयीस्कररित्या दुर्लक्ष होत आहे.

भिमा नदीपात्र नदीपात्र कोरडे पडले. शिवाय पावसाने ओढ दिल्याने नदीपात्रात असलेल्या वाळूचा उपसा विना क्रमांकाच्या वाहनातून मोठ्या प्रमाणात होत आहे. ही वाहने अरळी गावातून कारवाईच्या भीतीने व अधिक पैसे मिळवण्याच्या उद्देशाने भरधाव वेगाने जात असतात. परिणामी गावातील लहान मुलांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या बहुतांश ट्रॅक्टर्सना नंबर प्लेट्सच नाहीत. आरटीओ आणि पोलिसांचे कोणतेही भय नसलेले हे चालक गावातून अत्यंत वेगाने आणि बेजबाबदारपणे गाड्या पळवतात. भरधाव वेगाची घटना सीसीटीव्हीत कैद झाली. नुकतीच देव तारी त्यास कोण मारी या युक्तीप्रमाणे चिमुकल्या मेहविश या बालिकेच्या प्रसंगावधानाने ती मृत्यूपासून बचावली. व्हायरल सीसीटीव्ही फुटेजमध्ये या ट्रॅक्टर चालकांचा बेजबाबदारपणा उघड झाला आहे. सीसीटीव्ही पुराव्याने या विना नंबर प्लेटच्या बेकायदेशीर ट्रॅक्टर्सवर पोलिस, आरटीओ आणि महसूल विभागाने सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तात्काळ कडक कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा अरळी गावातील नागरिकांनी दिला.

**यंत्रणांनी संयुक्त कारवाई करावी**

अरळीत विना नंबर प्लेटची वाहने, बेकायदेशीर वाळू चोरी, मुरूम चोरी व जीवघेणी वाहतूक करणाऱ्यांवर प्रशासनाने तात्काळ कठोर कारवाई करावी. निष्पाप नागरिकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्यांना कोणतीही माफी मिळता कामा नये. भविष्यात अशी घटना पुन्हा घडू नये, यासाठी पोलीस, आरटीओ व महसूल विभागाने संयुक्तपणे त्वरित आणि प्रभावी कारवाई करावी.

**- अमर सोमगोंडे ,माजी तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी**

## वाळू चोरी व सरकारी कामात अडथळा केल्याप्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता

**बार्शी, दि. १० जुलै-**

वैराग पोलीस स्टेशन अंतर्गत भारतीय दंडविधान संहिताचे कलम ३५३, ३७९,५०४,३४ प्रमाणे आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल झाला होता. सदर आरोपी हे मौजे मुंगशी (वा) ता. बार्शी येथील नदीच्या पात्रातील होणाऱ्या अनधिकृत वाळू /गौण खनिज उपसा करुन चोरी करत असताना मंडल अधिकारी तसेच अव्वल कारकुन तहसील यांनी नदी पात्रात वाळू उपसा करणाऱ्या जयसिंह हरीदास क्षीरसागर व दत्तात्रय हरीदास क्षीरसागर यांना अडवुन वाळू उत्खन्न परवानाबाबत विचारपुस केली असता परवाना नसलेचे सांगून त्यांनी अरेरावीची भाषा केली व सदर आरोपी यांना ट्रॅक्टर व ट्रॉली पोलीस स्टेशनला घेवून चला असे सांगितले असता आरोपीने मुद्दाम ट्रॅक्टर बिघडवून सरकारी कर्मचारी यांना अरेरावीची भाषा वापरुन धमकावले व वाळू चोरुन नेल्यामुळे आरोपी विरुद्ध वैराग पोलीस स्टेशन येथे गु र. नं १८८/२०१५ अन्वये भादंवि कलम ३७९, ३५३, ५०४, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. सदर प्रकरणाची सुनावणी बार्शी येथील अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे समोर झाली. सदर प्रकरणी सरकार पक्षातर्फे एकूण ६ साक्षीदार तपासण्यात आले. सरकार पक्षातर्फे तपासलेले साक्षीदार यांचा पुरावा आरोपींना शिक्षा देण्यासाठी पुरेसा नाही व आरोपीविरुद्ध सबळ पुराव्याच्या अभाव असल्याबाबत युक्तिवाद ॲड. एस.एम. गुंड यांनी केला. सदर प्रकरणातील आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरुन सदर आरोपी जयसिंह क्षीरसागर व दत्तात्रय क्षीरसागर यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. साक्षीदार व अनेक बाबींची पडताळणी करुन न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. सदर प्रकरणी यात आरोपीच्यावतीने ॲड. एस एम गुंड व ॲड. व्ही. पी जाधव, ॲड. आर आर घोडके, ॲड. ए. एस.गुंड, ॲड. आर के ननवरे, ॲड. सौरभ विधाते यांनी काम पाहिले.

## यमाईतांडा येथे अवैध गावठी दारू अड्ड्यांवर छापे

### सुमारे लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त; ५ आरोपींवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १० जुलै-**



वैराग पोलिस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथकाने दि. ९ जुलै रोजी यमाईतांडा (ता. बार्शी) येथे येथे अवैध गावठी दारू अड्ड्यांवर एकाचवेळी छापे टाकले. कारवाईत समारे एक लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच ५ जणांवर गुन्हा दाखल केला. विशेष म्हणजे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक अमूल कादबने यांनी पदभार घेतल्यावर आठवडाभरातच हा दणका दिला आहे.

कारवाईत पोलिसांनी हजारो रुपयांचे गुळमिश्रीत रसायन, लोखंडी व प्लास्टिकचे बॅरल जप्त केले आहेत. पोलीस निरीक्षक अमूल कादबने यांच्या आदेशान्वये गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस अंमलदार पोहेकॉ आलाट, पोकॉ ७९७ आकाश पवार आणि पोकॉ राहुल पाटील हे गौडगाव बीट हद्दीत पेट्रोलिंग करत होते. त्यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनूसार दोन पंचांना सोबत घेऊन तातडीने यमाईतांडा येथे धाड टाकली. पोलिसांनी वेगवेगळ्या ठिकाणी टाकलेल्या छाप्यांमध्ये खालील आरोपींना मुद्देमालासह रंगेहात पकडले. सुनील बाबु राठोड (वय ३८) २ बॅरल (३५० लीटर गुळमिश्रीत रसायन) रु. १७,५००/-, संतोष रेवण राठोड (वय ३८) २ बॅरल (२५० लीटर गुळमिश्रीत रसायन) रु. १२,५००/-. संजय रेवण राठोड (वय ३५) २ बॅरल (२५० लीटर गुळमिश्रीत रसायन) रु. १२,५००/, शिवाजी पोमा पवार (वय ५८) २ बॅरल (३५० लीटर गुळमिश्रीत रसायन) रु. १७,५००/-, विकास शिवाजी पवार (वय ४३)२ बॅरल (२५० लीटर गुळमिश्रीत रसायन) रु. १२,५००/- अशी कारवाई केली.

पोलिसांनी पुराव्यासाठी प्रत्येक साठ्यातून १८० मिलीचे नमुने काढून घेतले. उर्वरित रसायन जागीच ओतून नष्ट केले. नवीन पोलीस निरीक्षक अमूल कादबने यांनी पदभार स्वीकारताच अवघ्या आठ दिवसांत अवैध धंद्यांचे कंबरडे मोडणारी ही मोठी कारवाई केल्याने वैराग पोलिसांच्या या धडक कामगिरीचे नागरिकांमधून जोरदार स्वागत होत आहे.

### अकोलेकाटी येथे बंगालच्या तरुणाची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर, दि. १० जुलै-**

अज्ञात कारणावरून एका २३ वर्षीय तरुणाने छताच्या पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील अकोलेकाटी येथे आज शुक्रवारी दुपारी चार वाजता उघडकीस आली. अब्दुल माजीद शेख (वय २३, रा . गोपालनगर, जिल्हा नंदिया, राज्य पश्चिम बंगाल. सध्या रा.अकोलेकाटी ) असे त्या तरुणाचे नाव आहे. अब्दुल हा चिंचोली एमआयडीसी येथील एका फाउंड्रीत काम करण्यास होता . तो विवाहित असून तो आपल्या इतर जोडीदारांसोबत अकोलेकाटी येथील एका खोलीमध्ये राहण्यास होता . आज शुक्रवारी सकाळी सात वाजता नेहमीप्रमाणे त्याचे जोडीदार कामावर निघाले होते . त्यावेळी तो मला बरं वाटत नाही त्यामुळे मी आज कामावर येत नाही असे त्यांनी म्हटले होते . त्यानंतर दुपारी चार वाजता त्याचे चुलते हे त्याच्या रूमवर आले तेव्हा दार बंद होते .आवाज दिला प्रतीउत्तर न आल्याने त्यांनी इतरांना बोलावून दरवाजा तोडला तेव्हा आत अब्दुल हा गळफास घेतलेल्या अवस्थेत त्यांना आढळून आला. त्यांनी इतरांच्या मदतीने गळफास सोडवून त्याला येथील शासकीय रुग्णालयात मित्र तुकाराम चव्हाण यांनी सायंकाळी आठ वाजता दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले .

## गारवाड येथील सुळकी, तुकाईदेवी मंदिरात चोरी

### १९ हजाराचे देवीचे टोप चोरीला

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १० जुलै-**

सोलापूर जिल्ह्यात सर्वात उंच असलेल्या सुळिकआई डोंगरावर असलेल्या सुळकी ,तुकाईदेवीच्या मंदिरात काल रात्री अज्ञात चोरटाने चोरी करून १९ हजाराचे चांदीचे तीन टोप चोरून नेल्याची घटना घडली याबाबत मंदिराचे पुजारी नामदेव बोधला मगर राहणार गारवाड यांच्या तक्रारीवरून आज्ञात चोरट्याविरुद्ध माळशिरस पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे

माळशिरस तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यातील अनेक भाविकांचे सुळकी, तुकाईदेवी मंदिर हे श्रद्धास्थान आहे काल दिंनाक ९ जुलै रोजी सकाळी ८ वा ते सकाळी मंदिरातील पुजारी नामदेव मगर हे पूजा करून अकरा वाजता मंदिराला कुलूप लावून आपल्या घरी गेले होते दिनांक १० जुलै रोजी सकाळी ते मंदिरात साफसफाई व पूजा करण्यासाठी आले असता त्यांना मंदीराचा दरवाजा उघडा दिसला. याबाबत त्यांनी गारवाड गावचे पोलीस पाटील धनाजी राजाराम मगर यांना फोनरुन घडला प्रकार सांगीतला यावेळी मंदिरातील दहा हजारांचा ५० ग्रॅम वजनाचा चांदीचा मुकुट सहा हजाराचा ३० ग्रॅम वजनाचा चांदीचा मुकुट व तीन हजाराचा १५ ग्रॅम वजनाचा मुकुट असा १९ हजारांचा माल चोरीस गेला आहे या चोरीच्या ठिकाणी सोलापूर येथून ठसे तज्ञ व डॉग स्कॉड मागवण्यात आले होते. डॉग स्कॉड फक्त मंदिराच्या भोवतीच फिरून गेले याबाबत माळशिरस पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वाती पवार अधिक तपास करत आहे

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## मद्य तस्करी-अवैध विक्रीप्रकरणी एक लाखांहून अधिक गुन्हे दाखल

राज्याच्या उत्पादन शुल्क विभागाने अवैध मद्यनिर्मिती, विक्री आणि वाहतुकीप्रकरणी २०२३-२४ पासून ते ३० जून २०२६ या कालावधीत तब्बल १ लाख ४८ गुन्हे दाखल केले असून ७२ हजार ६२० जणांना अटक केली आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री तथा राज्य उत्पादन शुल्क मंत्री सुनेत्रा पवार यांनी विधानसभेत एका लेखी उत्तराद्वारे दिली. भाजपचे आमदार अमीत साटम यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना पवार यांनी सांगितले की, या कालावधीत विभागाने सुमारे २८९ कोटी रुपये किमतीचा मद्यसाठा व अन्य साहित्य जप्त केले आहे.

# कर्करोग, न्यूरो उपचारांसाठी विशेष मदत

### रुग्णालयांच्या मनमानी शुल्कावर चाप; आरोग्य मंत्र्यांची माहिती



पावसाळी अधिवेशन

**मुंबई, १० जुलै**

राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आणि परवडणाऱ्या आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी राज्य शासन आरोग्य क्षेत्रात मोठ्या धोरणात्मक सुधारणा करणार असल्याची घोषणा आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज विधानसभेत केली. रुग्णालयांकडून आकारल्या जाणाऱ्या मनमानी शुल्कावर नियंत्रण आणण्यासोबतच कर्करोग, न्यूरो आणि ऑर्थो उपचारांसाठी सर्वसमावेशक पॅकेजेस तयार करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विधानसभा आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मंत्री आबिटकर बोलत होते. रुग्णालयांच्या शुल्क आकारणीवर नियंत्रण आणण्यासाठी 'बॉम्बे नर्सिंग ॲक्ट, महाराष्ट्र नर्सिंग ॲक्ट आणि क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट'मध्ये आवश्यक स्पष्टता



आणण्याचे काम सुरू असल्याचे मंत्री आबिटकर यांनी सांगितले. यामुळे भविष्यात 'राईट टू पेशंट' आणि 'राईट टू हॉस्पिटल' या संकल्पनांना बळकटी मिळेल आणि नागरिकांना माफक दरात दर्जेदार उपचार उपलब्ध होतील, तसेच रुग्णांवर अनावश्यक आर्थिक भार पडणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कर्करोगाचे लवकर निदान व्हावे यासाठी उपचार पॅकेजमध्ये 'पेट स्कॅन'चा समावेश करण्यात येणार आहे. यामुळे रुग्णांचे निदान वेळेत होऊन उपचार लवकर सुरू करता येतील, असे मंत्री आबिटकर यांनी नमूद केले. याशिवाय फॉलो-अप पॅकेजेस आणि निदान प्रक्रिया अधिक सुलभ व प्रभावी करण्यासाठीही सुधारणा करण्यात येणार आहेत. उपचार अपूर्ण राहिल्याने रुग्णांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ नये, यालाही प्राधान्य दिले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. (तभा वृत्तसेवा)

## मुलीला का छेडतो म्हणून विचारल्याने तलवारीने हल्ला; एक जखमी

**सोलापूर, दि.१० जुलै -**

मुलीला का छेडतो म्हणून विचारल्याने एका इसमाला दहा-बारा जणांनी मिळून मारून जखमी केल्याची घटना निराळे वस्ती येथे गुरुवारी संध्याकाळी घडली. हनीफ कालेसाब शेख ( वय ५५, रा.निराळे वस्ती सोलापूर) असे जखमी इसमाचे नाव आहे. गुरुवारी संध्याकाळी साडेसात वाजेच्या सुमारास ते घराजवळ असताना त्यांना प्रथमेश नावाच्या तरुणासह इतर दहा जणांनी मिळून मारहाण केली.

# ग्रामपंचायत निवडणुकांना 'एसआरए'मुळे खो ?

### इच्छुकांच्या मनसुब्यांवर पाणी | २०२७ उजाडण्याची शक्यता



**मुंबई, १० जुलै**

राज्यातील ग्रामीण राजकारणाचा कणा असलेल्या ग्रामपंचायत निवडणुकांसंदर्भात एक मोठी आणि इच्छुकांसाठी धक्कादायक बातमी आहे. प्रभाग रचना आणि आरक्षणाची सर्व प्रक्रिया जवळपास पूर्ण झाली असली तरी, राज्यातील तब्बल १५ हजार ६३६ ग्रामपंचायतींच्या निवडणुका लांबणीवर पडण्याची दाट शक्यता आहे. अनपेक्षितपणे आलेल्या या विलंबामुळे निवडणुकीच्या तयारीला लागलेल्या उमेदवारांच्या मनसुब्यांवर पाणी फेरले गेले आहे.

राज्य निवडणूक आयोगाने २०२४ ते २०२६ या काळात मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसाठी प्रभाग रचना आणि आरक्षण सोडत पूर्ण केली आहे. १० जुलैला याचे अंतिम आरक्षणही जाहीर होत आहे. मात्र, सर्व तांत्रिक सोपस्कार पार पडले असले तरी प्रत्यक्ष निवडणुकांचा कार्यक्रम 'विशेष सखोल मतदारयादी पुनरीक्षण' (एसआयआर) मोहिमेच्या कचाट्यात सापडला आहे. बोगस मतदारांना चाप लावण्यासाठी आणि याद्यांमधील चुका दुरुस्त करण्यासाठी प्रशासनाने ही विशेष मोहीम हाती घेतली आहे.

पूर्णपणे पारदर्शक, अद्ययावत आणि अचूक मतदारयाद्या तयार झाल्यानंतरच निवडणुका घेण्यावर प्रशासनाचा भर आहे. या पुनरीक्षण मोहिमेची अंतिम मतदारयादी ७ ऑक्टोबरला प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर प्रभागनिहाय मतदारयाद्या फोडण्याच्या कामासाठी प्रशासनाला किमान दीड महिन्याचा वाढीव कालावधी लागणार आहे. या सर्व प्रशासकीय आणि तांत्रिक बाबींचा विचार केल्यास, यावर्षीच्या नोव्हेंबर किंवा डिसेंबर महिन्यांत निवडणूक कार्यक्रम जाहीर होणे अशक्यप्राय मानले जात आहे. रखडलेल्या ग्रामपंचायत निवडणुकांचा बिगुल आता यावर्षी वाजण्याऐवजी थेट २०२७ च्या सुरुवातीलाच वाजण्याची चिन्हे आहेत. (तभा वृत्तसेवा)

# यांना 'भाडे के टट्टू'ऐवजी 'भाटक गर्दभ' म्हणतो

### मुख्यमंत्र्यांचा राज ठाकरेंवर थेट हल्ला

राज ठाकरे यांच्या विधानांचा आणि टीकेचा समाचार घेताना मुख्यमंत्र्यांनी, मी माझे 'भाडे के टट्टू' हे वाक्य मागे घेतो आणि त्याऐवजी त्यांना 'भाटक गर्दभ' (भाड्याचे गाढव) म्हणतो, असा घणाघाती टोला नामोल्लेख टाळत लगावला. ते केवळ एक नकलाकार (मिमिक्री आर्टिस्ट) असल्याची टीका करत मुख्यमंत्र्यांनी चांगलीच टिंगल उडविली.

विरोकांच्या अंतिम आठवडा प्रस्तावाला विधानसभेत उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस कमालीचे आक्रमक झालेले पाहायला मिळाले. ते म्हणाले की, राज ठाकरे यांच्या राजकारणाला कोणतीही निश्चित दिशा किंवा तत्त्व उरलेले नाही. केवळ दुसर्यांची नक्कल करून आणि टोमणे मारून राजकारण चालवणार्यांना गांभीर्याने घेण्याची गरज नाही. आधी वापरलेल्या शब्दांपेक्षाही अधिक तीव्र संस्कृतप्रचुर शब्दाचा वापर करत मुख्यमंत्र्यांनी 'भाटक गर्दभ' असे म्हणत राज ठाकरेंची खिल्ली उडविली. मी काही सुपारीबाजांबद्दल बोललो होतो. मी तर फक्त एक टोपी फेकली होती, पण अनेकांना ती स्वतःच्या डोक्यावर का बसली हे मला समजलं नाही, असा टोला फडणवीसांनी लगावला. आमचे हे मिमिक्री आर्टिस्ट विचारताहेत की मी हिंदीत का बोललो? ते आमचे मित्र आहेत आणि ते मित्र असल्यामुळेच राजकारणात आम्हाला त्यांच्यापासून कोणताही धोका नाही. ते जर राजकारण सोडून मिमिक्रीच्या क्षेत्रात गेले असते, तर आज देशातील एकाही स्टॅण्डअप कॉमेडियनला मार्केट उरलं नसतं, अशा शब्दांत फडणवीसांनी टोमणा मारताच सभागृहात एकच हशा पिकला.

# 'भारतरत्न' देण्याचा ठराव हिवाळी अधिवेशनात मांडणार



स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना 'भारतरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यासंदर्भातील ठराव आगामी हिवाळी अधिवेशनात विधानसभेत मांडला जाईल, अशी ग्वाही विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज सभागृहात दिली. भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी या मुद्द्यावरून संतप्त भावना व्यक्त करत विधानसभा अध्यक्ष व राज्य सरकारला धारेवर धरल्यानंतर हे आश्वासन देण्यात आले.

पावसाळी अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशीच्या कामकाज पत्रिकेत स्वातंत्र्यवीर सावरकर यांना 'भारतरत्न' देण्यासंदर्भातील ठरावाचा समावेश नसल्याचा मुद्दा मुनगंटीवार यांनी उपस्थित केला. भारतीय जनता पक्षाने निवडणुकीच्या जाहीरनाम्यात सावरकरांना भारतरत्न देण्याचे आश्वासन दिले होते, याची आठवण करून देत मुनगंटीवार यांनी, सत्तेत आल्यानंतर आपण आपलेच शब्द विसरलो का, असा थेट सवाल उपस्थित केला. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या सन्मानाचा प्रस्ताव सभागृहात मांडण्यासाठी एवढा विलंब का होत आहे, असा प्रश्नही त्यांनी यावेळी उपस्थित केला.

# शिक्षक बदली प्रक्रिया आता शाळा सुरू होण्यापूर्वीच

राज्यातील शिक्षकांची पदोन्नती, समायोजन आणि बदली प्रक्रिया यापुढे शाळा सुरू होण्यापूर्वीच पूर्ण करण्यासाठी शासन नवीन सर्वसमावेशक नियमावली तयार करणार असल्याची माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी आज विधानसभेत दिली. सध्या ही प्रक्रिया अत्यंत क्लिष्ट बनल्याची कबुली देत, यात आमूलाग्र सुधारणा करण्याचे संकेत त्यांनी दिले. विधानसभा आमदार श्रीजया चव्हाण यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मंत्री गोरे बोलत होते. अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यापूर्वी पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक असल्याचे मंत्री गोरे यांनी स्पष्ट केले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शिक्षक पदोन्नतीसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे, मात्र याबाबतची अनेक प्रकरणे उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने पदोन्नती आणि पुढील समायोजन प्रक्रियेला विलंब होत असल्याचे त्यांनी सांगितले. यंदा संच मान्यता नेहमीच्या ३० सप्टेंबरऐवजी थेट फेब्रुवारी महिन्यात मिळाल्याने अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन वेळेत होऊ शकले नाही, असेही त्यांनी नमूद केले.

## वृक्षारोपणात आता देशी प्रजातींना प्राधान्य

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील रस्त्यांच्या कडेला होणाऱ्या वृक्षारोपणात यापुढे स्थानिक हवामान व भौगोलिक परिस्थितीला अनुकूल अशा देशी वृक्षप्रजातींची लागवड करण्यात येणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी शुक्रवारी विधानसभेत दिली. यासोबतच वृक्षसंवर्धनाच्या कामात पर्यावरणक्षेत्रात कार्यरत स्वयंसेवी संस्थांचा सहभाग वाढविण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे. आमदार सुरेश धस यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री भोसले यांनी ही माहिती दिली. हवामान बदल, वाढते तापमान, अनियमित पाऊस, भूजल पातळीतील घसरण आणि जैवविविधतेवरील परिणाम या समस्यांकडे लक्ष वेधत, विकासकामांबरोबरच पर्यावरण रक्षणालाही तेवढेच महत्त्व देण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

## महत्त्वाचे

### पॅलेस्टाईनमध्ये दोन दशकानंतर निवडणुका

**जेरुस्लेम :** पॅलेस्टाईनचे राष्ट्राध्यक्ष महमूद अब्बास यांनी शुक्रवारी देशात सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा केली आहे. २००६ नंतर देशात होणारी ही पहिलीच निवडणूक आहे.



नोव्हेंबरच्या अखेरीस देशात निवडणूक प्रक्रिया पार पडणार असल्याचेही त्यांनी सांगितले. अब्बास यांनी एक अध्यादेश जारी करून जेरुसलेम, वेस्ट बँक आणि गाझा पट्टीसह सर्व पॅलेस्टाईन प्रदेशांमध्ये २८ नोव्हेंबर, २०२६ ही निवडणुकांची तारीख निश्चित केली आहे. त्यांनी जनतेला मुक्त आणि थेट निवडणुकांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. पॅलेस्टाईन प्रदेशात शेवटच्या विधानसभा निवडणुका २००६ मध्ये झाल्या होत्या, ज्यात हमासने अब्बास यांच्या फताह पक्षाचा पराभव केला होता. या पराभवामुळे पक्षात फूट पडली, ज्यामुळे २००७ मध्ये हमासने गाझावर ताबा मिळवला. २००५ मध्ये चार वर्षांच्या कार्यकाळासाठी निवडून आलेले राष्ट्राध्यक्ष महमूद अब्बास दोन दशकांहून अधिक काळ सत्तेवर आहेत.

### ई-२० पेट्रोल अधिक स्वच्छ, कार्यक्षम

**नवी दिल्ली :** इथेनॉलचे २० टक्के मिश्रण असलेले 'ई-२०' पेट्रोल वापरल्याने काही वाहनांच्या मायलेजमध्ये ३ ते ५ टक्के घट होऊ शकते, अशी कबुली पेट्रोलियम मंत्रालयाने शुक्रवारी दिली. दरम्यान, हे इंधन अधिक स्वच्छ आणि कार्यक्षम असून, ते ऊर्जा सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून महत्वाचे आहे, असेही मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. इथेनॉल मिश्रित पेट्रोल कार्यक्रमाबाबत पेट्रोलियम मंत्रालयाने प्रश्न-उत्तर स्वरूपात माहिती प्रसिद्ध केली. त्यात म्हटले की, ई-१० अथवा शुद्ध पेट्रोलपेक्षा ई-२० पेट्रोल हे अधिक स्वच्छ, उच्च गुणवत्ता असलेले आणि अधिक कार्यक्षम इंधन आहे. अनेक वर्षांच्या शास्त्रीय चाचण्यांनंतर हे इंधन वितरणात आणण्यात आले आहे. यासाठी आधी वाहन निर्मिती कंपन्यांशी चर्चा करण्यात आली.

# खोटा प्रचार करून महाराष्ट्राची बदनामी करू नका

### विरोधकांवर मुख्यमंत्री फडणवीसांचा जोरदार पलटवार

**मुंबई, १० जुलै**

विधानसभेतील अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांच्या आरोपांचा एकामागोमाग एक समाचार घेत कायदा-सुव्यवस्था, शेतकरी, कर्जमाफी, सायबर गुन्हे, अंमली पदार्थविरोधी कारवाई आणि राज्याच्या विकासकामांवर सरकारची भूमिका ठामपणे मांडली. खोट्या आकडेवारीच्या आधारे महाराष्ट्राची बदनामी करण्याचा उद्योग थांबवा. महाराष्ट्र देशातील सर्वाधिक असुरक्षित राज्य असल्याचा अपप्रचार हा राज्याचाच अपमान आहे, असा जोरदार पलटवार त्यांनी केला.



विरोधकांनी राज्यातील कायदा-सुव्यवस्थेवर उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देताना फडणवीस म्हणाले की, गुन्हेगारीचे मूल्यांकन करताना प्रति लाख लोकसंख्येचा निकष महत्त्वाचा असतो. त्या निकषानुसार महाराष्ट्र गुन्हेगारीत देशात पहिल्या नव्हे तर सातव्या क्रमांकावर असून महिलांविरोधातील गुन्ह्यांमध्ये नवव्या आणि बलात्काराच्या गुन्ह्यांमध्ये सतराव्या क्रमांकावर आहे. त्यामुळे महाराष्ट्राला जाणीवपूर्वक बदनाम करण्याचा प्रयत्न योग्य नाही. (तभा वृत्तसेवा)

#### कायदा-सुव्यवस्था आणि सायबर गुन्ह्यांवर सरकार आक्रमक

सरकारने सायबर गुन्ह्यांवर मोठ्या प्रमाणात कारवाई केल्याचे सांगत त्यांनी जानेवारी ते जून २०२६ या कालावधीत सायबर फसवणुकीतील ४३९ कोटींची रक्कम गोठवण्यात आल्याची माहिती दिली. डिजिटल अरेस्टसारख्या फसवणुकीच्या रॅकेटवर मोठी कारवाई करण्यात आली असून हजारो मोबाईल, बँक खाती आणि सायबर नेटवर्क उद्ध्वस्त केल्याचे त्यांनी सांगितले.

# न्यूझीलंडमध्ये मोदींचे जल्लोषात स्वागत

### पंतप्रधान लक्सन यांची घेतली भेट, आज करारावर होणार स्वाक्षरी

**वेलिंग्टन, १० जुलै**

ऑस्ट्रेलियाचा दौरा आटोपून पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी न्यूझीलंडच्या ऑकलंड शहरात पोहोचले. चार दशकांहून अधिक काळानंतर न्यूझीलंडला भेट देणारे ते पहिले भारतीय पंतप्रधान आहेत. विमानतळावर पंतप्रधान क्रिस्टोफर लक्सन यांनी त्यांचे स्वागत केले. विमानतळाच्या बाहेर भारतीय वंशांच्या नागरिकांनी मोदींच्या स्वागतासाठी मोठी गर्दी केली होती. दोन्ही नेत्यांमध्ये शनिवारी बैठक होणार असून, त्यानंतर द्विपक्षीय करारावर स्वाक्षरी केली जाणार आहे.



पंतप्रधान मोदी शनिवारी ऑकलंडमधील भारतीय समुदायाला संबोधितही करणार आहेत. न्यूझीलंडचे महसूल मंत्री सायमन वॉट्स वृत्तसंस्थेशी बोलताना म्हणाले, पंतप्रधान मोदी यांचे यजमानपद भूषवणे हा न्यूझीलंडसाठी एक खूप विशेष क्षण आहे. यामुळे न्यूझीलंड आणि भारत यांच्यातील संबंध अधिक बळटक होईल, मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी करणे हे आमच्या संबंधांसाठी आणि न्यूझीलंडमध्ये राहणाऱ्या भारतीय समुदायासाठी एक मोठे पाऊल आहे. बहुध्रुवीय जगात भारतासारख्या राजकीय आणि आर्थिक महासत्तेसोबतची सखोल भागीदारी न्यूझीलंडसाठी महत्त्वपूर्ण आहे. हे संबंध केवळ व्यापारापुरते मर्यादित राहणार नाहीत, तर ते दोन्ही देशांतील लोकांमधील संबंधही अधिक दृढ करतील. भारताची मजबूत तांत्रिक क्षमता आणि कौशल्य न्यूझीलंडच्या अर्थव्यवस्थेला लक्षणीय फायदा पोहोचवू शकते. पंतप्रधान मोदींच्या दौऱ्यामुळे दोन्ही देशांमधील सामरिक आणि आर्थिक संबंध अधिक दृढ होण्याची अपेक्षा आहे. (वृत्तसंस्था)

# ऑपरेशन सिंदूर २.० साठी सज्ज राहा

### लष्करप्रमुखांचे अधिकाऱ्यांना पत्र, प्रत्येक तुकडीची वेळोवेळी तपासणी करा

**श्रीनगर, १० जुलै**

भारताचे लष्करप्रमुख जनरल धीरज सेठ यांनी लष्करी अधिकाऱ्यांना पत्र लिहून, ऑपरेशन सिंदूर २.० आणि ऑपरेशन स्नो लेपर्ड २.० साठी सज्ज राहण्याचे निर्देश दिले आहेत. शस्त्रे, दारुगोळा, रसद, सैनिक आणि इतर आवश्यक संसाधने पूर्णपणे तयार आहेत याची खात्री करण्यासाठी तुकड्यांची वेळोवेळी तपासणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

भारतीय लष्कराची युद्धसज्जतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे आणि हे साध्य करण्यासाठी, शस्त्रे, दारुगोळा, रसद, सैनिक आणि इतर आवश्यक संसाधने पूर्णपणे तयार आहेत की नाही याची खात्री करावी. लष्करप्रमुखांनी पत्रात लिहिले की, प्रत्येक अधिकाऱ्याने आपापल्या स्तरावर नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून आपल्या तुकडीत सुधारणा केली पाहिजे. सैनिकांसोबत विश्वास, आदर आणि चांगले संबंध टिकवून ठेवण्याचे अधिकाऱ्यांना आवाहन केले. युद्धाची पद्धत बदलत आहे. भविष्यात, ड्रोन आणि इतर मानवरहित प्रणाली मानवांच्या



बरोबरीने लढतील. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग आणि नवीन तंत्रज्ञान हे युद्धाचा एक सामान्य भाग बनले आहे. त्यामुळे, प्रत्येक अधिकाऱ्याने या बदलाचा भाग बनले पाहिजे. नवीन तंत्रज्ञान इतक्या वेगाने बदलत आहे की, शस्त्रे खरेदी करण्याची किंवा नवीन क्षमता विकसित करण्याची प्रक्रिया नेहमीच त्याच्याशी जुळवून घेऊ शकत नाही. त्यामुळे, प्रत्येक स्तरावरील अधिकाऱ्यांनी व्यावहारिक आणि सोपे उपाय शोधावे यावरही त्यांनी भर दिला.

#### लष्करी क्षमता वाढविण्याला द्यावे प्राधान्य

लहान सुधारणांमुळे लष्कराची ताकद लक्षणीयरीत्या वाढू शकते. नवीन तंत्रज्ञान स्वीकारूनही, युद्धात आधीच यशस्वी ठरलेल्या रणनीती आणि पद्धती सोडून देऊ नयेत. आवश्यकतेनुसार लष्कराने आपल्या मूळ लष्करी क्षमतांवरही अवलंबून राहिले पाहिजे. लष्कर केवळ देशाच्या सीमांचे रक्षण करत नाही, तर २०४७ पर्यंत विकसित भारत घडवण्यातही महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे, केवळ व्यावसायिक क्षमताच नव्हे, तर व्यापक दृष्टिकोन आणि परिपक्वता देखील आवश्यक असल्याचे पत्रात नमूद केले. (वृत्तसंस्था)

#### समाज माध्यमांचा देशविरोधी प्रचाराचे माध्यम

जनरल सेठ यांनी अधिकाऱ्यांना सतत वाचन करून नवीन तंत्रज्ञान आणि जागतिक बदलांविषयी अद्ययावत राहण्याचे आवाहन केले. त्यांनी लिहिले की, अधिकाऱ्यांनी प्रत्येक लहानसहान गोष्टीसाठी वरिष्ठांच्या निर्देशांची वाट न पाहता, समस्यांवर स्वतःच उपाय शोधले पाहिजेत. सोशल मीडिया आता एक प्रकारचे रणांगण बनले आहे. शत्रू देश त्याचा वापर प्रचारासाठी करतात. त्यामुळे, अधिकाऱ्यांनी सोशल मीडिया संदर्भात अत्यंत सावध असावे.

## अपघातात चंद्रपूरच्या चार मजुरांचा मृत्यू

**हैदराबाद, १० जुलै**

भात रोवणीच्या कामासाठी तेलंगणा राज्यात गेलेल्या चंद्रपूर जिल्ह्यातील मजुरांचा अपघात झाला. सिंदेवाही तालुक्यातील पवना चक गावातील मजुरांच्या वाहनाचा रामगुंडम येथे अपघात झाला. या घटनेत तीन महिलांसह एका पुरुषाचा मृत्यू झाला असून २७ मजूर गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत. चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यातून मोठ्या संख्येने मजूर दरवर्षी तेलंगणात भात रोवणी व शेतमजुरीसाठी जातात. यंदाही पवना चक गावातील मजूर तेलंगणात गेले होते. गुरुवारी सायंकाळच्या सुमारास शेतातील काम आटोपून आपल्या राहत्या खोलीकडे परत जात असताना रामगुंडम येथे त्यांच्या वाहनाला भीषण अपघात झाला. अपघातात घटनास्थळीच चार जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये अतुल सोनुले, अर्चना सोनुले, प्रभा मोहुर्ले आणि रंजना शेंडे यांचा समावेश आहे. या घटनेत तब्बल २७ मजूर जखमी झाले असून काहींची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर आली आहे. (तभा वृत्तसेवा)

# सर्वोच्च न्यायालयात 'त्या' प्रकरणाची सुनावणी

### सीबीआय चौकशीच्या मागणीची याचिका स्वीकारली

**नवी दिल्ली, १० जुलै**

श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टमधील देणग्यांच्या कथित अपहाराची सीबीआय चौकशी करण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या तीन जनहित याचिका शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारल्या आणि सोमवारी यावर सुनावणी घेण्याचे निश्चित केले. सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यीय खंडपीठात न्या. जॉयमाल्य बागची आणि न्या. व्ही. एस. मोहन यांचाही समावेश असेल.

सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेत न्यायासन तीन याचिकांवर सुनावणी करेल. यामध्ये अपहार प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवणे, एसआयटी स्थापन करणे आणि मंदिरात देणगीच्या व्यवस्थापनाशी संबंधित विविध विषयांच्या पुनरावलोकनासाठी तज्ज्ञ समिती स्थापन करण्याच्या मागणीचा समावेश आहे. वकील अजय कुमार राय आणि दिनेश कुमार यादव यांनी श्रीराम मंदिरात भाविकांनी दिलेल्या देणग्या आणि अर्पणांच्या कथित गैरव्यवहाराची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी याचिकेतून केली, तर राष्ट्रीय जनता दल (राजद) चे खासदार सुधाकर सिंह यांनीही याच मुद्द्यावर एक स्वतंत्र याचिका दाखल केली. गैरव्यवहाराची सविस्तर चौकशी न्यायालयाच्या देखरेखीखाली करावी अशी मागणी केली आहे. उत्तर प्रदेश सरकार आणि श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टला भविष्यात अशा अनियमितता टाळण्यासाठी एक मजबूत लेखापरीक्षण प्रणाली स्थापित करण्याचा आदेश द्यावा असेही याचिकेत नमूद आहे.

#### देणगी मोजणाऱ्या २३ कर्मचाऱ्यांचा राजीनामा

श्रीराम मंदिरात देणगी मोजणाऱ्या २३ कर्मचाऱ्यांनी ट्रस्टकडे सामूहिक राजीनामा दिला आहे. अपहार प्रकरणानंतर देणगीसाठी १०-२० रुपयांच्याच अधिक नोटा येत आहे. ज्यामुळे मोजणीला जास्त वेळ लागत आहे. आधी काम दोन शिफ्टमध्ये होत असे, पण आता सकाळी ९ ते संध्याकाळी ८ वाजेपर्यंत एकच शिफ्ट करण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# पंतप्रधानांची दूरदृष्टी

२०४७ पर्यंत विकसित भारताचे लक्ष्य गाठण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी एकाचवेळी अनेक आघाड्यांवर काम करत आहेत. देशातील पायाभूत सुविधांचा विकास करताना बदलत्या भू-राजकीय परिस्थितीत आपल्या मित्रदेशांची संख्याही ते वाढवत आहेत. त्यांच्याशी आर्थिक, लष्करी आणि व्यापारविषयक करार करत आहेत. मोदी यांच्या परदेश दौऱ्यांची विरोधक खिल्ली उडवत असताना त्यांच्या प्रत्येक परदेश दौऱ्यातून भारताला काही ना काही मिळाले आहे, देशाचा फायदा झाला आहे याकडेही लक्ष दिले पाहिजे. आज जग इतके छोटे झाले आहे, की एका देशातील घडामोडींचा परिणाम त्याच्या शेजारी देशांवर सहज होत असतो. सध्या जगात इतकी अस्थिर परिस्थिती निर्माण झाली आहे की, कोण कोणाचा मित्र आणि कोण कोणाचा शत्रू हे समजतच नाही. त्यामुळे मोदी आपल्या प्रत्येक परदेश दौऱ्यातून शत्रूंची संख्या कमी करताना मित्रांची संख्या वाढवण्याचा प्रयत्न करत आहेत.

विशेष म्हणजे जगातील बहुतांश देशांनाही भारतासोबत मैत्रीचे संबंध हवे आहेत. त्यामुळे भारताने मैत्रीचा हात पुढे केल्यावर अनेक देश भारताशी हस्तांदोलन करण्यास तयार होतात. भारत हा अनेक देशांचा अतिशय विश्वासू असा मित्र आहे. भारताने दुसऱ्या देशाला धोका दिल्याचे, विश्वासघात केल्याचे आणि पाठीत खंजीर खुपसल्याचे एकही उदाहरण नाही. त्यामुळे जगातील अनेक देशांना भारताकडून मोठ्या अपेक्षा आहेत. मोदी भारताचे पंतप्रधान झाल्यानंतर जगात भारताबद्दलचा विश्वास कितीतरी पटीने वाढला. त्यामुळे मोदींना अनेक देशांच्या सर्वोच्च सन्मानाने गौरवान्वित केले जाते. मोदी यांच्यासारखा मुत्सद्दी नेता आजपर्यंत भारतात झाला नाही. त्यामुळेच 'मोदी है तो मुमकिन है' असे म्हटले जाते. त्यामुळेच इतक्या उलथापालथी होत असताना विकासाच्या पथावर भारत अग्रेसर आहे. याउलट पाकिस्तानचे पाहा. पाकिस्तान हा कधीच कुणाचा मित्र होऊ शकत नाही. पाकिस्तानचा इतिहास हा पाठीत खंजीर खुपसण्याचाच राहिला आहे. त्यामुळे जगातील एकही देश, अगदी मुस्लिम देशही, पाकिस्तानवर विश्वास ठेवत नाही. या मुद्द्यावर तोलून पाहिले तर मोदींचे नेतृत्व आणि कर्तृत्व डोळ्यात भरण्याजोगे आहे.

इस्रायल, अमेरिका आणि इराण युद्धाचा फटका त्या तीन देशांनाच नव्हे तर जगातील सगळ्या देशांना बसला आहे. इस्रायलने आपले हल्ले थांबवले नसताना इराण आणि अमेरिका यांच्यात युद्धबंदी जाहीर झाली. त्यामुळे जगाने सुटकेचा निःश्वास सोडला असताना नव्याने त्या युद्धाचा भडका उडाला आहे. दुसरीकडे रशिया आणि युक्रेन यांचे युद्ध अजूनही संपलेले नाही, ते कधी संपेल, हे कोणी सांगू शकत नाही. इराणला आपला अणू कार्यक्रम राबवू देणार नाही, अशी अमेरिकेची भूमिका आहे. इराणवरील अमेरिकेच्या हल्ल्यावरून दर्शनी कारण तरी तेच आहे. इराणने आपले समृद्ध युरेनियम अमेरिकेच्या ताब्यात द्यावे, अशी अमेरिकेची मागणी आहे. अणुबॉम्बची निर्मिती या समृद्ध युरेनियममधूनच करता येते. इराणला आपला अणुबॉम्ब बनवता येऊ नये म्हणून अमेरिकेने इराणकडे समृद्ध युरेनियमची मागणी केली आहे. इराण आपले समृद्ध युरेनियम अमेरिकेला देईल की नाही, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही, मात्र अशा परिस्थितीत भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात आर्थिक, लष्करी आणि व्यापारविषयक १८ करार झाले आहेत. यातील सर्वांत महत्त्वाचा करार हा परमाणू ऊर्जा, समुद्री सुरक्षा आणि दुर्लभ खनिजांसंबंधीचा आहे. ऑस्ट्रेलियाने भारताला युरेनियम देण्याची तयारी दर्शवली आहे. भारत या युरेनियमचा उपयोग अण्वस्त्र बनवण्यासाठी नाही तर अणुऊर्जेसाठी करणार आहे. भारताच्या दृष्टीने ही मोठी उपलब्धी म्हटली पाहिजे. या युरेनियमचा वापर भारततर्फे परमाणू ऊर्जा प्रकल्पात स्वच्छ ऊर्जेसाठी केला जाणार आहे. भारत आणि इराण किंवा पाकिस्तान यांच्यात हाच फरक आहे. इराण युरेनियमचा वापर अणुबॉम्ब बनवण्यासाठी करत आहे, तर भारत अणुऊर्जेसाठी. या विश्वासापोटीच ऑस्ट्रेलियाने भारताला युरेनियम देण्याची तयारी दर्शवली आहे. चाकू कोणा बदमाशाच्या हातात आला तर तो खून करू शकतो, मात्र तो एखाद्या डॉक्टरच्या हातात असला तर तो शस्त्रक्रिया करून रुग्णाचे प्राण वाचवू शकतो. युरेनियमची स्थिती तंतोतंत तशीच आहे.

कधीकाळी जगात रशिया आणि अमेरिका या दोनच महाशक्ती होत्या. त्यावेळी भारत हा रशियाचा मित्र होता, पाकिस्तानाला अमेरिकेचा आधार होता. काळाच्या ओघात रशिया महाशक्ती राहिली नाही. कारण सोव्हिएत युनियनचे विघटन झाले. त्यामुळे अमेरिका ही एकमेव महाशक्ती उरली होती. पण अमेरिकेला महाशक्तिपद टिकवणे जमेनासे झालेले दिसते. डोनाल्ड ट्रम्प यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात तर अमेरिका खूपच बेभरवशाचा देश झाला आहे. ट्रम्प आपल्या मनमानी वागणुकीने अमेरिकेसोबत जगाचाही सत्यानाश करायला निघाले असल्याचे दिसते आहे. कधी ट्रम्प आपण भारताचे हितैषी असल्याचे दाखवतात, तर कधी दुसऱ्याच क्षणी कोलांटउडी मारतात. दुसरी महाशक्ती म्हणून रशियाची जागा आता चीनने घेतली आहे, हे मान्य करावे लागते. पण चीन हा लोकशाही मानणारा देश नाही. चीनची वागणूकही अशीच बेभरवशाची आहे. मुळात चीन हा भारताचा कधीच मित्र नव्हता. आजही चीनची वागणूक भारताचा मित्र कमी आणि शत्रू जास्त अशी आहे. जगात आजपर्यंत भारताचे चीन आणि पाकिस्तान या दोन देशांशीच युद्ध झाले आहे. चीन हा भारतासाठी कधीच विश्वासार्ह नव्हता. त्यामुळे भारताने चीन आणि अमेरिका यांच्यापासून सारख्या अंतरावर राहण्याची भूमिका घेत नवे मित्र जोडण्याची सुरुवात केली आहे. त्याची सुरुवात ऑस्ट्रेलियासोबतच्या करारातून झाली आहे. प्रत्येक देशाला आत्मसन्मानासोबत आत्मसुरक्षेचाही अधिकार असतोच. या अधिकाराचा वापर करीत भारताने प्रशांत महासागरातील देशांना सोबत घेऊन समुद्री सुरक्षेच्या संदर्भात नवी भूमिका घेतली आहे. मुळात अलिप्त राष्ट्र चळवळ ही भारताची मूळ आणि जुनी भूमिका. पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि त्यानंतरच्या बहुतेकांनी अलिप्ततावादी धोरण राबविले. चीन, रशिया आणि अमेरिका या देशापासून सारख्या अंतरावर राहण्याची ही भूमिका होती. त्यात थोडे फार बदल काळाच्या ओघात होतातच. अलिप्ततावाद ही त्या काळाची गरज असेलच. आता भूमिका घेण्याचे दिवस असतील तर ती घ्यावी लागेल. या अर्थाने चीन, रशिया आणि अमेरिका यांच्या प्रभावात नसलेल्या वा या देशांच्या लष्करी कारवाईचा फटका बसलेल्या देशांना एकत्र आणत भारताला नवी महाशक्ती म्हणून मान्यता प्राप्त करून देण्याचा मोदी यांचा प्रयत्न आहे. मोदी यांच्या या प्रयत्नांना जगातून काही देशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. भारत-ऑस्ट्रेलिया कराराकडे या भूमिकेतूनही पाहायला हवे.

मोदी आपल्या दूरदृष्टीसाठी ओळखले जातात. देशाला परमवैभवाला नेण्याचे रा. स्व. संघ अनेक वर्षांपासून पाहत असलेल्या स्वप्नांची पूर्तता करण्याची जबाबदारी संघाचे प्रचारक असलेल्या मोदींनी पंतप्रधान म्हणून आपल्या शिरावर घेतली आहे. ती जबाबदारी ते यशस्वीपणे पार पाडतील, यात शंका नाही. त्या दिशेने भारताची वाटचाल सुरू झाली आहे. या प्रवासातील बराच मोठा पल्लाही भारताने गाठला आहे. एकापाठोपाठ एक असे आंतरराष्ट्रीय करार आणि साऱ्या जगात भारताच्या भूमिकेला मिळत असलेला प्रतिसाद हे त्याचेच द्योतक आहे. मोदींच्या परराष्ट्र धोरणाला मिळालेले उल्लेखनीय यश म्हणूनही याकडे पाहता येईल. ■

## यंगिस्तान

# खरे गद्दार कोण ?

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे नेते शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विधिमंडळातील दालनात सदिच्छा भेट घेतली आणि शिंदेंनी त्यांचे स्वागत केले. ही बातमी कळताच उबाठा गटाचे नेते संजय राऊत भलतेच चिडलेत. शरद पवारांसारख्या ज्येष्ठ नेत्याने गद्दारांना का भेट दिली असा सवाल त्यांनी उठवला आहे. या भेटीमुळे त्यांचं मनही दुखावलं गेलं असल्याचं त्यांनी म्हटलं. खरं पाहता मन दुखावलं जाण्याच्या वयाचा टप्पा त्यांनी पार केला आहे. पण ते असो. काही वर्षांपूर्वी उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे त्यांच्या नजरेखालून ४० आमदार घेऊन आसामला निघून गेले आणि त्यानंतर त्यांनी वेगळा गट स्थापन केला. पुढे त्यांनी शिवसेना पक्षावरच दावा केला आणि ठाकरेंची मक्तेदारी असलेला शिवसेना पक्ष स्वतःच्या ताब्यात घेतला. या घटनेनंतर उद्धव ठाकरे, संजय राऊत याणि त्यांच्या मंडळींनी एकनाथ शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना गद्दार म्हणायला सुरुवात केली. महाराष्ट्रातील ठेवलेल्या पत्रकारांनीही याची री ओढायला सुरुवात केली आणि शिंदे गद्दार आहेत हे नॅरेटिव्ह सेट केलं. जणू उद्धव ठाकरे म्हणजे महाराष्ट्र आहेत, महाराष्ट्राची अस्मिता आहेत आणि त्यांचा पक्ष फोडल्याने खूप मोठं पाप झालंय. पण जे शरद पवार एकनाथ शिंदेंच्या दालनत भेटायला गेले, त्यांनीच तर या फोडाफोडीच्या राजकारणाचा पाया उभा केला आहे, हे ही मंडळी विसरली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सुद्धा काँग्रेस फोडूनच स्थापन झालेला आहे. तेही असो. पण आपला मुद्दा असा आहे की उद्धव ठाकरे यांच्याशी फारकत घेणे हा जणू महाराष्ट्राचा वा देशाचा अपमान आहे अशा प्रकारचं नॅरेटिव्ह पसरवण्यात आलं. ठाकरेंनी देखील प्रत्येक भाषणांत गद्दार हा शब्द वापरून त्या शब्दास अजरामर केले. मात्र आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की शिंदे-ठाकरे वाद जो काही असेल, त्यात महाराष्ट्राचं भलं नसलं तरी नुकसानही नाही. हे त्यांचं वैयक्तिक आणि राजकीय शत्रुत्व आहे. त्याच्याशी महाराष्ट्राच्या अस्मितेचा काहीही संबंध नाही. सतत गद्दार या शब्दाचा अतिवापर केल्यामुळे मूळ गद्दार कोण आहेत याकडे डोळेझाक होते.

हिंदवी स्वराज्य स्थापन करणाऱ्या शिवरायांशी ज्यांनी फारकत घेतली, धर्मवीर शंभूराजेंना ज्यांनी पकडून देण्यासाठी साहाय्य केलं ते खरे गद्दार आहेत. इंग्रजी सत्तेशी जे एकनिष्ठ राहिले ते गद्दार आहेत. सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर यांनी न्यायालयात असं वक्तव्य केल्याची बातमी वाचली की जर सावरकरांनी ब्रिटिशांशी तडजोड केली असती तर १९४६ मध्ये ब्रिटिशांनी त्यांना भारताचे पंतप्रधान म्हणून नेमले असते. या वक्तव्यात तर्क आहे. आपल्याला गद्दार कोण हे ओळखता आलं पाहिजे. या लेखप्रपंचाचा घाट अशासाठी घातला आहे, कारण केरळमधल्या मल्लपुरम येथील मोहम्मद सनूफ या माणसाला यूएपीए कायद्यांतर्गत अटक करण्यात आली आहे. आता तुम्ही विचाराल की याला अटक का झाली? तर हा माणूस खरा गद्दार आहे. कसं ते सांगतो.

२२ एप्रिल २०२५ रोजी जम्मू-काश्मीरमधील प्रसिद्ध पर्यटनस्थळ पहलगाम येथील बैसरन या परिसरात भीषण जिहादी दहशतवादी हल्ला झाला. दुपारच्या सुमारास सशस्त्र दहशतवाद्यांनी धर्म विचारून हिंदू पुरुषांना ठार केले. या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये २५ पर्यटक आणि एक स्थानिक नागरिक यांचा समावेश होता, तर अनेक जण गंभीर जखमी झाले. मृतांमध्ये महाराष्ट्रासह गुजरात, कर्नाटक, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, हरयाणा आणि इतर राज्यांतील नागरिकांचा समावेश होता. हा हल्ला जिहादी संस्कृतीनुसार त्यांच्या ईश्वरासाठी करण्यात आला होता. कारण त्यांच्या संस्कृतीनुसार इतर धर्मांच्या लोकांना जिवंत राहण्याचा अधिकारच नाही. काश्मीर खोऱ्यातील हिंदूंचा संहार, इंग्रजांच्या काळातील मोपल्यांचे बंड, डिरेक्ट अॅक्शन अशी भारतातील अनेक उदाहरणे देता येतील. परदेशातीलही उदाहरणे देता येतील. या हल्ल्याने अनेकांना दुःख झालं. अनेकांनी जिहादी अतिरेक्यांना धडा शिकवण्याची मागणी केली. सरकारने 'ऑपरेशन सिंदूर' राबवून सर्वांचा प्रतिशोधही घेतला. मात्र या हल्ल्यामुळे अनेकांना आनंदही झाला. जे संजय राऊत उद्धव ठाकरेंशी फारकत घेणाऱ्या आणि वेगळी चूल मांडणाऱ्या एकनाथ शिंदेंना गद्दार म्हणतात, त्याच संजय राऊतांनी पहलगाम हल्ला हा धर्मावर आधारित नव्हता असं वक्तव्य केलं. अतिरेक्यांनी धर्म विचारून गोळ्या झाडल्या हे सबंध जगाने पाहिलं, पण संजय राऊत यांना जिहाद्यांची प्रचंड काळजी वाटत होती. त्यांनी भाजपवर प्रचंड टीका केली.

तर वाचकहो, आपण मूळ मुद्द्यावर येऊया. या हल्ल्यानंतर सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटल्या. अशाच एका प्रकरणात केरळमधील २६ वर्षीय मोहम्मद सनूफ याच्यावर दहशतवादी हल्ल्याचे कथित समर्थन केल्याचा आरोप करण्यात आला. पोलिसांच्या माहितीनुसार, पहलगाम हल्ल्यात मृत्यू पावलेल्या एन. रामचंद्रन यांच्या मुलीने सोशल मीडियावर केलेल्या पोस्टवर सनूफने अशी टिप्पणी केली की, ती दहशतवादी हल्ल्याचे समर्थन करणारी होती. ही बाब निदर्शनास आल्यानंतर भारतीय जनता युवा मोर्चाच्या एका पदाधिकाऱ्याने पोलिसांकडे तक्रार दाखल केली. मोहम्मद सनूफने ती सोशल मीडिया टिप्पणी केली तेव्हा तो सौदी अरेबियामध्ये काम करत होता. त्यानंतर त्याच्याविरुद्ध केरळमध्ये गुन्हा दाखल झाला आणि त्याच्या विरोधात लूकआउट सर्क्युलर जारी करण्यात आले. जुलै २०२६ मध्ये तो सौदी अरेबियातून केरळमधील कोझिकोड (करीपूर) आंतरराष्ट्रीय विमानतळावर परतल्यानंतर इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याला संबंधित पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. प्राथमिक चौकशी आणि त्याच्या मोबाईलची तपासणी केल्यानंतर त्याच्यावर यूएपीए अंतर्गतही गुन्हा दाखल करण्यात आला.

यूएपीए हा भारतातील दहशतवाद आणि राष्ट्रविरोधी कारवायांवर नियंत्रण ठेवण्यासाठी लागू करण्यात आलेला कठोर कायदा आहे. या कायद्यांतर्गत तपासासाठी अधिक कालावधी उपलब्ध असतो आणि जामीन मिळवण्याच्या अटीही तुलनेने कठोर आहेत. मग खरे गद्दार कोण आहेत? उद्धव ठाकरेंना कंटाळून तर त्यांचे धाकटे बंधू राज ठाकरेही गेले होते. शिंदेंनी शिवसेनेत बंड केल्यानंतर शिंदेंच्या सभेत उद्धव ठाकरेंचे सख्खे बंधू जयदेव ठाकरेही उपस्थित होते. त्यांनीही शिंदेंना पाठिंबा दिला. संजय राऊतांनी खऱ्या गद्दारांची ओळख करून घ्यायला हवी. खरे गद्दार मोहम्मद सनूफसारखे लोक आहेत. महाराष्ट्राचे गद्दार, देशाचे गद्दार हेच खरे गद्दार आहेत. ■

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**नीलेश जोशी**

# संकल्प सुरक्षित मातृत्वासाठीचा

समाजात विविध सामाजिक समस्या आहेत. चिंतन, चर्चा आणि जनजागृती करून या समस्यांचे निराकरण करणे शक्य आहे. यासाठीच विशेषत्वाने त्या-त्या समस्यांच्या समाधानाकरिता विचार व्हावा, हा हेतू ठेवून विशेष दिन साजरे केले जातात. जागतिक स्तरावर वाढती लोकसंख्या ही एक अशीच समस्या आहे. म्हणूनच ११ जुलै हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून पाळला जातो. मर्यादित संसाधने आणि अमर्याद वाढत असलेली लोकसंख्या याचे चिंतन आणि उपाययोजनांचा विचार या दिवशी मुख्यतः करण्यात येतो. तर २००५ सालापासून लोकसंख्या दिनाच्या आदल्या दिवशी म्हणजेच १० जुलै रोजी 'मातृ सुरक्षा दिन' साजरा करण्याची सुरुवात झाली. गर्भवती आणि होणाऱ्या मातांच्या आरोग्याची काळजी घेण्याबाबत समाजात जागरूकता निर्माण करणे हा या दिवसाचा उद्देश.

मातृत्व हा स्त्रीच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील टप्पा आहे. सुरक्षित गर्भधारणा, प्रसूती आणि प्रसूतीनंतरची योग्य काळजी हा प्रत्येक महिलेचा मूलभूत अधिकार आहे. १० जुलै हा दिवस केवळ जनजागृतीचा नाही, तर शासन, आरोग्य यंत्रणा आणि समाजाने सुरक्षित मातृत्वासाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा आणि भविष्यात आवश्यक असलेल्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीचे नियोजन करण्याचा आहे. महाराष्ट्राने मातृ आरोग्याच्या क्षेत्रात देशात उल्लेखनीय प्रगती केली आहे. नमुना नोंदणी प्रणाली २०२१-२३ नुसार राज्याचा माता मृत्युदर प्रति एक लाख जन्मांमागे केवळ ३६ इतका आहे. देशात हाच दर सरासरी ८८ असताना महाराष्ट्राची कामगिरी राष्ट्रीय स्तरावर चांगली म्हणावी लागेल. मात्र या समस्येवर सर्वाधिक उत्तम कामगिरी केरळ, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू राज्यांनी केल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. त्यानंतर महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. एका सर्वेक्षणानुसार २०२३ मध्ये महाराष्ट्राचा अर्भक मृत्युदर प्रति १,००० जन्मांमागे १४ इतका, तर नवजात मृत्युदर ११ आणि पाच वर्षांखालील बाल मृत्युदर १६ इतका आहे. ही सर्व आकडेवारी देशातील इतर राज्यांच्या आकडेवारीपेक्षा चांगली असली तरी अद्याप काही गंभीर आव्हाने समोर आहेतच. राज्यात अजूनही गर्भवती महिलांमधील रक्तक्षय अर्थात अॅनिमिया ही मोठी समस्या आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रातील १५ ते ४९ वर्षे वयोगटातील सुमारे ५४ ते ५५ टक्के महिला रक्तक्षयाने ग्रस्त आहेत. रक्तक्षयामुळे अकाली प्रसूती, कमी वजनाची बालके, प्रसूती दरम्यान अतिरक्तस्राव आणि मातामृत्यूचा धोका वाढतो. महाराष्ट्रात दरवर्षी लाखो महिलांची शासकीय रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये प्रसूती होते. बहुसंख्य प्रसूती रुग्णालयात होत असल्या तरी दुर्गम आदिवासी भागांमध्ये अद्याप तज्ज्ञ डॉक्टर, रक्तकेंद्र, आयसीयू, प्रसूतितज्ज्ञ आणि नवजात शिशू अतिदक्षता सुविधांचा अभाव जाणवतो. तर राज्यातील दुर्गम भागात अजूनही वाहतूक व आरोग्य सुविधा हे मोठे आव्हान आहे.



प्रसूतीदरम्यान होणारा अतिरक्तस्राव, उच्च रक्तदाब, गर्भधारणेतील विषबाधा, संसर्ग, रक्तक्षय आणि उपचारासाठी होणारा विलंब, ही मातामृत्यू होण्याची प्रमुख कारणे आहेत. प्रत्येक गर्भवती महिलेने पहिल्या तीन महिन्यांत गर्भधारणेची नोंदणी करणे, प्रसूतिपूर्व किमान चार तपासण्या करून घेणे, लोह-फॉलिक आम्लाच्या गोळ्या नियमित घेणे, संतुलित आहार घेणे, रुग्णालयात प्रसूती करणे आणि प्रसूतीनंतरही नियमित आरोग्य तपासणी करून घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्राने मातामृत्यू आणि बालमृत्यू कमी करण्यामध्ये उल्लेखनीय यश मिळवले असले, तरी 'उपचाराअभावी एकही माता दगावू नये' हे लक्ष्य साध्य करावे लागेल. मातृसुरक्षा हा केवळ आरोग्याचा विषय नाही तो महिला सक्षमीकरण, सामाजिक न्याय आणि मानवी विकासाचा पाया आहे. कोणत्याही आईचा मृत्यू हा केवळ त्या कुटुंबाचा नव्हे तर संपूर्ण समाजाचा तोटा असतो. त्यामुळे प्रत्येक गर्भवती महिलेला वेळेवर आरोग्यसेवा, योग्य पोषण आहार, सुरक्षित प्रसूती आणि प्रसूतीनंतरची काळजी मिळणे ही शासन आरोग्य यंत्रणा, कुटुंब आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. मातृसुरक्षा दिनानिमित्ताने याचे चिंतन आणि अंमलबजावणीसाठी सर्वांनीच पुढाकार घ्यावा एवढेच. ■

९४२२८६२४८४

## मुंबई वार्तापत्र

# राजकीय सोयीचे 'रामनाम' !

**नागेश दाचेवार**

महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकारणात सध्या एका अजब, तितक्याच हास्यास्पद आणि ढोंगी राजकीय प्रहसनाचा प्रयोग सुरू आहे. ज्या पक्षाने सातत्याने प्रभू श्रीरामाच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले, ज्या पक्षाच्या वकिलांनी आणि नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयात प्रभू रामचंद्र हे केवळ एक 'काल्पनिक पात्र' होते असे अधिकृत शपथपत्र दिले, त्याच काँग्रेस पक्षाला आज अचानक रामाचा कळवळा आला आहे. तोच काँग्रेस पक्ष आज राजकीय सोयीचे रामनाम करत, राम मंदिरातील कथित अपहाराच्या विरोधात 'रघुपती राघव राजाराम' भजन आंदोलन करायला रस्त्यावर उतरला आहे. राजकारणात सोयीस्कर भूमिका घेणे ही काही नवीन गोष्ट नाही, परंतु ढोंगीपणाचा जेव्हा कळस होतो, तेव्हा त्याचे रूपांतर एका अत्यंत विनोदी हास्यजत्रेत होते. काँग्रेसचे हे आंदोलन म्हणजे त्याच हास्यजत्रेचा एक ढळढळीत नमुना आहे.

विद्वान आणि सुज्ञ मतदारांनी या आंदोलनाकडे पाहिले की एकच प्रश्न मनात येतो. कालपर्यंत ज्यांना रामलल्लाचे मंदिर हे अंधश्रद्धेचे किंवा राजकारणाचे केंद्र वाटत होते, ज्यांनी अयोध्येतील भव्य राम मंदिर उद्घाटनाच्या ऐतिहासिक सोहळ्याचे निमंत्रण अत्यंत अहंकाराने आणि अधिकृत पत्रक काढून नाकारले, त्यांना अचानक प्रभू श्रीरामाची आठवण कशी झाली? याचे उत्तर सरळ आहे. ही रामभक्ती नाही, हा प्रभू रामाविषयीचा आदर नाही, तर ही आगामी निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून उरलेली राजकीय अब्रू वाचवण्यासाठी चाललेली केविलवाणी धडपड आहे. काँग्रेसच्या या आंदोलनाचा बुरखा टराटरा फाडण्यासाठी आपल्याला फार मागे जाण्याची गरज नाही. २००७ मधील 'सेतू समुद्रम' प्रकल्पाची घटना संपूर्ण देशाने पाहिली आहे. तत्कालीन काँग्रेस प्रणीत यूपीए सरकारने सर्वोच्च न्यायालयात एक प्रतिज्ञापत्र सादर केले होते. या शपथपत्रात एएसआय (भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण) च्या माध्यमातून काँग्रेस सरकारने अधिकृतपणे नोंदवले होते की, प्रभू श्रीराम नावाचे कोणतेही ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व अस्तित्वात नव्हते. रामायण हा केवळ एक काल्पनिक ग्रंथ असून, रामसेतू ही मानवनिर्मित वास्तू नसून केवळ एक नैसर्गिक रचना आहे.

ज्या पक्षाने देशातील करोडो हिंदूंच्या आराध्य दैवताला, त्यांच्या आस्थेला आणि अस्तित्वालाच कायदेशीर कागदपत्रांवर 'काल्पनिक' ठरवले, तो पक्ष आज राम मंदिराच्या रक्षकाची भूमिका वठवत आहे, यासारखा दुसरा मोठा विनोद नाही. जर तुमच्या मते प्रभू रामचंद्र हे काल्पनिक पात्र आहेत, तर मग एका काल्पनिक पात्राच्या मंदिरामध्ये झालेल्या कथित अपहारावरून तुम्ही आंदोलन कसे करू शकता? जर रामच नव्हते, तर मंदिर कोणाचे? आणि जर मंदिर तुमचे श्रद्धास्थान नाही, तर मग हे भजनाचे ढोंग कशासाठी?

जानेवारी २०२४ मध्ये जेव्हा संपूर्ण जग अयोध्येतील प्रभू श्रीरामाच्या भव्य प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे साक्षीदार होत होते, तेव्हा संपूर्ण देशात दिवाळी साजरी केली जात होती. अनेक दशकांच्या संघर्षानंतर, हजारो कारसेवकांच्या बलिदानानंतर आणि कायदेशीर लढाईनंतर रामलल्ला आपल्या मूळ स्थानी विराजमान होत होते. हा सोहळा कोणत्याही एका पक्षाचा नव्हता, तो संपूर्ण भारताचा, प्रत्येक रामभक्ताचा सोहळा होता. श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टने अत्यंत आदराने काँग्रेसच्या सर्वोच्च नेत्यांना या सोहळ्याचे अधिकृत निमंत्रण दिले होते. परंतु, तत्कालीन राजकीय समीकरणांमुळे, विशिष्ट मतपेढी नाराज होईल या भीतीने आणि हिंदूविरोधी मानसिकतेच्या अहंकारातून काँग्रेसने ते निमंत्रण अत्यंत उद्धटपणे नाकारले. हा भाजपचा कार्यक्रम आहे, हा राजकीय सोहळा आहे, अशी अत्यंत बाळबोध कारणे देत काँग्रेस नेत्यांनी अयोध्येकडे पाठ फिरवली. महात्मा गांधींनी ज्या 'रघुपती राघव राजाराम' धून आणि भजनाचा वापर देशात एकात्मता, सत्य आणि अहिंसेचा संदेश देण्यासाठी केला, त्याच भजनाचा वापर आज काँग्रेस पक्ष आपल्या पोकळ आणि ढोंगी आंदोलनासाठी करत आहे. हे प्रभू रामाचे भजन नसून, स्वतःच्या पापांचे क्षालन करण्यासाठी आणि जनतेच्या डोळ्यात धूळ फेकण्यासाठी रचलेला हा एक राजकीय फार्स आहे.

सभागृहामध्ये किंवा टीव्ही स्टुडिओमध्ये बसून प्रभू रामाच्या अस्तित्वावर चिखलफेक करायची, रामभक्तांना हिणवायचे, राम मंदिराच्या उभारणीत कायदेशीर आणि प्रशासकीय अडचणी निर्माण करायच्या आणि जेव्हा जनतेचा रोष समोर येतो, तेव्हा हातात टाळ घेऊन 'रघुपती राघव' म्हणायचे, हा ढोंगीपणाचा पराकोटीचा कळस आहे. जनतेला हे स्पष्टपणे दिसत आहे की, काँग्रेसच्या नेत्यांच्या ओठांवर जरी 'राजाराम' असले, तरी त्यांच्या मनात केवळ 'मतराम' आहे. हे आंदोलन म्हणजे भक्ती नसून, शुद्ध राजकीय नौटंकी आणि हास्यजत्रेचा प्रकार आहे. महाराष्ट्राच्या संदर्भात बोलायचे झाले तर, काँग्रेसच्या या ढोंगी आंदोलनाला 'उबाठा' गटाची साथ मिळणे किंवा त्यांच्या विचारसरणीची सावली पडणे यात आश्चर्य काहीच नाही. ज्यांनी स्वतः सत्तेसाठी हिंदुत्व गहाण ठेवले, त्यांच्यासोबत राहून काँग्रेसलाही आता 'सॉफ्ट हिंदुत्वा'चा पुळका आला आहे. परंतु, अस्सल आणि कल्पित यातला फरक जनतेला चांगलाच ठावूक असतो.

एकीकडे मुंबईत आणि महाराष्ट्रात 'गद्दारी' आणि 'खोके' या शब्दांचा पोपटपंचाळ करायचा आणि दुसरीकडे अयोध्येच्या मंदिरावर हक्क सांगायचा? काँग्रेसने आजवर नेहमीच तुष्टीकरणाचे राजकारण केले. एका विशिष्ट वर्गाची मते मिळवण्यासाठी त्यांनी बहुसंख्य हिंदू समाजाच्या भावनांना नेहमीच पायदळी तुडवले. आज जेव्हा त्यांना जाणीव झाली आहे की, प्रभू रामाशिवाय या देशात गत्यंतर नाही, तेव्हा त्यांनी हे भजनाचे सोंग घेतले आहे. परंतु, वाघाचे कातडे पांघरल्याने कोणी वाघ होत नाही, तसेच हातात टाळ घेतल्याने रामद्रोही हे रामभक्त होऊ शकत नाहीत.

इतिहास साक्षी आहे की, ज्यांनी ज्यांनी प्रभू श्रीरामाचा अवमान केला, त्यांचे राजकीय आणि सामाजिक अस्तित्व या देशातून संपुष्टात आले. काँग्रेस पक्षाची आज जी दुरवस्था झाली आहे, ती त्यांच्या याच कर्माचे फळ आहे. ज्या पक्षाने या देशावर साठ वर्षे राज्य केले, तो पक्ष आज काही जागांसाठी प्रादेशिक पक्षांच्या दारात लाचार होऊन उभा आहे. काँग्रेसचे हे आंदोलन म्हणजे राजकीय पटलावरील एक शुद्ध हास्यजत्रा आहे. ज्याप्रमाणे जत्रेत सोंग घेऊन आलेला बहुरूपी लोकांना हसवण्याचे काम करतो, त्याचप्रमाणे काँग्रेसचे नेते हातात टाळ-मृदंग घेऊन जनतेचे मनोरंजन करत आहेत. जनतेला त्यांच्या या ढोंगीपणाची पूर्ण जाणीव आहे. प्रभू श्रीराम हे सत्य आहेत, ते सनातन आहेत आणि ते या देशाचा आत्मा आहेत. त्यांच्या नावाचा वापर केवळ राजकीय पोळी भाजण्यासाठी करणाऱ्यांना जनता कधीही माफ करणार नाही. काँग्रेसने कितीही आंदोलनांचे नाटक केले, कितीही भजनांचे सोंग घेतले, तरी त्यांचा रामविरोधी इतिहास पुसला जाऊ शकत नाही. नियतीने त्यांना त्यांच्या कर्माची चपराक दिली आहे आणि आगामी काळातही जनता त्यांच्या या दुटप्पी आणि ढोंगी राजकारणाला त्याची योग्य जागा दाखवून दिल्याशिवाय राहणार नाही, हेच सत्य आहे. ■

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### निवडणूक आयोगाने खुलासा करावा

एसआयआरच्या अंतर्गत मतदार नोंदणीची कामे पिंपरी-चिंचवड शहरात विविध शाळा आणि मतदान केंद्रांवर सुरू झाली आहेत. मात्र याबाबत संबंधित सरकारी यंत्रणांकडून कोणताही अधिकृत खुलासा केला गेला नसल्याने बऱ्याच नागरिकांना याची कल्पना नाही. बीएलओ आपल्या घरी येऊन नोंदणी करतील असे आधी सांगण्यात येत होते. मात्र पाऊस आणि प्रतिनिधींकडील हजारो छापील फॉर्म्स घरोघरी नेणे शक्य नसल्यामुळे मतदारांनीच आवश्यक कागदपत्रे घेऊन आपापल्या मतदान केंद्रावर जाऊन नोंदणी करावी असे तेथील नोंदणी अधिकारी सांगत आहेत. त्यांनी दिलेली कारणेही पटण्यासारखी असल्यामुळे त्याबद्दल वाद नाही, पण संबंधित यंत्रणांनी आणि प्रसारमाध्यमांनी याबाबत वर्तमानपत्रे, टेलिव्हिजन आणि आकाशवाणीद्वारे बातम्या/जाहिराती/प्रकटने देऊन खुलासा केला तर या अतिमहत्त्वाच्या कामाची पूर्तता करण्यासाठी मतदारांना मदत होईल. यासाठी आधारकार्ड झेरॉक्स, आपला फोटो बदलायचा असेल तर दोन फोटो आणि ऑनलाईन यादीत आपले नाव सहज शोधण्यासाठी आपला एपिक नंबर असणे आवश्यक आहे, अशी महत्त्वाची माहितीही केंद्रावरील बीएलओ देत आहेत.

**शिवराम वैद्य**/पुणे. ९८५०५१८०१८

■■■

### गगनचुंबी इमारती बांधताना नियमांचे उल्लंघन

दि. ९ जुलैच्या तरुण भारतात आलेल्या बातमीनुसार सत्ता पक्षाच्या प्रस्तावावर बोलताना आ. प्रवीण दटके यांनी नागपूरमधील गगनचुंबी इमारतींमधील अनियमितता मांडली. नागपूर मनपा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात निवासी आणि व्यावसायिक गगनचुंबी इमारतींचे बांधकाम सुरू आहे. यात यूडीसीपीआर, एफएसआय नियम, सेट बॅक, खुल्या जागा, पार्किंग, अग्निसुरक्षा यांचे उल्लंघन होत आहे. आकर्षक जाहिराती आणि खोटी आश्वासनांनी नागरिकांची फसवणूक होते. जाहिरातीतील दाखवलेल्या सुविधा प्रत्यक्षात मिळत नाहीत. इमारत पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र (ओसी) घेताना मोठ्या विकास कामांना नियम डालवून सवलत दिली जाते, असा आरोप दटके यांनी केला आहे. गगनचुंबी इमारतीमुळे पाणीपुरवठा, मलनिस्सारण, वीज, वाहतूक आणि अग्निसुरक्षा यंत्रणावर ताण वाढला आहे. परवानगी देताना नियमांची अंमलबजावणी होते का याची तपासणी व्हावी. विनापरवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली. नागपुरात व विशेषतः लक्ष्मीनगरमध्ये बऱ्याच गगनचुंबी इमारतींचे काम सुरू आहे. मनपाच्या नियमांनप्रमाणे अग्निसुरक्षेसाठी भूखंडाच्या चारही बाजूंना जास्त जागा सोडावी लागत असल्यामुळे या गगनचुंबी इमारती बांधण्यात येत आहे असे दिसते. कंत्राटदाराच्या दृष्टीने इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असे ते म्हणत असतील तरी पण मनपाकडून या इमारतीची ओसी घेणे आवश्यक आहे. इमारतीची ओसी मिळवण्याची प्रक्रिया अतिशय क्लिष्ट असून बराच कालावधी लागतो व त्यामुळे फ्लॅट विकत घेणाऱ्या लोकांना नवीन फ्लॅटमध्ये स्थानांतर होणे कठीण जात आहे. सबब, मनपाने सध्या पूर्ण होत आलेल्या इमारतींना लवकरात लवकर ओसी द्यावी, असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

■■■

### निसर्गाचा लहरीपणा की मानवी नियोजनाचा अभाव ?

आज संपूर्ण महाराष्ट्र आणि देशातील अनेक शहरे एका विचित्र संकटाचा सामना करत आहेत. काही दिवसांपूर्वीच आपण भीषण पाणीटंचाईच्या झळा सोसत होतो. पावसाची वाट पाहताना तहानलेल्या जमिनीकडे डोळे लावून बसलेलो होतो. मात्र, पावसाचे आगमन होताच परिस्थिती एका टोकाकडून दुसऱ्या टोकाला पोहोचली आहे. आज सर्वत्र अतिवृष्टीमुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. या भीषण परिस्थितीकडे पाहताना एक प्रश्न प्रकर्षाने उपस्थित होतो—हा निसर्गाचा कोप आहे की आपल्या नियोजनाचा अभाव? शहरांमध्ये काँक्रीटीकरण इतक्या मोठ्या प्रमाणावर झाले आहे की, पावसाचे पाणी जमिनीत जिरण्यास जागाच उरलेली नाही. पाण्याचा नैसर्गिक निचरा होणारे ओढे, नाले आज अतिक्रमणांच्या विळख्यात अडकले आहेत. परिणामी, थोडा पाऊस पडला तरी शहरांचे रूपांतर तलावात होते. दुसरी धक्कादायक बाब म्हणजे, इतकी अतिवृष्टी होऊनही अनेक धरणे अजूनही पूर्णपणे भरलेली नाहीत. याचे मुख्य कारण म्हणजे आपण पावसाचे पाणी साठवण्याचे, ते जमिनीत जिरवण्याचे कोणतेही ठोस तंत्रज्ञान विकसित केलेले नाही. पावसाचे पाणी नदी-नाल्यांवाटे थेट समुद्राला जाऊन मिळते आणि आपण मात्र पुढील उन्हाळ्यातील पाणीटंचाईच्या चिंतेत असतो. पाऊस पडतो तेव्हा तो साठवून ठेवणे, भूजल पातळी वाढवणे यासाठी कोणतेही नियोजन नाही. आज शहरांमधील 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' ही केवळ एक कायदेशीर अट राहिली आहे, तिचा प्रत्यक्ष वापर नगण्य आहे. ग्रामीण भागात ठिकठिकाणी लहान बंधारे बांधून आणि शहरांमध्ये पावसाचे पाणी जमिनीत जिरवण्यासाठी 'शोषखड्डे' तयार करून आपण पाणी अडवू शकतो. पाणी जिरू शकेल अशा तंत्रज्ञानाचा वापर करणे ही काळाची गरज आहे. ■

**वर्षा आवदे**/नागपूर

# श्री महावीर अर्बन को-ऑप. बँक लि; सोलापूर.

।। धनवृध्दिः समृध्दिः ।।

६०/६१,पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३ ००२.

## INDEPENDENT AUDITOR'S REPORT

As Required Under Section 31 of Banking Regulation Act, 1949 As Applicable to Urban Co-operative Banks and U/s 81(5B) of Maharashtra State Co-operative Societies Act 1960 Read with rule 69(9) of The Maharashtra Co-operative Societies Rules, 1961.

To,
**The Members,**
**Shri Mahavir Urban Co-Operative Bank Ltd.**
60/61, Mangalwar Peth, Solapur

**Report on Financial Statements as a Statutory Auditor**

We have audited the accompanying Financial Statements of Shri Mahavir Urban Co-Operative Bank Limited, Solapur (Hereinafter referred to as the "Bank") as at 31st March, 2026, which comprises the Balance Sheet as at 31st March, 2026 and Profit And loss account for the year then ended 31st March, 2026, and a Summary of Significant Accounting Policies and Other Explanatory Information. The Returns of 5 Branches Audited by us are incorporated in these Financial Statements.

**Management's Responsibility for the Financial Statements**

1. Management is responsible for the preparation of these Financial Statements that give True and Fair View of financial position, financial performance and cash flow of the bank in accordance with the Banking Regulation Act 1949 (as applicable to co-operative societies), the guidelines issued by the Reserve Bank of India and the guidelines issued by the Registrar of Co-operative Societies, Maharashtra, the Maharashtra Co-operative Societies Act, 1960, and Maharashtra Co-Operative Rules, 1961, (as applicable) and Generally Accepted Accounting Principles in India so far as applicable to the Bank. This Responsibility includes the Design, Implementation and Maintenance of Internal Control relevant to the preparation of the Financial Statements that are Free from Material Misstatement, whether due to fraud or error.

**Auditor's Responsibility**

2. Our responsibility is to express an opinion on these financial statements based on our audit. We conducted our audit in accordance with the Standards on Auditing issued by the institute of Chartered Accountant of India. Those Standards require that we comply with ethical requirements and plan, and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free from material misstatement.
3. An audit involves performing procedures to obtain audit evidence about the amounts and disclosures in the financial statements. The Procedure selected depend on the auditor's judgment, including the assessment of the risks of material misstatement of the financial statement, whether due to fraud or error. In making these risk assessments, the auditor considers internal control relevant to the Bank's preparation and fair presentation of the financial statement in order to design audit procedures that are appropriate in the circumstances, but not for the purpose of expressing an opinion on the effectiveness of the Bank's internal control. An audit also includes evaluating the appropriateness of accounting polices used and the reasonableness of the accounting estimates made by management, as well as evaluating the overall presentation of the financial statements.
4. We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our Audit opinion.

**Opinion**

5. In our opinion, and to the best of our information and according to the explanations given to us, the aforesaid financial statements together with the Notes thereon and our comments and observations contained in the Audit Memorandum, 'A', 'B', 'C' and Form No.1 and Form No.7, give the information required by the Banking Regulation Act, 1949 (as applicable to co-operative societies), the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 and the Maharashtra Co-operative Societies Rules, 1961 and guidelines issued by Reserve Bank of India and Registrar of Co-operative societies, Maharashtra in the manner so required and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India :
   a) In the case of the Balance Sheet, of state of affairs of the Bank as at 31st March, 2026;
   b) In the case of the Profit and Loss Account, of the profit for the year ended on that date; and subject to:
   ***i) We have derived the Audit class of the bank on the basis of the figures as per the Profit and Loss account and Balance sheet presented by the bank.***

**Report on other Legal and Regulatory Requirements**

6. The Balance Sheet and the Profit and Loss Account have been drawn up in Form "A" and "B" respectively of the Third Schedule to the Banking Regulation Act, 1949 and provisions of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 and the Maharashtra Co-operative Societies Rules, 1961.
7. **We Report that**
   a) We have obtained all the information and explanations, which to the best of our knowledge and belief were necessary for the purpose of the audit and have found to be satisfactory;
   b) In our opinion, proper books of account as required by law have been kept by the Bank so far as it appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the branches;
   c) The transaction of the bank which have come to our notice have been within the powers of the Bank;
   d) The Balance Sheet and the Profit and Loss Account dealt with by this report, are in agreement with the books of account and the returns;
   e) The accounting standards adopted by the Bank are consistent with those laid down by accounting principles generally accepted in India so far as applicable to Banks except AS-22 pertaining to Accounting for Taxes on Income.
8. As per the information and explanations given to us and based on our examination of the books of account and other records, we have not come across material instances in respect of the details mentioned in the Rule 69(6) of Maharashtra Cooperative Societies Rules 1961.
9. We further report that for the year under audit, the Bank has been awarded "A" classification.

PLACE : SOLAPUR
DATE : 29.06.2026

**For Sunil P Agrawal and Associates**
Chartered Accountants
**CA Sunil P Agrawal**
Partner
M.N. 120694
**UDIN - 26120694LRSBRQ8721**

# श्री महावीर अर्बन को-ऑप. बँक लि; सोलापूर.

SHRI MAHAVIR URBAN CO-OP. BANK LTD. SOLAPUR — अहिंसा परमो धर्मः — ।। धनवृध्दिः समृध्दिः ।।

६०/६१,पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३ ००२. फोनः (०२१७) २६२२९३३, २६२२९४४

## ताळेबंद पत्रक दि. ३१/३/२०२६ अखेर

| ३१/३/२०२५ | भांडवल देणी | | ३१/३/२०२६ |
|---|---|---|---|
| ५०,००,००,००० | अधिकृत भाग भांडवल | ५०,००,००,००० | ५००,०००,००० |
| १९,२८,३४,४२५ | **१) वसूल / भरणा झालेले भाग भांडवल** | १९,२४,४२,९२५ | १९,२४,४२,९२५ |
| ४५,६८,६८,००६ | **२) गंगाजळी व इतर निधी** | ५४,५३,७९,३३५ | ५४,५३,७९,३३५ |
| ८,४९,२३,३२३ | राखीव निधी | ९,६५,२८,६२३ | |
| ५,७०,००,००० | इमारत निधी | ७,३४,७८,८२३ | |
| १,५९,००० | धर्मादाय निधी | १,३८,००० | |
| ४,८२,५०० | कर्मचारी कल्याण निधी | ५,८२,५०० | |
| १७,०४,५६७ | सभासद कल्याण निधी | १८,९४,५६७ | |
| ८०,९०,००० | विशेष राखीव निधी u/s. 36(1)(viii) | १,१०,४०,५०० | |
| १,७०,००,४०० | उत्तम जिंदगी तरतूद | १,७०,००,४०० | |
| २३,०४,४३,९९९ | संशयित व बुडीत निधी तरतूद | २७,०३,१८,६६४ | |
| ५,२३,११,९१६ | संशयित व बुडीत निधी तरतूद २०२४ | ५,२३,११,९१६ | |
| १,५२,३०० | प्रशिक्षण निधी | १,५२,३०० | |
| २,००,००० | गुंतवणूक चढ उतार निधी | ४,००,००० | |
| ४०,००,००० | सिल्व्हर जुबिली फंड | ४०,००,००० | |
| ४,००,००० | गुंतवणूक घसारा निधी | ४,००,००० | |
| ० | पुनर्मूल्यांकन राखीव निधी | १,७१,३३,०४१ | |
| ० | **३) डेफर्ड टॅक्स लायबिलिटी** | ० | ० |
| ५०३,२८,५०,९९२ | **४) ठेवी** | ५३०,२३,३८,६८६ | ५३०,२३,३८,६८६ |
| २३,५०,७३,५७५ | बचत खाते | ३३,००,६२,९९६ | |
| २८,००,०४,६१० | चालू खाते | ३१,४५,४१,७५६ | |
| ४२८,५९,३४,४२२ | मुदत ठेव | ४३८,३५,७५,७४१ | |
| ४,१४,४१,७११ | आवर्तक ठेव | ३,८५,३३,७१९ | |
| ११,३१,२१,८२१ | पिग्मी ठेव | १२,५२,०५,१४५ | |
| ७,७२,७४,८५२ | मुदत संपलेल्या ठेवी | ११,०४,१९,३२८ | |
| ० | **५) बाहेरील कर्जे** | ० | ० |
| ० | **६) वसुलीस आलेली बिले (दुबेरीज)** | ० | ० |
| ३९,३०,००,१९३ | **७) संभाव्य येणी / देणी (दुबेरजी) (Contra Items)** | ४३,५४,५८,८८७ | ४३,५४,५८,८८७ |
| ३९,१२,४४,४०६ | थकीत येणे व्याज | ४३,१०,७९,५३२ | |
| ३,०१,७८७ | डेफ (आर बी आय) | ३,७०,९९६ | |
| १४,५४,००० | बँक गॅरंटी | ४०,०८,३५९ | |
| ११,८६,७१,९१४ | **८) इतर देणी** | ११,१२,९८,२३८ | ११,१२,९८,२३८ |
| ९,८५,५८,३६२ | मुदत ठेवीवरील व्याज देणे तरतूद | ९,१४,५९,०३४ | |
| १०,१८,८५२ | ऑडीट फी देणे | १०,४३,२१७ | |
| ७९,७८,३५६ | लाभांश देणे | २९,९९,७२० | |
| ५९,१०,०२९ | टी.डी. एस. देणी | ८१,८१,२७३ | |
| २६,५७,४७५ | पे ऑर्डर | ३४,३३,१०७ | |
| ५,२०,००० | कर्मचारी सानुग्रह अनुधान | ० | |
| ३,००,००० | कर्मचारी ग्रॅच्यूटी देणे | ३,०१,९८२ | |
| ६०,००० | संड्री क्रेडीटर्स | ० | |
| १०,०८,५०० | कर्मचारी बोनस देणे | ० | |
| ० | सोने मुल्यांन्कार देणी | ४१,५२१ | |
| ३,७२,५०० | एल.आय.सी. कडून आलेली रक्कम देणे | २३,४२,६५८ | |
| ५०,४७९ | एटीएम खाती अनामत | ५०,७६० | |
| २,३७,३६१ | NEFT खाती अनामत | ५९,९६७ | |
| ० | क्लिअरिंग अनामत | १,००,००० | |
| ० | लिलाव अनामत | १२,८५,००० | |
| ४,६२,६३,५१२ | **९) निव्वळ नफा** | २,५९,२०,२५९ | २,५९,२०,२५९ |
| **६२४,०४,८९,०४२** | **एकूण** | | **६६१,२८,३८,३३१** |

| ३१/३/२०२५ | भांडवल देणी | | ३१/३/२०२६ |
|---|---|---|---|
| २९,११,८१,४८८ | **१) रोख शिल्लक** | ३३,७०,३९,६३७ | ३३,७०,३९,६३७ |
| ६९,१३,०३,३०६ | **२) बँक शिल्लक - चालू खाते** | ३७,५३,८६,१५० | ३७,५३,८६,१५० |
| ३,३१९ | महाराष्ट्र राज्य सह बँक | २,९६२ | |
| १४,४७९ | सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | २,००,०८,३१४ | |
| १४,१५,०७,३०६ | स्टेट बँक ऑफ इंडिया बाळी वेस, सोलापूर | १,९१,९६,४८९ | |
| ६,००,२०,४१८ | पंजाब नॅशनल बँक | २,५०,२०,२४३ | |
| २४,४१,९३७ | बँक ऑफ इंडिया | ६,२७,४१,९३७ | |
| ५,७८,०८,७१२ | आय डी बी आय बँक | १,२६,२७,९२३ | |
| ३३,५८,२१९ | आय डी बी आय बँक (ए.टी.एम.) | ३६,७४,०६३ | |
| २१,००,२९,७६८ | आय सी आय सी बँक | ८,००,२९,७६८ | |
| १,७३,२५,६९३ | एच डी एफ सी बँक पुणे | २,१८,७८,५१४ | |
| १०,३१,१५,४६८ | एच डी एफ सी बँक सोलापूर (RTGS/NEFT) | ५,६७,३६,४३० | |
| ६,७७,४७,२०४ | एच डी एफ सि बँक सोलापूर (सि.टी.एस.क्लिअरिंग) | ३,३१,१०,०७७ | |
| ४७,१८,०४९ | आय सी आय सी बँक (युपीआय खाते) | १,६०,९६,०८१ | |
| २,३२,१२,७३२ | आय सी आय सी बँक (IMPS खाते) | २,४२,६३,३४८ | |
| ९४,६७,२९,९६१ | **३) गुंतवणूक** | १६६,२४,३४,२१६ | १६६,२४,३४,२१६ |
| | सरकारी निमसरकारी कर्ज रोखे गुंतवणूक (एस.एल.आर.) | ९३,७५,७०,७५० | |
| १०,०१,८६,००० | केंद्र सरकार कर्ज रोखे | ७,८८,१०,००० | |
| ७३,४४,३०,०४४ | राज्य सरकार कर्ज रोखे | ८५,८७,६०,७५० | |
| | **इतर गुंतवणूक** | ७२,४८,६३,४६६ | |
| २,००० | शेअर्स - सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | २,००० | |
| ४,००,००,००० | मुदत ठेव - एच डी एफ सी बँक | ७,००,००,००० | |
| ७,२१,११,९१७ | मुदत ठेव - आय डी बी आय बँक | ४,४८,६१,४६६ | |
| ० | मुदत ठेव - पंजाब नॅशनल बँक | २२,००,००,००० | |
| ० | मुदत ठेव - आय डी बी आय बँक | ११,००,००,००० | |
| ० | मुदत ठेव - आय सी आय सी बँक | ३,००,००,००० | |
| ० | मुदत ठेव - आय डी एफ सी फस्ट बँक | ३,००,००,००० | |
| ० | मुदत ठेव - बँक ऑफ इंडिया | ८,००,००,००० | |
| ० | मुदत ठेव - इंडसइंड बँक | ५,००,००,००० | |
| ० | मुदत ठेव - एस.वी.सी. (शामराव विठ्ठल सह. बँक) | ९,००,००,००० | |
| ३८५,७४,४७,४५९ | **४) कर्जे** | ३६८,४७,६४,१८६ | ३६८,४७,६४,१८६ |
| | र) तरणी कर्जे | | |
| ५०,८८,७३,४१५ | मुदत ठेव कर्ज (ओडी-व्यवहाराकरिता ) | ५४,६१,८८,२७३ | |
| १५,९२,९२,४५२ | मुदत ठेव कर्ज (ओडी-एकल) | १९,८२,४१,६५५ | |
| ८४,२८,२५६ | पिग्मी ठेव कर्ज (ओडी) | ८९,८०,७४० | |
| १७,३६,०३९ | रिकरिंग ठेव कर्ज (ओडी) | ५,५०,००१ | |
| १०३,९८,१४,७८५ | नजर गहाण कर्ज | ९४,३४,३३,४९३ | |
| ७०,१२,८४,४३१ | नजर गहाण कर्ज (इतर तारण) | ६४,०३,३५,५९२ | |
| ७०,१३,०८३ | वाहन कर्ज | ५९,१२,२०१ | |
| ४,९४,४६,५८४ | मशिनरी तारण कर्ज | ४,१९,९३,९२७ | |
| २,४७,१४,३७६ | सोने तारण कर्ज | ४,७४,८८,७७४ | |
| ३६,९३,३१,१३६ | स्थावर तारण बंदी कर्ज | ३४,८६,१७,५६३ | |
| २,३६,०५,३०३ | गृह कर्ज | २,३७,४१,४१८ | |
| ५८,२२,४२,४४२ | हफ्ते बंदी कर्ज (माल शिल्लक तारण व मालमत्ता तारण) | ५४,२०,२२,४२२ | |
| १,७१,८४,८३३ | कर्मचारी कर्ज | १,५५,७५,७७० | |
| १०,४२,४१,५८५ | गोदाम कर्ज (सि.सि.) | ३,३७,५२,९६६ | |
| ३,८६,५१,६३३ | सोने तारण कर्ज (हफ्ते बंदी) | ७,८९,०४,०३५ | |
| २२,०५,६९,०१३ | वेअर हाऊस पावती तारण कर्ज | २०,८१,५५,५२३ | |
| | ल) विना तरणी कर्ज | | |
| १०,१८,०९४ | वैयक्तिक जामीनकी कर्जे | ८,६९,८३२ | |
| ४१,०६,२०,४९९ | **५) संभाव्य येणी / देणी (दुबेरजी) (Contra Items)** | ४५,३९,७९,९७१ | ४५,३९,७९,९७१ |
| १,७९,२२,०९३ | गुंतवणुकी वरील व्याज येणे | १,८८,९२,०८० | |
| ३९,१२,४४,४०६ | थकीत व्याज (दुबेरजी) | ४३,१०,७९,५३२ | |
| १४,५४,००० | बँक गॅरंटी | ४०,०८,३५९ | |
| ३,०१,७८७ | **६) वसुलीस आलेली बिले (दुबेरीज)** | ३,७०,९९६ | ३,७०,९९६ |
| ३,०१,७८७ | डेफ (आर बी आय) | ३,७०,९९६ | |
| ० | वसुलीस आलेली बिले | ० | |
| ३,५६,११,००४ | **७) स्थावर व जंगम मालमत्ता** | ५,४४,११,४५५ | ५,४४,११,४५५ |
| ३१,९६,८९० | विद्युत साहित्य | ३०,४२,७३१ | |
| ३१,४१,८९६ | फर्निचर | ३३,०१,१२३ | |
| ४३,८०८ | डेड स्टॉक | ३९,५३७ | |
| ४,३५,१४९ | संगणक | ३,६८,२३२ | |
| १७,५५,८५९ | तिजोरी व लॉकर | २७,७६,७६४ | |
| ८,२५,१०४ | कॉम्पुटर सॉफ्टवेअर | ६,०८,९६३ | |
| २,५९,०३,८१४ | शाखा इमारती | २,६८,४७,८१३ | |
| ३,०८,४८३ | स्ट्राँग रूम मार्केट यार्ड शाखा | २,९३,२५१ | |
| ० | पुनर्मूल्यांकन निधी - न्यू पाच्छा पेठ शाखा इमारत | ६६,०१,६३५ | |
| ० | पुनर्मूल्यांकन निधी - मार्केट यार्ड शाखा इमारत | १,०५,३१,४०६ | |
| ७२,९३,५३७ | **८) इतर येणी** | ४,४४,५१,७२० | ४,४४,५१,७२० |
| २३,१८,३३९ | सरकारी कर्ज रोखे प्रीमीयम | ३१,६४,५८६ | |
| ५८,१६५ | अनामत ठेव - महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ | ६३,७७५ | |
| १०,००० | अनामत ठेव - टेलीफोन | १०,००० | |
| ३,३६,०६० | आयकर येणे | ३,३६,०६० | |
| १,७३,२०६ | ॲडव्हानस इन्शुरन्स प्रीमीयम | १,७३,५९६ | |
| २२,८१,८६२ | अनामत ठेव - शाखाकरिता | २२,८१,८६२ | |
| १,६८,००० | ॲडव्हानस बिल्डींग भाडे | १,६८,००० | |
| ६,१०० | अधेसीव्ह स्टँम्प | १०० | |
| ३,५०,९६६ | ए टी एम डेबिट कार्ड | २,१३,१४२ | |
| ३,००,००० | अनामत ठेव - ए पी एम सि | ३,००,००० | |
| ० | सरसाई खाते | ५,००० | |
| ५,००० | सिकेवायसी खाते | ५,००० | |
| १२,८५,८३९ | डीफर्ड टॅक्स असेट्स | १२,८५,८३९ | |
| ० | क्यू आर कोड साउन्ड बॉक्स | १४,७६० | |
| ० | नॉन बँकिंग ॲसेटस् (जागा व इमारत मालमत्ता) | ३,६४,३०,००० | |
| ० | **९) शाखा समन्वय** | ० | ० |
| **६२४,०४,८९,०४२** | **एकूण** | | **६६१,२८,३८,३३१** |

## नफा-तोटा पत्रक दि. ३१/३/२०२६ अखेर

| ३१/३/२०२५ | खर्च | | ३१/३/२०२६ |
|---|---|---|---|
| ३९,३२,७३,३४४ | **१) ठेवी व कर्जा वरील व्याज** | | ४१,५६,३४,५१४ |
| १,६६,७४,२६३ | **२) कर्मचारी वेतन व भत्ते** | | १,७२,८९,३३२ |
| ५,७८,४०० | **३) संचालक मंडळ भत्ते** | | ६,३६,४४५ |
| ९१,४२,८७५ | **४) भाडे, कर, विमा, वीज इ.** | | ९६,१०,१२७ |
| ३,२७,७२४ | **५) कन्सलटन्सी फी** | | २,७१,२६० |
| ५,४५,४६४ | **६) टपाल तार व दूरध्वनी** | | ४,८८,५८१ |
| १२,२५,९०० | **७) लेखापरीक्षण फी** | | १४,३८,५३७ |
| ५२,०८,६५३ | **८) घसारा व देखभाल खर्च** | | ५२,७५,०१६ |
| १३,९६,३३१ | **९) स्टेशनरी, छपाई व जाहिरात** | | ५,९७,०८० |
| १,०५,७१,२६१ | **१०) इतर खर्च** | | १,१८,३६,१४५ |
| १८,१०० | बँक असो. वर्गणी व इतर | ७१,२५० | |
| १,९८,७७० | क्लिअरिंग हाऊस चार्जेस | १,४८,७९२ | |
| ७६,३९,१६४ | पिग्मी कमिशन | ८०,६५,०९४ | |
| ३,६८,८६५ | सर्वसाधारण सभा खर्च | ४,०५,१३३ | |
| १५,२९,१२९ | किरकोळ खर्च | १४,५१,३३६ | |
| ५६,०८६ | प्रशिक्षण खर्च | १५,९७२ | |
| ५६,०५६ | प्रवास खर्च | ७०,४७२ | |
| ०.०० | मुन्द्रांक आणि व ए.पी.एम.सि फी | ०.०० | |
| ७७,३०८ | ए टी एम चार्जेस | २,१३,२३२ | |
| १०,५७८ | ए टी एम एनपीसिआय स्वीच फी | १,५७४ | |
| ६२,२०७ | ए टी एम व्यवहार फी / चार्जेस | १०,००,००० | |
| १७,६२० | वर्धापन दिन खर्च | २७,४८० | |
| ५३७,३७८ | यु पी आय/आय एम पी एस चार्जेस | २,३१,८९५ | |
| ०.०० | व्यवसाय विकास खर्च | १,३३,९१५ | |
| २,३७,८९,१२० | **११) आयकर भरणा** | | २,०२,२६,३५६ |
| ३,००,००,००० | **१२) बुडीत कर्ज निधी तरतूद खर्च** | | ४,००,००,००० |
| १५,००,००० | **१३) उत्तम जिंदगी तरतूद खर्च** | | ०.०० |
| ३०,००,००० | **१४) स्पेशल रिझर्व्ह तरतूद खर्च U/S 36(1)(viii)** | | २९,५०,५०० |
| ४,६२,६३,५१२ | **१५) निव्वळ नफा** | | २,५९,२०,२५९ |
| ५४,३४,९६,८४६ | **एकूण** | | ५५,२१,७४,१५१ |

| ३१/३/२०२५ | उत्पन्न | | ३१/३/२०२६ |
|---|---|---|---|
| ४३,५०,७७,३८२ | **१) दिलेल्या कर्जावरील व्याज** | | ४२,३३,७७,१३९ |
| १०,२१,४४,८०४ | **२) गुंतवणुकी वरील व्याज** | १२,०४,०३,१३२ | १,२०,४०३,१३२ |
| ५८,१६,४४० | मुदतठेव गुंतवणुकीवरील मिळालेले व्याज | **५८,७३,९४०** | |
| ५,९९,२४,१७२ | सरकारी कर्ज रोख्यावरील व्याज | ६,३६,६४,४८७ | |
| ३,६४,०४,१९२ | मुचूअल फंडावरील उत्पन्न | ५,०८,६४,७०५ | |
| ४५,८४४ | **३) कमिशन** | **७३,७७८** | ७३,७७८ |
| ०.०० | **४) सरकारी कर्ज रोखे वरील उत्पन्न** | | २४,७१,११६ |
| ६२,२८,८१७ | **५) इतर उत्पन्न** | ५८,४८,९८६ | ५८,४८,९८६ |
| २८,९४,१३५ | सर्व्हिस चार्जेस | ३०,२८,६८१ | |
| ३,६७,४७२ | लॉकर भाडे | ५,२६,००६ | |
| ५,०५,८०७ | चेक बुक चार्जेस | ४,३०,७०१ | |
| २४,५७,०७४ | प्रोसेसिंग फी | १८,५४,०२१ | |
| ४,३२९ | इतर उत्पन्न | ९,५७८ | |
| ५४,३४,९६,८४६ | **एकूण** | | ५५,२१,७४,१५१ |

अतंर्गत लेखापरिक्षक
तपासले शेऱ्यास पात्र राहून बरोबर आहे
सही
निलेश बंडगर
लिगाडे बंडगर ॲन्ड कंपनी
चार्टर्ड अकौंन्टट्स
FRN 144484W M.No. 167818

तपासले, वैधानिक लेखापरिक्षक अहवालातील
भाग अ, ब, क मधील शेऱ्यास अधिन राहून बरोबर आहे
सही
सुनिल पी. अग्रवाल
सुनिल पी अग्रवाल अँड असोसिएटस्
चार्टर्ड अकौंन्टट्स
FRN 126772W M.No. 120694
UDIN - 26120694LRSBRQ8721

**श्री महावीर अर्बन को-ऑप. बँक लि., सोलापूर.**

| सही/- | सही/- | सही/- | सही/- | सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|---|---|---|---|
| कृष्णाहरी म्हैसूर | शशिकांत कटकम | सीए नितीन एस. नावंदर | सीए नंदकिशोर आर. उदगिरी | नारायण रा. गंजी | संजय बी. सेठिया | दिपक ना. मुनोत |
| व्यवस्थापक | व्यवस्थापक | तज्ञ संचालक | तज्ञ संचालक | संचालक | व्हा. चेअरमन | चेअरमन |



# मोरोक्कोला हरवून फ्रान्स उपांत्य फेरीत

## एमबाप्पे आणि डेम्बेले यांची चमकदार कामगिरी, मोरोक्कोचा २-० ने पराभव

**बोस्टन, १० जुलै**

फ्रान्सने फिफा विश्वचषक २०२६ च्या उपांत्यपूर्व फेरीत मोरोक्कोला २-० ने हरवून सलग तिसऱ्यांदा उपांत्य फेरीत प्रवेश केला. पहिला हाफ गोलरहित राहिला, पण किलियन एमबाप्पे आणि उस्मान डेम्बेले यांच्या गोलमुळे फ्रान्सला एक मोठा विजय मिळाला. आता उपांत्य फेरीत त्यांचा सामना बेल्जियम आणि स्पेन यांच्यातील उपांत्यपूर्व फेरीच्या विजेत्याशी होईल.

फ्रान्सने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ केला. पाचव्या मिनिटाला, डायोट उपामेकानोचा हेडर मोरोक्कोचा गोलकीपर यासिन बोनूने उत्कृष्टरीत्या वाचवला. त्यानंतर नुसेर माझराउईने बॉक्समध्ये एमबाप्पेवर फाऊल केल्यामुळे फ्रान्सला पेनल्टी मिळाली. तथापि, बुनूने कर्णधार एम्बाप्पेच्या पेनल्टीवर एक उत्कृष्ट बचाव केला आणि संपूर्ण पहिल्या हाफमध्ये स्कोअर ०-० राहिला.



आपल्या संघाचा पहिला गोल केल्यानंतर फ्रान्सचा किलियन एमबाप्पे (मध्यभागी), डायोट उपामेकानो (डावीकडे) आणि उस्मान डेम्बेले (उजवीकडे) यांच्यासोबत आनंद साजरा करताना

फ्रान्सने दुसऱ्या हाफमध्येही दबाव कायम ठेवला आणि ६० व्या मिनिटाला, एम्बाप्पेने बॉक्सबाहेरून एक उत्कृष्ट वळणदार शॉट मारून गोल केला व संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. या विश्वचषकातील हा त्याचा आठवा गोल होता. एम्बाप्पेच्या गोलनंतर सहा मिनिटांनी फ्रान्सने दुसरा गोल केला. एम्बाप्पेने उस्मान डेम्बेलेला एक उत्कृष्ट पास दिला आणि डेम्बेलेने शांतपणे चेंडू जाळ्यात टाकून २-० अशी आघाडी घेतली. त्यानंतर फ्रान्सने सामन्यावर पूर्ण नियंत्रण ठेवले आणि मोरोक्कोला पुनरागमन करण्याची कोणतीही संधी दिली नाही.

फ्रान्स सलग तिसऱ्यांदा विश्वचषक उपांत्य फेरीत

या विजयासह, डिडिएर डेशासिनच्या संघाने सलग तिसऱ्यांदा विश्वचषक उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. फ्रान्सने २०१८ मध्ये विश्वचषक जिंकला होता आणि २०२२ मध्ये उपविजेतेपद पटकावले होते. आता, संघाचे लक्ष पुन्हा एकदा अंतिम फेरीवर असेल.

◂ (वृत्तसंस्था)

### नोंदवलेले विक्रम

- किलियन एम्बाप्पेने या विश्वचषकातील सर्व सहा सामन्यांमध्ये गोल केले असून तो गोल्डन बूटच्या शर्यतीत आघाडीवर आहे.

- विश्वचषकात सर्वाधिक कारकीर्दीतील गोल करण्याच्या बाबतीत एम्बाप्पे (२०) आता केवळ लिओनेल मेस्सी (२१) मागे आहे.

- उस्मान डेम्बेले विश्वचषकाच्या एकाच हंगामात पाच गोल करणारा तिसरा फ्रेंच खेळाडू ठरला.

- १८ वर्षे आणि २८० दिवसांचा अयुब बुआदिदी, एक किशोरवयीन खेळाडू म्हणून विश्वचषकात आफ्रिकन संघासाठी पाच सामने खेळणारा पहिला खेळाडू ठरला. ■

# मधल्या फळीच्या नियंत्रणावर सामन्याचा निकाल

**लॉस एंजेलिस, १० जुलै**

माजी भारतीय फुटबॉलपटू रॉबिन सिंगने स्पेन आणि बेल्जियम यांच्यातील फिफा विश्वचषक २०२६ च्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्याबाबत म्हटले की, या हाय-व्होल्टेज सामन्याचा निकाल मोठ्या प्रमाणावर मिडफिल्डवरील नियंत्रणावर अवलंबून असेल. त्यांच्या मते, जो संघ मध्यवर्ती भागात आपले वर्चस्व कायम ठेवेल, त्यालाच उपांत्य फेरीत पोहोचण्याची सर्वोत्तम संधी मिळेल.

फिफा विश्वचषक २०२६ कव्हरेज तज्ज्ञ पॅनेलचे सदस्य असलेल्या रॉबिन सिंग यांनी सांगितले की, हा सामना स्पेनच्या चेंडूवर नियंत्रण ठेवण्याच्या शैली आणि बेल्जियमच्या वेगवान प्रतिहल्ल्यामधील संघर्ष असेल. अशा परिस्थितीत, दोन्ही संघांच्या मिडफिल्डर्सची रणनीती आणि कामगिरी निर्णायक ठरू शकते.

स्पेनकडे रोड्री आणि पेड्रीसारखे मजबूत मिडफिल्डर्स आहेत, तर युवा खेळाडू लॅमिन यामल संघाला आक्रमक धार देतो. दुसरीकडे, बेल्जियमकडे केविन डी ब्रुयन, जेरेमी डोकू आणि लिआंद्रो ट्रोसार्डसारखे खेळाडू आहेत जे कोणत्याही क्षणी सामन्याचे चित्र पालटू शकतात. रॉबिन सिंग यांच्या मते, हा स्पर्धेतील सर्वात रोमांचक सामन्यांपैकी एक असू शकतो.

रॉबिन सिंग यांच्या मते, स्पेनसाठी केवळ चेंडूचा ताबा ठेवणे पुरेसे ठरणार नाही. संघाला मिडफिल्डमधून अधिक वेगाने खेळावे लागेल आणि बेल्जियमच्या मजबूत बचावाला भेदण्याचे मार्ग शोधावे लागतील. ते म्हणाले की, पेद्रीने मिडफिल्डमध्ये अधिक सक्रिय राहण्याची गरज आहे, तर लामिन यामालने अशा ठिकाणी चेंडू स्वीकारला पाहिजे जिथे तो वन-ऑन-वन परिस्थितीत आपल्या वेगाचा आणि कौशल्याचा पुरेपूर वापर करू शकेल.

रॉबिन सिंग यांच्या मते, जेव्हा स्पेनचे फुल-बॅक आक्रमणासाठी पुढे सरकतात, तेव्हा ते बचावफळीच्या मागे जागा तयार करतात.

बेल्जियमचे ट्रोसार्ड आणि डोकूसारखे वेगवान खेळाडू या जागांचा फायदा घेऊ शकतात. त्यांच्या मते, जर बेल्जियमने लवकर गोल केला, तर स्पेनला अधिक आक्रमक व्हावे लागेल, ज्यामुळे त्यांच्या बचावात अधिक जागा निर्माण होऊ शकेल. ◂ (वृत्तसंस्था)

## स्पेन की बेल्जियम, कोण जिंकणार ?




### रोमेलू लुकाकू आणि स्पेनचा कणा निर्णायक ठरेल का?

रॉबिन सिंग म्हणाले की, जर रोमेलू लुकाकू दुसऱ्या हाफमध्ये मैदानात उतरला, तर बेल्जियमचा हल्ला अधिक मजबूत होईल. त्याची ताकद आणि अनुभव स्पेनच्या तरुण बचावपटूंसाठी एक आव्हान ठरू शकतो. ते असेही म्हणाले की, मोठ्या सामन्यांमध्ये संघाचा मजबूत कणा असणे अत्यंत महत्त्वाचे असते. त्यांच्या मते, रोड्री, पेद्री आणि पाऊ कुबार्सी हे स्पेनसाठी महत्त्वाचे खेळाडू आहेत. रोड्री खेळाची गती नियंत्रित करतो, तर पेद्री चेंडू वेगाने पुढे नेण्यात पारंगत आहे. जर स्पेनने बेल्जियमला प्रतिहल्ला करण्याची संधी दिली नाही, तर त्यांना फायदा मिळू शकतो.

रॉबिन सिंग यांनी बेल्जियमचे प्रशिक्षक रुडी गार्सिया यांचे कौतुक केले आणि म्हणाले की, त्यांनी संघाला पूर्वीपेक्षा अधिक संतुलित बनवले आहे. तथापि, त्यांचा विश्वास आहे की बेल्जियम संपूर्ण सामन्यात बचावात्मक रणनीतीचा अवलंब करू शकत नाही. संघाला योग्य वेळी आक्रमण करावे लागेल, विंग्समधून संधी निर्माण कराव्या लागतील आणि सेट-पीस व क्रॉसेसचा पुरेपूर फायदा घ्यावा लागेल. ■

# वाणी कपूरने जिंकला नववा टप्पा

**होसूर, १० जुलै**

भारतीय गोल्फर वाणी कपूरने शुक्रवारी येथे झालेल्या हीरो विमेन्स प्रो गोल्फ टूरच्या नवव्या टप्प्यात अंतिम फेरीच्या शेवटच्या १० होल्समध्ये पाच बर्डीज मारून शानदार कामगिरी केली. वाणीने पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये ७० आणि ६८ गुण मिळवले आणि त्यानंतर अंतिम फेरीत पाच-अंडर ६७ गुण नोंदवले. तिच्या ११ अंडर पारच्या एकूण स्कोअरमुळे ती युवा अन्वी दहिया (७०-६९-६९) पेक्षा तीन शॉट्सने पुढे राहिली. आपल्या पहिल्या व्यावसायिक स्पर्धेत विजयाच्या शोधात असलेली अन्वी दुसर्या स्थानावर बरोबरीत राहिली. अमनदीप ड्राल (६८-६८-७२) ३६ होल्सनंतर आघाडीवर होती, परंतु अंतिम दिवशी सातव्या होलवर बोगी आणि आठव्या होलवर डबल बोगीमुळे ती मागे पडली. त्यानंतर तिने १४ व्या होलवर आणखी एक डबल बोगी केली. दहाव्या होलवर ईगल मारूनही, तिला आपल्या खराब सुरुवातीची भरपाई करता आली नाही. अन्वी आणि अमनदीप आठ अंडर पारच्या एकूण स्कोअरसह संयुक्तपणे दुसर्या स्थानावर राहिल्या. ◂ (वृत्तसंस्था)

# गोल्डन बूटच्या शर्यतीत एम्बाप्पेने साधली मेस्सीची बरोबरी

**फॉक्सबरो, १० जुलै**

विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत मोरोक्कोवर फ्रान्सच्या २-० विजयासह किलियन एम्बाप्पेने गोल्डन बूटच्या शर्यतीत अर्जेंटिनाचा कर्णधार लिओनेल मेस्सीची बरोबरी साधली आहे. सध्याच्या स्पर्धेत आतापर्यंत दोन्ही खेळाडूंनी प्रत्येकी आठ गोल केले आहेत. स्पर्धेतील सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूला दिला जाणारा गोल्डन बूट पुरस्कार जिंकण्याच्या शर्यतीत ते आघाडीवर आहेत.

मात्र, एम्बाप्पेने तीन गोलसाठी साहाय्य केले आहे, तर मेस्सीने केवळ एकदाच साहाय्य केले आहे. एम्बाप्पेने आपल्या विश्वचषक कारकीर्दीत आतापर्यंत २० गोल केले आहेत, जो मेस्सीच्या २१ गोलच्या विक्रमापेक्षा फक्त एक गोलने कमी आहे.



गोल्डन बूटच्या शर्यतीत, दोघांनाही नॉर्वेचा स्टार स्ट्रायकर अर्लिंग हालंड (सात गोल), इंग्लंडचा हॅरी केन (सहा) आणि फ्रान्सचा उस्मान डेम्बेले (पाच) यांच्याकडून कडवी स्पर्धा मिळत आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# पहिल्या फेरीनंतर अदिती संयुक्त ३५व्या स्थानावर

**एव्हियान-ले-बेन्स (फ्रान्स), १० जुलै**

भारतीय गोल्फर अदिती अशोकने अमुंडी एव्हियन चॅम्पियनशिपच्या पहिल्या फेरीत एक-अंडर ७० चा स्कोर केला, ज्यामुळे ती संयुक्त ३५व्या स्थानावर आहे.



लेडीज युरोपियन टूरची पाच वेळा विजेती आणि २०१६ च्या हीरो विमेन्स इंडियन ओपनची चॅम्पियन असलेली अदिती, या स्पर्धेत नवव्यांदा खेळत आहे, परंतु तिला फक्त एकदाच टॉप २५ मध्ये स्थान मिळवता आले आहे. ती आघाडीवर असलेल्या जपानच्या अकी इवाईपेक्षा सात शॉट्सने मागे आहे.

अदितीने पहिल्या नऊ होल्समध्ये दोन बर्डीज केल्या, पण त्याचवेळी तिने दोन बोगीजही केल्या. एक बोगी केल्यानंतर, तिने १४व्या आणि १५व्या होल्सवर सलग दोन बर्डीज केल्या. ◂ (वृत्तसंस्था)

# क्लीन स्वीप टाळण्यासाठी भारत जोमाने खेळणार

## इंग्लंडविरुद्ध पाचवा टी-२० सामना आज

**साउथहॅम्प्टन, १० जुलै**

ब्रिटन दौऱ्यावर आतापर्यंत निराशाजनक कामगिरी करणाऱ्या भारतीय संघाला, शनिवारी येथे होणाऱ्या पाचव्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात इंग्लंडविरुद्ध क्लीन स्वीप टाळायचा असेल, तर खेळाच्या प्रत्येक विभागात चांगली कामगिरी करावी लागेल.

श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने आयर्लंडमधील बेलफास्टच्या दमट आणि वादळी हवामानात आपल्या प्रवासाला सुरुवात केली. त्यानंतर संघाने उत्तर इंग्लंडमधील डरहॅम येथे काही काळ घालवला आणि आता पाच सामन्यांच्या मालिकेतील अंतिम सामना दक्षिणेकडील साउथहॅम्प्टन शहरात खेळणार आहे. या मालिकेतील पहिला सामना पावसामुळे रद्द करण्यात आला होता.



श्रेयस अय्यर आणि हॅरी ब्रूक्स

ब्रिटनमधील सहा शहरांमध्ये (बेलफास्टसह) एक गोष्ट सातत्याने दिसून आली आहे ते म्हणजे अय्यरचे नशीब खराब राहिले आहे. कर्णधार झाल्यापासून तो अजूनही आपल्या पहिल्या विजयाच्या शोधात आहे. २००६ मध्ये भारतीय संघाने पहिला टी-२० आंतरराष्ट्रीय सामना खेळल्यापासून, विजयाशिवायचा हा सर्वात मोठा कालावधी आहे. ओल्ड ट्रॅफर्ड येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या सामन्याचा अपवाद वगळता, भारतीय संघाने खेळाच्या प्रत्येक पैलूमध्ये खराब कामगिरी केली. दुसऱ्या सामन्यात भारत चांगल्या लयीत दिसत होता, पण रवी बिश्नोईच्या १७ व्या षटकाने भारताला विजयापासून वंचित ठेवले.

नॉटिंगहॅममध्ये, भारताने आतापर्यंतची सर्वात खराब फलंदाजी केली आणि ७६ धावांवर सर्वबाद झाला. ब्रिस्टलमध्ये खेळल्या गेलेल्या चौथ्या सामन्यात, संघ प्रत्येक विभागात अपयशी ठरला. आता, भारतीय संघ आपली प्रतिष्ठा वाचवण्यासाठी मैदानात उतरेल. अय्यरच्या कर्णधारपदाच्या सुरुवातीच्या दिवसांतील ०-४ च्या मानहानीकारक पराभवापेक्षा त्याचा कट्टर चाहता १-३ असा पराभव पसंत करेल.

जोफ्रा आर्चर आणि जोश टंग यांच्या वेगवान गोलंदाजीला सामोरे जाण्यात आलेल्या अपयशाबद्दल भारतीय संघ व्यवस्थापन निःसंशयपणे चिंतित असेल. या दोघांव्यतिरिक्त, डावखुरा वेगवान गोलंदाज सॅम करननेही भारतीय फलंदाजांना त्रास दिला आहे. वरुण चक्रवर्ती आणि हर्षित राणा दुखापतीमुळे संघाबाहेर असल्याने, आणि एका षटकात २९ धावा दिल्यानंतर रवी बिश्नोईच्या पुनरागमनाची शक्यता कमी असल्याने, भारताकडे गोलंदाजी विभागात फार कमी पर्याय आहेत.

◂ (वृत्तसंस्था)

### आजचा सामना

**भारत विरुद्ध इंग्लंड**
पाचवा टी-२० सामना
**वेळ :** सायंकाळी ७ वाजतापासून
**स्थळ :** द एजिअल बाऊल, वेस्ट एंड
**थेट प्रसारण :** सोनी स्पोर्ट्सवर

# महिला हॉकी संघाचे नेतृत्व करणार सलीमा टेटे



**आशियाई क्रीडा स्पर्धा**

**नवी दिल्ली, १० जुलै**

अनुभवी मिडफिल्डर सलीमा टेटे १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताच्या २० सदस्यीय महिला हॉकी संघाचे नेतृत्व करेल. सलीमाच्या नेतृत्वाखाली, भारताने गेल्या महिन्यात न्यूझीलंडमध्ये अपराजित राहून एफआयएच नेशन्स कपचे विजेतेपद पटकावत प्रो लीगमध्ये पुनरागमन केले.

भारताचे मुख्य प्रशिक्षक स्योर्ड मारिन म्हणाले, आमच्या संघात ज्युनियर्स, अनुभवी खेळाडू आणि वरिष्ठ खेळाडू यांचे उत्तम मिश्रण आहे, जे एकमेकांकडून सर्वोत्तम कामगिरी करून घेण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. पद्मश्री पुरस्कार विजेती सविता आणि बिच्छू देवी खरिबाम या संघातील दोन गोलकीपर असतील. बचावफळीत सुशीला चाजू, इशिका चौधरी आणि ज्योती यांच्यासोबतच, एफआयएच नेशन्स कपच्या माध्यमातून वरिष्ठ संघात पदार्पण करणाऱ्या लालथंतुलंगी आणि शिल्पी डबास यांना संधी देण्यात आली आहे.

मध्यफळीची जबाबदारी सलीमा, निक्की प्रधान, साक्षी राणा, सुनेलिता टोप्पो, नेहा आणि दीपिका सोरेंग सांभाळतील. आघाडीच्या फळीत लालरेम्सियामी, ऋतुजा पिसाळ, नवनीत कौर, बलजीत कौर आणि दीपिका यांचा समावेश असेल, जिने नेशन्स कपमध्ये सर्वाधिक सहा गोल केले आहेत. मरीन म्हणाले, या संघाने सिद्ध केले आहे की ते फॉर्मात आणि तंदुरुस्त आहेत. आम्हाला विश्वास आहे की हा संघ आशियाई खेळांच्या आव्हानासाठी सज्ज आहे.

**आशियाई स्पर्धेसाठी भारतीय संघ:**

गोलरक्षक : सविता, बिच्छू देवी खरीबम, बचावपटू : इशिका चौधरी, सुशीला चानू, लालथंतुलंगी, ज्योती, शिल्पी दाबस, मिडफिल्डर : सलीमा, निक्की प्रधान, साक्षी राणा, सुनीलिता टोप्पो, नेहा आणि दीपिका सोरेंग, फॉरवर्डः लालरेमसियामी, रुतुजा पिसाल, नवनीत कौर, बलजीत कौर, दीपिका, इशिका आणि ब्युटी डुंगडुंग. ◂ (वृत्तसंस्था)

# मोदी-अल्बानीज यांनी जाहीर केला क्रीडा सहकार्याचा आराखडा

**मेलबर्न, १० जुलै**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांचे ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी शुक्रवारी मेलबर्न क्रिकेट ग्राउंड (एमसीजी) येथे भारत-ऑस्ट्रेलिया क्रीडा सहकार्याचा 'आराखडा' जाहीर केला.

परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रसिद्धी पत्रकानुसार, हा आराखडा क्रीडा प्रशिक्षण आणि खेळाडू विकास, क्रीडा विज्ञान आणि तंत्रज्ञान, आणि क्रीडा उद्योग आणि गुंतवणूक या क्षेत्रांमध्ये सहकार्याला प्रोत्साहन देईल. या सहकार्याचा एक उल्लेखनीय पैलू म्हणजे आगामी बिग बॅश लीगच्या (बीबीएल) उद्घाटन सामन्याची घोषणा, जो चेन्नईतील एम.ए. चिदंबरम स्टेडियम (चेपॉक) येथे खेळला जाईल. हा सामना मेलबर्न रेनेगेड्स आणि पर्थ स्कॉचर्स यांच्यात होईल.



भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ऑस्ट्रेलियन पंतप्रधान अँथनी अल्बानीज ऑस्ट्रेलियातील मेलबर्न येथील मेलबर्न क्रिकेट मैदानावर छायाचित्रासाठी पोझ देताना.

ऑस्ट्रेलिया सरकारच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे, पंतप्रधान अँथनी अल्बानीज आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज मेलबर्नमध्ये भेट झाली आणि त्यांनी घोषणा केली की ऑस्ट्रेलियन मेन्स बिग बॅश लीगचा पहिला सामना यावर्षी डिसेंबरमध्ये चेन्नई येथे खेळला जाईल. भारतात खेळला जाणारा हा पहिला परदेशी क्रिकेट लीग सामना असेल.

त्यात म्हटले आहे की, डिसेंबर महिन्यात भारतभर आयोजित होणाऱ्या 'गुड डे नमस्ते' नावाच्या आठवडाभर चालणाऱ्या महोत्सवाचे हे प्रमुख आकर्षण असेल. या महोत्सवात ऑस्ट्रेलियन सांस्कृतिक, व्यावसायिक आणि क्रीडा कार्यक्रमांचा समावेश असेल. एमसीजी येथे आयोजित या कार्यक्रमात दोन्ही देशांच्या पंतप्रधानांव्यतिरिक्त, व्हिक्टोरियाच्या प्रीमियर जॅसिंटा लन, माजी एकदिवसीय विश्वचषक विजेते पुरुष कर्णधार स्टीव्ह वॉ आणि महिला कर्णधार लिसा स्थळेकर हे देखील उपस्थित होते. परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, या भेटीने भारत-ऑस्ट्रेलिया सर्वसमावेशक सामरिक भागीदारीचे आधारस्तंभ म्हणून क्रीडा, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि लोकांमधील संबंधांचे वाढते महत्त्व अधोरेखित केले. ◂ (वृत्तसंस्था)



# मुचोव्हा आणि नोस्कोव्हा यांच्यात आज अंतिम सामना

**लंडन, १० जुलै**

या वर्षीचा विम्बल्डन महिला एकेरीचा अंतिम सामना चेक खेळाडूंमध्येच होणार हे निश्चित झाले आहे, कारण गुरुवारी झालेल्या दोन्ही उपांत्य सामन्यांमध्ये चेक खेळाडूंनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवले आणि चार वर्षांत तिसरी विम्बल्डन ट्रॉफी जिंकली.

पहिल्या उपांत्य सामन्यात, चेक प्रजासत्ताकच्या कॅरोलिना मुचोव्हाने मॅच पॉइंट वाचवत अमेरिकन कोको गॉफला ६-२, १-६, ७-६ (१२-१०) असे हरवून आपल्या पहिल्या विम्बल्डन अंतिम सामन्यात प्रवेश केला आणि गॉफचे विम्बल्डन जिंकण्याचे स्वप्न भंग केले. दुसऱ्या उपांत्य सामन्यात, चेक प्रजासत्ताकच्या लिंडा नोस्कोव्हाने युक्रेनच्या मार्टा कोस्त्युकवर ६-४, ६-४ असा विजय मिळवून संपूर्ण चेक महिला ग्रँड स्लॅम अंतिम सामना निश्चित केला.

◂ (वृत्तसंस्था)

# आम्ही आमची रणनीती अंमलात आणू शकलो नाही : अय्यर

**ब्रिस्टल, १० जुलै**

इंग्लंडकडून पहिल्यांदाच टी-२० मालिका गमावल्यानंतर भारतीय कर्णधार श्रेयस अय्यरने आपली निराशा लपवली नाही आणि आपला संघ पुन्हा एकदा सर्वच बाबतीत पूर्णपणे अपयशी ठरल्याचे कबूल केले. अय्यरच्या नाबाद ८० धावा करूनही, तिसऱ्या सामन्यात भारताला केवळ १५८ धावांवर सात गडी बाद करता आले. इंग्लंडने अवघ्या १३.५ षटकांतच हे लक्ष्य गाठले.

सामन्यानंतर अय्यर म्हणाला, पुन्हा एकदा, आमची कामगिरी निराशाजनक झाली. आम्ही पुरेशा धावा करू शकलो नाही. अखेरीस, त्यांनी किती लवकर लक्ष्य गाठले हे आम्ही पाहिले. जेव्हा आम्ही गोलंदाजीसाठी मैदानात उतरलो, तेव्हा मी गोलंदाजांना फक्त शक्यतो एकाच लेंथवर गोलंदाजी करण्यास सांगितले. ◂ (वृत्तसंस्था)

# सातारा, सांगली, लातूरचे अधिकारी विठ्ठलाच्या सेवेत

## आषाढी वारी व्यवस्थापनासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची विशेष प्रतिनियुक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जुलै-**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर लाखो वारकरी, भाविक आणि पालखी सोहळ्याच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध व्हावे, यासाठी राज्य शासनाने केलेल्या प्रस्तावाला भारत निवडणूक आयोगाने मंजुरी दिली आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी (ए.इ.आर.ओ) म्हणून कार्यरत असलेल्या सहा अधिकाऱ्यांना २० ते ३१ जुलै या कालावधीत सोलापूर जिल्हा परिषदेकडे तात्पुरत्या स्वरूपात प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात येणार आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आरोग्य, स्वच्छता, पाणीपुरवठा, गर्दी व्यवस्थापन आणि इतर अत्यावश्यक सेवांसाठी अनुभवी अधिकाऱ्यांची आवश्यकता असल्याचे राज्य शासनाकडे कळिवले होते. त्यानुसार ग्रामविकास विभागाने प्रस्ताव सादर केला आणि त्यास भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिली.

निवडणूक आयोगाने दिलेल्या मंजुरीत ही प्रतिनियुक्ती पूर्णपणे तात्पुरत्या स्वरूपाची असल्याचे स्पष्ट केले आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीत त्यांच्या मतदारसंघातील निवडणूक नोंदणी (एस.आय.आर) कामकाज



इतर उपलब्ध (ए.इ.आर.ओ) अधिकाऱ्यांकडे सोपविण्याच्या सूचना आयोगाने दिल्या आहेत. तसेच आषाढी वारीची जबाबदारी पूर्ण होताच संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने मूळ निवडणूक कामकाजावर रुजू व्हावे, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

राज्य शासनाच्या आदेशानुसार सातारा, सांगली, लातूर तसेच इतर मागास बहुजन कल्याण विभागातील अधिकारी सोलापूर येथे कार्यरत राहणार आहेत. या अधिकाऱ्यांना वाहन, इंधन, चालक आणि आवश्यक प्रशासकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देशही सोलापूर जिल्हा परिषदेला देण्यात आले आहेत.

**प्रतिनियुक्तीवर येणारे अधिकारी**

प्रशांत काळे - उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे
सुहास संसारे - गट विकास अधिकारी, सातारा
आनंद मिरगणे - गट विकास अधिकारी, लातूर
आबासाहेब पवार - गट विकास अधिकारी, सांगली
संतोष पाटील - गट विकास अधिकारी, सांगली
गोरख कदम - गट विकास अधिकारी, सातारा

जिल्हा प्रशासनाच्या तयारीला आणखीन बळ

आषाढी वारीच्या काळात लाखो वारकऱ्यांची सुरक्षितता, आरोग्य सेवा आणि मूलभूत सुविधा प्रभावीपणे हाताळण्यासाठी अतिरिक्त प्रशासकीय यंत्रणा उपलब्ध होणार असल्याने जिल्हा प्रशासनाच्या तयारीला आणखी बळ मिळणार आहे. निवडणूक आयोग आणि राज्य शासन यांच्यातील समन्वयातून वारी व्यवस्थापनाला प्राधान्य देत, निवडणूक प्रक्रियेलाही कोणताही अडथळा येऊ नये याची खबरदारी या निर्णयातून घेण्यात आली आहे.

**- कुशल जैन,**
मुख्य कार्यकारी अधिकारी जि प सोलापूर

# अंगणवाडी भरतीला हिरवा कंदील

## ६१ सेविका व ११५ मदतनीस पदे भरणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जुलै-**

सोलापूर जिल्ह्यातील अंगणवाडी केंद्रांमध्ये रिक्त असलेली सेविका आणि मदतनीस पदे भरण्यास अखेर हिरवा कंदील मिळाला असून, २० जुलैपासून भरती प्रक्रियेला अधिकृत प्रारंभ होणार आहे. एकात्मिक बाल विकास सेवा (आय.सी.डी.एस) योजनेअंतर्गत महिला व बालकल्याण विभागाने भरतीची सर्व तयारी पूर्ण केली असून, ६१ अंगणवाडी सेविका आणि ११५ अंगणवाडी मदतनीस अशी एकूण १७६ पदे भरली जाणार असल्याची माहिती जिल्हा महिला व बालकल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले यांनी दिली.

महिला व बालकल्याण विभागाकडून भरतीचे सविस्तर वेळापत्रक, पात्रतेचे निकष, अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक कागदपत्रे आणि निवड प्रक्रियेची माहिती लवकरच जाहीर केली जाणार आहे. त्यामुळे इच्छुक व पात्र महिला उमेदवारांनी शैक्षणिक प्रमाणपत्रे, रहिवासी दाखला, जात प्रमाणपत्र, जन्मतारीख, आधार कार्ड आणि इतर आवश्यक कागदपत्रांची तयारी आतापासूनच करून ठेवावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

महिला व बालकल्याण विभागाकडून भरतीसंदर्भातील वेळापत्रक, पात्रता, अर्ज प्रक्रिया आणि आवश्यक कागदपत्रांबाबतची सविस्तर माहिती लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार आहे. पात्र महिला उमेदवारांनी संबंधित प्रकल्प कार्यालय तसेच जिल्हा परिषदेकडून प्रसिद्ध होणाऱ्या सूचनांनुसार अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले यांनी केले आहे.

जिल्ह्यातील विविध प्रकल्पांमध्ये रिक्त असलेल्या अंगणवाडी सेविका व मदतनीस पदांमुळे बालक, गर्भवती व स्तनदा माता तसेच लाभार्थींना सेवा देण्यात अडचणी निर्माण होत होत्या. ही बाब लक्षात घेऊन रिक्त पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यानुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

भरती प्रक्रियेसंदर्भातील अधिकृत सूचना संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय तसेच जिल्हा परिषद महिला व बालकल्याण विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. उमेदवारांनी कोणत्याही अफवा किंवा अप्रमाणित माहितीकडे लक्ष न देता केवळ अधिकृत सूचनांवरच विश्वास ठेवावा, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## पत्रकार रवींद्र देशमुख यांना अविनाश कुलकर्णी स्मृती पुरस्कार जाहीर

**सोलापूर, दि. १० जुलै-**



ज्येष्ठ पत्रकार कै. अविनाश व्यंकटेश कुलकर्णी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'कै. अविनाश कुलकर्णी स्मृती आदर्श पत्रकार पुरस्कार' यंदा दैनिक लोकमतचे मुख्य उपसंपादक रविंद्र देशमुख यांना जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा सोमवार, १३ जुलै रोजी सकाळी ११ वाजता सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते देशमुख यांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात येणार आहे. कै. अविनाश कुलकर्णी यांनी अनेक वर्षे निस्वार्थ भावनेने पत्रकारिता करत समाजहिताच्या प्रश्नांना वाचा फोडली. पत्रकारितेतील मूल्ये जपत त्यांनी अनेक तरुण पत्रकारांना मार्गदर्शन करून घडविण्याचे कार्य केले. त्यांच्या स्मृती चिरंतन राहाव्यात आणि पत्रकारितेला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने त्यांच्या सहकाऱ्यांपैकी एका सहकाऱ्याने या पुरस्कारासाठी पुढाकार घेतला आहे. यंदा या पुरस्काराचे दुसरे वर्ष आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, सरचिटणीस सागर सुरवसे आणि खजिनदार किरण बनसोडे यांनी केले आहे.

**१३ जुलै रोजी वितरण सोहळा**



## कराटे बेल्ट परीक्षेत फॅबटेक स्कूलचे यश

**सांगोला, दि. १० जुलै-**

विद्यामंदिर इंग्लिश मीडियम स्कूल, सांगोला येथे शिटोकॉन स्पोर्ट्स कराटे अँड डेव्हलपमेंट असोसिएशन यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कराटे बेल्ट परीक्षेत फॅबटेक पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. यामध्ये आदित्य यड्रावकर, समर्थ बुरुंगे, आकांक्षा बुरुंगे यांनी ग्रीन बेल्ट, आरुष्या कांबळे यांनी यलो बेल्ट तसेच राजवीर सपाटे यांनी ब्ल्यू बेल्ट प्राप्त केला. या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशिक्षक सुनील वाघमारे, श्रावणी वाघमारे, निजेंद्र चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल स्कूलच्या सीईओ सारिका रूपनर, प्राचार्य सिकंदर पाटील यांनी विद्यार्थ्यांचा सन्मान केला

# स्वतःची ताकद ओळखा, करिअर घडवा

## बीएमआयटीमध्ये एएसपी वृष्टी जैन यांचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जुलै-**



करिअरमध्ये यशस्वी वाटचाल करण्यासाठी स्वतःच्या क्षमता आणि कौशल्यांची योग्य ओळख करून त्यानुसार ध्येय निश्चित करणे आवश्यक आहे. सातत्यपूर्ण अभ्यास, वेळेचे नियोजन, सकारात्मक दृष्टीकोन आणि शिस्तबद्ध जीवनशैली यांच्याच बळावर स्पर्धात्मक युगात यश मिळिवता येते, असा प्रेरणादायी संदेश सहाय्यक पोलीस अधीक्षक (एएसपी) वृष्टी जैन यांनी दिला.

ब्रह्मदेवदादा माने इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (बी.एम.आय.टी), सोलापूर येथे विद्यार्थ्यांसाठी आयोजित विशेष करिअर मार्गदर्शन व्याख्यानात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपप्राचार्य प्रा. एस. जी. कुलकर्णी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. त्यानंतर कॅम्पस डायरेक्टर प्रा. राहुल माने यांच्या हस्ते वृष्टी जैन यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. एस. बी. जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. या व्याख्यानाचे संस्थेचे अध्यक्ष दिलीपराव माने, उपाध्यक्ष डॉ. पृथ्वीराज माने आणि सचिवा जयश्री माने यांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. निदा शेख व प्रा. उषा दोडमिसे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अदिती शहाणे यांनी केले, तर आभार प्रा. स्वाती घाडगे यांनी केले.


### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे अक्कलकोट (ग्रामीण) ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नं. १००१/४६ क्षेत्र २.०२.०० हे. आर. ही मिळकतीचे खातेदार सोनाबाई दशरथ घोडके, रा. अक्कलकोट (ग्रामीण) यांनी सदरची जमीन भोगवटादार वर्ग - २ ची असल्याने सदर जमिनीची **भोगवटादार वर्ग - २ वरून भोगवटादार वर्ग - १ करीता** आमचे अशिल सोनाबाई दशरथ घोडके यांनी मा. अपर जिल्हाधिकारी सोलापूर (कुळकायदा शाखा) या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे.

तरी उक्त नमूद शेतजमीनीबाबत व त्यामध्ये झालेल्या व्यवहाराबाबत किंवा इतर कुठल्याही प्रकारचे व्यवहाराबाबत किंवा उक्त जमिनीबाबत कोणाचाही करार, लिज, भाडेपट्टा, पोटगी हक्क, वारसाहक्क, बोजा, गहाण, दान, लिन, कर्ज, कोर्ट केसेस, मृत्यूपत्र खरेदी विक्री, साठेखत, पतसंस्थेचा बोजा, सावकारी देणे-घेणे इ. बाबत काही हरकत/तक्रार/हितसंबंध/अधिकार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसांचे आत **मा. अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर (कुळकायदा), सात रस्ता, सोलापूर** या पत्त्यावर आपली हरकत नोंदवावी. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झालेस कोणाचीही हरकत नाही असे समजून उक्त शेतजमीनींचा झालेला खरेदी व्यवहार विधीग्राह्य होणेसाठी पुढील कार्यवाही करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. ता. १०/०७/२०२६

**सही/-**
**ॲड. विजय अ. हर्डीकर**
**बी.एस.एल. एलएल.बी**
**रा. फत्तेसिंह चौक, अक्कलकोट,**
**जि. सोलापूर**
**मो. ९८५००४८१८१**

### जाहीर नोटीस

बार्शी तालुका व विशेषतः वैराग येथील तमाम लोकांना आमचे अशील ऋषिकेश राजेंद्र दिंडोरे, रा. वैराग, ता. बार्शी यांनी दिलेल्या कागदपत्रावरून सांगितल्यावरून जाहीर नोटीस देण्यात येते की, वैराग येथील सर्व रस्त्यावर फेरीवाले, व्यापारी, रस्त्याला लगत गाळा धारक यांनी, सरकारी व वहीवाट करण्याच्या रस्त्यावर अतिक्रमणे केली आहेत. त्यामुळे वैराग मधील अनेक रस्ते अरुंद होऊन, लहान झाले आहेत व अपघाताचे प्रमाण वाढले आहे. आमचे अशील हे समाजकार्य मध्ये सक्रीय असल्याने, त्या साठी आवाज उठवला आहे व संबंधित सर्व अधिकारी यांचेकडे अतिक्रमण काढणेसाठी कारवाई केली आहे. परंतु नगरपंचायत हे अतिक्रमण संदर्भात दखल घेत नसल्याने, सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, आमचे अशील हे वैराग येथील सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमण हटवणे इ. बाबत एक प्रातिनिधिक दावा (Representative Suit) दाखल करणार आहेत.

सदर दाव्यामध्ये आमचे अशील स्वतः सोबतच वैराग गावातील सर्व रहिवासी यांच्या वतीने हा दावा चालवणार आहेत आणि त्यांनाही या दाव्यामध्ये समान हित व अधिकार राहतील.

सबब सदर दाव्याशी संबंधित किंवा सदर दाव्यामध्ये ज्या व्यक्ती/सदस्यांचे हितसंबंध समाविष्ट आहेत आणि ज्यांना या दाव्यामध्ये स्वतः चे म्हणणे मांडायचे आहे, किंवा कोणालाही हरकत घ्यायची आहे, त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी हरकत दाखल करावी. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. आमचे अशील हे सर्वांचे वतीने अतिक्रमण हटवणेबाबत दावा करतील, याची नोंद घ्यावी.

ता. ६/७/२६

**सही/-**
**ॲड. रुपाली डी. तारके**
**बी.एससी.एल.एल.एम,**
**जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**महा/१९३२/२०१३**
**बार्शी मो. नं. ८६६९१३३१३२**

### महापारेषण — सूचना

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

सुशिक्षित बेरोजगार अभियंता (स्था) यांना लॉटरी पद्धतीने कामे वाटपाची योजना महापारेषण कंपनीचे परिपत्रक MSETCL/CO/TRO&M/SE-II/EE-VIII/12883 Dt-05.12.2016 अन्वये लागू केली आहे. या योजने अंतर्गत महापारेषण मध्ये सोलापूर जिल्हा अंतर्गत नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता (स्था) यांना स्थापत्य कामे वाटपासाठी लॉटरी **दि. १७.०७.२०२६** रोजी कॉन्फरन्स हॉल, ४०० के. व्ही उपकेंद्र लांबोटी, सोलापूर येथे आयोजित केली आहे. सदरील ई–प्रकटन हे **दि. ११.०७.२०२६** रोजी प्रसिद्धीस देण्यात येत असून प्रसिद्धीच्या दिनांकापासून कंपनीच्या संकेतस्थळावर व तसेच अउदा स्थापत्य बां. नि. सु. मंडळ रास्ता पेठ पुणे या कार्यालयांच्या सूचना फलकावर उपलब्ध असेल.

For further details visit our website
**http://mahatranso.in**

**सही/–**
**अधिक्षक अभियंता (स्था), (प्र)**
**अउदा स्था. बां.नि.सु.मंडळ पुणे**

### जाहीर समन्स प्रसिध्दीकरण

क्रमांक जमा-२/१५५/एसआर/४८/२०२६

**बार्शी येथील मे. तहसिलदार सो. यांचे न्यायालयात**

**१) ज्ञानदेव गोरख जाधव,** -- **अर्जदार**
रा. बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर

**विरुद्ध**

१) गयाबाई किसन गरड,
२) आशा विश्वनाथ गरड,
३) दिपक विश्वनाथ गरड, -- **सामनेवाला**
४) विजय विश्वनाथ गरड,
५) अजय विश्वनाथ गरड,
रा. बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर

ज्याअर्थी, सदरचा अर्ज यातील अर्जदार यांनी मौजे बार्शी ता. बार्शी येथील जमीन गट नं. ९४६/२ चे ७/१२ उताऱ्यावरील क्षेत्र दुरुस्ती करणेबाबत ई-हक्क प्रणालीवरून दाखल केलेल्या अर्जाचे अनुषंगाने ग्राम महसुल अधिकारी, बार्शी यांनी प्रकरणी दुरुस्ती करणेबाबतचा अहवाल इकडील कार्यालयास सादर केलेला आहे. सदर अर्जाचे कामी तुम्ही हजर राहावे म्हणून तुम्हांला वर अर्जात नमूद केलेल्या अर्जदार यास माहित असलेल्या वरील पत्त्यावर मे. न्यायालयामार्फत यापूर्वी नोटीस पाठविले असता तुम्ही सदर अर्जामध्ये नमूद पत्त्यावर राहता किंवा कसे याबाबत कोणताही खुलासा मिळत नाही व तुम्ही सध्या कोठे राहता याबाबत सखोल चौकशी केली असता तुमचा पत्ता मिळून येत नाही त्यामुळे तुमचे विरुद्धचे सदर अर्जाच्या नोटीसीची बजावणी होत नाही.

त्याअर्थी, तुम्ही सामनेवाला यांनी सदर अर्जाचे कामी सदर जाहीर समन्स प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर सदर प्रकरणाची पुढील नेमली ता. १३/०८/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता मे. कोर्टात या अर्जाचे कामी स्वतः अगर कुलमुखत्यार यांचे मार्फत विधिज्ञामार्फत हजर राहून व आपला पत्ता मेमो दाखल करून तुमचे म्हणणे याकामी दाखल करावे. तुम्ही सदर अर्जाचे कामी नेमलेले तारखेस हजर न राहिल्यास अगर तुमचे म्हणणे दाखल न केल्यास तुमचे काही म्हणणे नाही, असे समजून मे. कोर्टाचे तुमचे विरुद्ध एकतर्फा आदेश होतील. मागाहून तक्रार चालणार नाही.

कळावे हे जाहीर समन्स प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिले. दिनांक:-०९/०७/२०२६

**सही/-**
**एफ. आर. शेख**
**तहसिलदार बार्शी**


## हरि ओम संस्थेकडून महाप्रसाद वाटपाची जय्यत तयारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जुलै-**

श्री शेगांव गजानन महाराजांची पालखीचे दिनांक १८ जुलै रोजी दुपारी ३ वाजता कुचन हायस्कूल येथे मुक्कामी राहणार आहे. पालखीतील वारकऱ्यांना दरवर्षीप्रमाणे हरि ओम विणकर बाग बहुद्देशीय संस्थेकडून महाप्रसाद दिले जाते. सदर महाप्रसादाची तयारी हरि ओम कडून केला जात असल्याची माहिती लक्ष्मीकांत दांडी यांनी दिली. सदर महाप्रसादाची तयारीसाठी अध्यक्ष बालाजी जंगम, हिरालाल धुळम, गणेश सिद्धम, अशोक यज्जा, इराण्णा चंशेट्टी , बालाजी दोन्ता, रुक्मण्सा दौलताबाद, संजीव नादरगी, अंबादास दिकोंडा आदी परिश्रम घेत आहे. महाप्रसादमध्ये वरण भात ( चारू बुव्वा) वांगी भाजी, घरगट्टा, कांदा भजी, जिलेबी, चपाती असा मेनू आहे.


### ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँक लि., सोलापूर

नोंदणीकृत पत्ता ११३ अ, सिध्देश्वर पेठ, जि. प. समोर, सोलापूर
प्रधान कार्यालय- टीपी नं.२, जीप्लॉट प्लॉट नं.९७, श्री सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, रविवार पेठ, सोलापूर

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेचे जाहीर लिलाव व विक्री नोटीस**

या जाहीर प्रकटनाद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमच्या बँकेचे थकबाकीदार कर्जदार सुनिल हरीभाऊ पवार यांचे जप्त केलेली खालील मिळकत मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १००, नियम ८५ अन्वये त्यांच्याकडील जावक क्रमांक कक्ष४/कबँक/ब्रह्मदेव माने बँक/कलम-१००-नियम-८५/४२८९/२०२४ दि.०३/१०/२०२४ रोजीच्या आदेशान्वये बँकेच्या नावे हस्तांतरीत करण्यात आले असून तसा सदर जप्त मिळकत उताऱ्यावर भोगवटदार सदरी बँकेचे नाव लागलेले आहे. सबब सदर मिळकतीचे मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सोलापूर यांचे कार्यालय यांनी त्यांचे आदेशान्वये जा.क्र.कक्ष४/कबँक/ब्रह्मदेवदादा माने बँक/अपसेटप्रा/१६९८/२०२६ दि.२०/०५/२०२६ रोजी वाजवी किंमत मंजूर करून दिलेली आहे. बँकेच्या मालकीच्या व प्रत्यक्षात कब्जात असलेल्या व खाली दर्शविण्यात आलेल्या परिशिष्टातील नमूद सदर मिळकतीचा जाहीर लिलाव ठेवण्यात आलेला आहे. तरी ज्यांना लिलावात भाग घ्यावयाचा आहे त्यांनी वार सोमवार दि. १७/०८/२०२६ रोजी वेळ सकाळी ११.०० वाजता ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँक लि., सोलापूर मुख्य कार्यालय जी ९७, श्री सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, रविवार पेठ, सोलापूर येथे उपस्थित रहावे.

**परिशिष्ट**

| मिळकतदाराचे नाव | गाव शहर | सिसन/गट क्षेत्र | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँक लि., सोलापूर | मौजे नेहरू नगर ता.उत्तर सोलापूर जि.सोलापूर | सर्व्हे नं ७/१प्लॉट नं ८३ क्षेत्र ९२.९० चौ.मी. बांधकाम क्षेत्र १३४.०१ चौ.मी. | १,००,०००/- |
| दि. १६/०८/२०२६ अखेरचे येणेबाकी | रु. ३३,१३,२०४/- दि. १७/०८/२०२६ पासून होणारे व्याज, दंड व्याज, इतर खर्च | | |

**टिप** : १) लिलावात भाग घेणार यांनी दि. १४/०८/२०२६ पुर्वी कार्यालयीन वेळेत बयाणा रक्कम रू.१,००,०००/- डिमांड ड्राफ्ट अथवा पे ऑर्डर ने भरणा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.
२) लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाच्या दिवशी लिलावापुर्वी वाचून दाखविण्यात येतील.
३) लिलाव झाल्यानंतर लिलाव रक्कमेच्या २५% रक्कम त्यादिवशी व उर्वरीत ७५% रक्कम मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सोलापूर यांची परवानगी मिळाल्यानंतर भरावी लागेल.
४) लिलाव मिळकती संबंधी अधिक माहीती करीता बँकेच्या प्रधान कार्यालयास संपर्क करावा.
५) लिलावा संबंधी सर्व अधिकार मा.व्यवस्थापक ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँक लि., सोलापूर यांना असून याबाबत त्यांचा निर्णय अंतीम राहील.

**दि. ११/०७/२०२६**
**स्थळ : सोलापूर**

शिक्का

**सही/-**
**व्यवस्थापक**
**ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँक लि., सोलापूर**

### श्रीराम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (एसएआरसी)

SHRIRAM Asset Reconstruction

**( विविध एसएआरपीएल ट्रस्टचे विश्वस्त म्हणून काम करत आहे )**

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीराम हाऊस, क्रमांक ४, बुर्किट रोड, टी. नगर, चेन्नई – ६०००१७. **कॉर्पोरेट कार्यालय:** युनिट क्रमांक एफएफ-ए-०५, ए विंग, पहिला मजला, आर्टगिल्ड हाऊस, फिनिक्स मार्केट सिटी, एलबीएस मार्ग, कुर्ला (पश्चिम), मुंबई-४०००७०, **फोन क्रमांक-**१८०० १२० २३८९; contact@truhomefinance.in

**सार्वजनिक सूचना: स्थावर मालमत्तेची ई-लिलाव-सह-विक्री सूचना**

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अधिनियम, २००२ तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ मधील नियम ६, ८(६) व ९ तसेच परिशिष्ट–IV-A मधील तरतुदींनुसार स्थावर मालमत्तेच्या ई-लिलाव विक्रीची सूचना.**

सर्व सामान्य जनतेस व विशेषतः कर्जदार, तारणकर्ता / कर्ते आणि जामीनदाराना येथे सूचना देण्यात येत आहे कि, खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता ज्या सुरक्षित कर्जदाराकडे गहाण ठेवल्या आहेत/ आकारल्या आहेत, आता **श्रीराम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड**, विविध SARPL ट्रस्टच्या विश्वस्त म्हणून काम करत आहेत [नोंदणीकृत असाइनमेंट करारांद्वारे आर्थिक मालमत्तेच्या असाइनमेंटनुसार] SARFAEI कायद्याच्या कलम (5) अंतर्गत, खाली नमूद केलेल्या कर्जदारांसह विविध कर्जदारांशी संबंधित आर्थिक मालमत्ता, मूळ कर्जदाता/नियुक्तकर्ता टूहोम फायनान्स लिमिटेड **(पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)** कडून, त्याद्वारे निर्माण केलेल्या अंतर्निहित सुरक्षा हितासह, त्यावरील सर्व हक्क, मालकी आणि व्याजासह, मिळवले आहे. ज्याचा प्रत्यक्ष ताबा मूळ कर्जदाता/नियुक्तकर्ता/श्रीराम मालमत्ता पुनर्निर्माण प्रायव्हेट लिमिटेड (SARC) च्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, म्हणजेच **SARC-ट्रस्ट-५ च्या विश्वस्त** म्हणून सुरक्षित धनको, कर्ज मंजुरीचा अभिहस्तांकक आणि असाइनर टूहोम फायनान्स लिमिटेड [पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे] द्वारे वितरित केले आहे, नियम ६,८ आणि ९ सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ नुसार तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे, कर्जदार आणि जामीनदारांकडून SARPL म्हणजेच सुरक्षित कर्जदाराला, पुढील व्याज, शुल्क, खर्च इत्यादींसह थकबाकीची रक्कम वसूल करण्यासाठी खाली नमूद केलेल्या लिलाव वेळापत्रकानुसार **"जसे आहे तिथे आहे", "जसे आहे जे आहे" आणि "जे काही आहे ते"** या आधारावर विकले जाईल. कर्जदार आणि जामीनदारांचे तपशील, देय रक्कम, स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन आणि त्यावर ज्ञात असलेले बोजा, जर असतील तर, राखीव किंमत, बयाणा रक्कम ठेव वाढीव बोली, लिलावाची तारीख आणि तपासणीची तारीख देखील खालीलप्रमाणे दिली आहे:

| कर्ज खाते क्रमांक, ट्रस्ट असाइनरचे नाव आणि नाव / मूळ कर्जदात्याचे नाव | कर्जदार/सहकर्जदार/जमानतदार/तारण ठेवण्याऱ्यांचे नाव | १३(२) मागणीची तारीख आणि रक्कमसूचना | राखीव किंमत (रु.) आणि वाढीव बोली | लिलावाची तारीख व वेळ | संपर्क व्यक्ती तपशील – (एओ व निवारण समूह ) |
|---|---|---|---|---|---|
| **SHLHSOLR0000342 ट्रस्ट अकाउंट नंबर- SARC – TRUST-५ अंतर्गत टूहोम फायनान्स लिमिटेडसह** | **१. श्री. धनाजी हरी बनसोडे (कर्जदार) २. सौ. सविता धनाजी बनसोडे (सह-कर्जदार)** | मागणी सूचना दिनांक : १०.०९.२०२४ दिनांक ०६.०९.२०२४ रोजी कर्ज खाते अंतर्गत देय असलेली रु. १३,६३,५३३/- (अक्षरी रुपये तेरा लाख त्रेसष्ट हजार पाचशे तेहतीस फक्त). | रु. १३,५१,५४३/- (अक्षरी रुपये तेरा लाख एकावन्न हजार पाचशे त्रेचाळीस फक्त). **बोली वाढविणे :** रु. २०,०००/- | **३० जुलै, २०२६** | **श्री. अशफाक पटका मो. क्र. ९८१९४१५४७७ श्री. सुमेश मित्तल मो. क्र. ९९९३५८७७९७ श्री. मयुरेश जाधव मो. क्र. ९८३३०१७२२१ श्री. गणपत कावठेकर मो. क्र. ९७६४३३८८२२** |
| **ताबा दिनांक व ताबा प्रकार** | **ज्ञात अधिभार** | | **बयाणा ठेव रक्कम (ईएमडी ) (रुपयात )** | **लिलावाची वेळ: दुपारी १२.३० ते ०१.३०** | **मालमत्ता पाहणीची तारीख : १६.०७.२०२६ वेळ : दु १२.०० ते ३.०० वा** |
| **२१ जून, २०२५ आणि भौतिक ताबा** | ज्ञात नाही | | (राखीव किमतीच्या १०%) : रु. १,३५,१५५/- **ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख : २९ जुलै, २०२६ वेळ सकाळी १०.०० ते संध्याकाळी ०५.००** | | |

**संपत्तीचे विवरण**

मौजे इस ता. पंढरपूर, जि. सोलापूर, महाराष्ट्र – ४१३३०४ येथील गट क्र. ८०/१/बी/१/ए मधील ले-आऊट प्लॉट क्र. ०९, क्षेत्रफळ २७८.८१ चौ. मीटर, त्यावरील बांधलेल्या "शिवाजी अपार्टमेंट" या इमारतीतील चौथ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ०७, क्षेत्रफळ ६०.३९ चौ. मीटर, यासह संबंधित सर्व हक्क व उपभोगाधिकार.चतु:सीमा :पूर्वेस : बाजूची मोकळी जागा (Side Margin)पश्चिमेस : फ्लॅट क्र. ०८दक्षिणेस : बाजूची मोकळी जागा उत्तरेस : बाजूची मोकळी जागा

**१. विक्रीच्या सविस्तर अटी व शर्ती, बोली अर्ज (Bid Form) तसेच इतर माहितीसाठी सुरक्षित कर्जदाता/असाइनी/मेसर्स श्रिराम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संकेतस्थळास https://www.shriramarc.com किंवा आमच्या लिलाव संस्थेच्या https://www.bankeauctions.com या संकेतस्थळास भेट द्यावी. अधिक माहितीसाठी किंवा सहाय्यासाठी ऑफिस क्र. १०१, पहिला मजला, बिल्डिंग क्र. १६, सुवर्णरेखा बुलेवार्ड, घोडके चौक, प्रभात रोड, पुणे – ४११ ००४ येथे संपर्क साधावा किंवा वरील तक्त्यात नमूद केलेल्या संपर्क क्रमांकांवर आमचे व्यावसायिक भागीदार मेसर्स टूहोम फायनान्स लिमिटेड यांच्याशी संपर्क साधावा. सदर अटी व शर्ती बोली अर्जासोबत बोलीदारांनी स्वाक्षरी करून सादर करणे बंधनकारक आहे. सदर सूचना अधिकृत अधिकारी/सुरक्षित कर्जदाता यांच्या अधिकृत संकेतस्थळावरही उपलब्ध आहे.**
**२. इच्छुक बोलीदारांनी इस्ट मनी डिपॉझिट (EMD) ची रक्कम "SARC-TRUST-5" या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारे अथवा RTGS/NEFT द्वारे खालील खात्यात जमा करावी.खात्याचे नाव : SARC-TRUST-5बँकेचे नाव : ICICI Bank Limitedशाखा : Mumbai – Kamani Kurla Westखाते क्रमांक : 196205004628IFSC Code : ICIC0001962 सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ मधील नियम ९(१) च्या तरतुदीनुसार वैधानिक १५ दिवसांची विक्री सूचनायाद्वारे कर्जदार/तारणदार/हमीदार यांना सूचित करण्यात येते की, वरीलप्रमाणे नमूद केलेली थकबाकीची रक्कम तसेच अद्ययावत व्याज व इतर अनुषंगिक खर्च ई-लिलावाच्या दिनांकापूर्वी अदा करावा. अन्यथा सदर तारण मालमत्तेचा ई-लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल आणि उर्वरित थकबाकी असल्यास ती व्याज व खर्चासह कायदेशीर मार्गाने वसूल करण्यात येईल.**

ठिकाण - सोलापूर
दिनांक - ११-०७-२०२६

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी (श्रीराम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड)
( विविध एसएआरपीएल ट्रस्टचे विश्वस्त म्हणून काम करत आहे )

# ३० कोटींच्या ठेवींसाठी बंधन बँकेचा प्रस्ताव फेटाळला

- आयसीआयसीआय बँकेत गुंतवणुकीला स्थायी समितीची मंजुरी
- स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते यांच्या निर्णयाचे स्वागत
- मक्तेदारांच्या २८ कोटींच्या बिलाचा निर्णय 'होल्ड'वर , पुढील बैठकीत फैसला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० जुलै -**

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि जीएसटी अनुदानाच्या मिळून ३० कोटी रुपयांच्या मुदत ठेवी बंधन बँकेत ठेवण्याचा वादग्रस्त प्रस्ताव अखेर स्थायी समितीने फेटाळला. सार्वजनिक निधीच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत ही रक्कम आयसीआयसीआय बँकेत मुदत ठेव म्हणून गुंतविण्याचा निर्णय शुक्रवारी झालेल्या स्थायी समितीच्या सभेत घेण्यात आला. तसेच एयू फायनान्स बँकेत असलेल्या मुदत ठेवी काढून त्या राष्ट्रीयकृत बँकेत वर्ग करण्याचे निर्देशही प्रशासनाला दिले.

महापालिका स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत या विषयावर सविस्तर चर्चा झाली. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी हा कर्मचाऱ्यांच्या हक्काचा निधी असून, त्याच्या गुंतवणुकीत केवळ अधिक व्याजदर नव्हे तर निधीची सुरक्षितता, बँकेची विश्वासार्हता आणि आर्थिक स्थैर्य या बाबींनाही प्राधान्य दिले पाहिजे, अशी भूमिका सभापती चाकोते यांनी मांडली.महापालिकेने मुदतठेवींसाठी विविध राष्ट्रीयकृत व खासगी बँकांकडून व्याजदर मागविले होते. त्यामध्ये बंधन बँकेने वार्षिक ७ टक्के व्याजदराची ऑफर दिल्याने प्रशासनाने त्या बँकेत ३० कोटी रुपयांची मुदत ठेव करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवला होता. मात्र या प्रस्तावावर सभेत आक्षेप नोंदविण्यात आला. तत्पूर्वी नगरसेविका श्रद्धा पवार यांनी बंधन बँकेत ठेवी ठेवण्यास विरोध दर्शवत राष्ट्रीयकृत बँकेत ठेवी ठेवण्याची मागणी आयुक्तांकडे केली होती. परिणामी हा प्रस्ताव वादग्रस्त ठरला होता. आता नवीन निर्णयानुसार आय सी आय सी बँकेकडून ६.६० टक्के व्याज दर मिळणार आहे.

दरम्यान या सभेत महापालिकेच्या २०२५-२६ च्या अंदाजपत्रकातील विविध देखभाल दुरुस्ती, निवडणूक मानधन व इतर लेखाशीर्षकांमधून झालेल्या कामांची सुमारे ४५ कोटींची बिले माहे मार्च २०२६ अखेर अदायगीसाठी प्रलंबित हाती. सद्यस्थितीत २८ कोटींची मक्तेदारांची बिलाची रक्कम अदायगीसाठी प्रलंबित आहे. आयुक्तांच्या मान्यतेने हा प्रस्ताव आला होता. यामध्ये प्रलंबित देयकांच्या आदायगीसाठी २८ कोटींची वाढीव तरतूद करण्यासाठी २०२६-२७ च्या अंदाजपत्रक बजेट लेखा शीर्षकात अंतर्गत तरतूद करण्यासाठी प्रस्ताव आला होता. त्यावर दीर्घ चर्चा झाली. या विषयावर आक्षेप नोंदविण्यात आले. नगर अभियंता आणि मुख्यलेखापाल विभाग यांच्यात दोन मतप्रवाह असल्याचे दिसून आले. बजेट लेखा शीर्षकातून वाढ व कमी करण्यास मान्या दिली असली तरी २८ कोटींची बिले अदा करण्यापूर्वी स्थायीची मान्यता घेणे आवश्यक आहे. व्यवस्थित बिले सादर करण्यासाठी एक महिन्याची मुदत दिली आहे. यामुळे हा निर्णय स्थगित ठेवला असल्याचे सभापती रंजिता चाकोते यांनी सांगितले.

याच सभेत रस्त्या संदर्भातील विविध ७ विषयांनाही मान्यता मिळाली. या अंतर्गत सुमारे ४४ रस्त्याच्या कामांना मंजुरी देण्यात आली. तसेच महापालिकेतील गट क अंतर्गत ५१ पदे भरली आहेत. उर्वरित ५१ पदे आऊटसोसिंगद्वारे भरण्यास स्थायी समितीने यावेळी मान्यता दिली. आयुक्तांकडून तातडीचा विषय मान्यतेसाठी पाठविला होता.

### एयू फायनान्स बँकेतील १४ कोटींच्या ठेवीही राष्ट्रीयकृत बँकेत वर्ग

स्थायी समितीने यावेळी एयू फायनान्स बँकेत असलेल्या महापालिकेच्या ठेवीही काढून त्या राष्ट्रीयकृत बँकेत ठेवण्याचे निर्देश दिले. शासन आदेशात एयू बँक समाविष्ट नाही. प्रशासनाने त्यामध्ये ठेवी ठेवण्याचा निर्णय घेतला, तो योग्य नाही. तातडीने राष्ट्रीयकृत बँकेत त्या ठेवी ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. या निर्णयामुळे सार्वजनिक निधीच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिल्याची भावना व्यक्त होत आहे. सभापती रंजिता चाकोते यांच्या भूमिकेचे स्वागत करण्यात येत आहे.



### अमोल शिंदे यांच्याकडून सभापतीच्या निर्णयाचे कौतुक

स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते यांनी खाजगी बंधन बँकेचा प्रस्ताव ठेवीसाठी फेटाळला. त्या ऐवजी आयसीआयसीआय बँकेत ठेवी ठेवण्यास मान्यता दिली. इतकेच नव्हे तर एयु बँकेतील १४ कोटीच्या ठेवीही राष्ट्रीयकृत बँकेत ठेवण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे असे सांगत शिवसेना गटनेते अमोल शिंदे यांनी सभापती रंजिता चाकोते यांच्या निर्णयाचे कौतुक केले.

# मंगळवेढ्यात १० लाख २० हजार रुपयांची फसवणूक

## एजंटासह पाच जणांविरोधात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. १० जुलै -**

उजनी प्रकल्पात गेलेली जमिन तुम्हाला सोलापूर जिल्हयात मिळवून देतो, असे म्हणून मंगळवेढा येथील दुय्यम निबंधक कार्यालयात डमी आधार कार्ड व डमी व्यक्ती उभी करून १० लाख २० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी पाच जणांविरूध्द मंगळवेढा पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.



सन्मुख महादेव चौगुले रा.सिध्दापूर,पांडुरंग प्रल्हाद गायकवाड(एजंट,डोणगांव),पप्पू जालिंदर दातीर (रा.गणेशवाडी जि.अहिल्यानगर),नामदेव सोपान काळे (रा.सिपोरा),सुदाम साधू कायगुडे (रा.गणेशवाडी) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. फिर्यादी अतुल शेंडगे (रा. वाटलूज ता.दौंड,जि.पुणे ) यांचे आजोबा जगन्नाथ पायगुडे यांच्या नावावर गणेशवाडी ता.कर्जत येथे शेत गट नं.६३/२/ब मधील ०.८० आर. इतकी जमीन व ६४/१ मधील २ हेक्टर ०.५ एवढी जमिन होती. महाराष्ट्र शासनाने उजनी प्रकल्प चालू केल्याने आजोबांच्या नावे असलेली जमिन शासनाने संपादित केली होती. २०१७ मध्ये फिर्यादीचे आजोबा आजारी पडल्याने त्यांना सांभाळण्याकरीता वाटलूज या गावी आणले होते. वरील आरोपींनी घरी येवून आजोबांना तुमची उजनी प्रकल्पात गेलेली जमीन तुम्हाला सोलापूर जिल्हयात मिळवून देतो. तुम्ही फक्त कागदावर अंगठा करा,आम्ही सर्व कागदपत्रे बघून घेतो असे सांगितले.

दरम्यान १९ जुलै २०२५ रोजी आजोबा मयत झाले. उजनी प्रकल्पाच्या जमिनीचे काय झाले याची चौकशी केली असता फिर्यादीस समजले की, आजोबांना शासनाकडून पुनर्वसनाची सिध्दापूर ता.मंगळवेढा येथील जमीन गट २९८/१ क्षेत्र ६.८८ आर,क्षेत्रापैकी ०.८० आर जमीन नावावर होती. सदर क्षेत्राचा ७/१२ उतारा काढला असता त्याची खरेदी विक्री शिवकुमार मल्लिकर्जुन सोमगुंडे (रा. अरळी,ता.मंगळवेढा) यांचे नावे झाली असल्याचे दिसून आले.

फिर्यादीने मंगळवेढा येथील दुय्यम निबंधक कार्यालयाकडून सदर संपादित जमिन खरेदी विक्रीच्या नकला काढून घेतल्या. त्यावेळी ही जमिन २९/८/२०१९ रोजी विक्री झाल्याचे निदर्शनास आले. सदर खरेदीच्या दस्तावरील फोटो व दस्तास जोडलेल्या आधार कार्ड फोटो एकाच व्यक्तीचा होता. हा फोटो फिर्यादीच्या आजोबाचा नव्हता. त्यामुळे फिर्यादीच्या आजोबांची फसवणूक झाल्याचे दिसून आल्याने पोलिसांत १० लाख २० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. याचा अधिक तपास पोलिस उपनिरिक्षक नागेश बनकर हे करीत आहेत.

# जुन्या पद्धतीनुसार महाविद्यालय स्तरावरच होणार प्रवेश

## विद्यापीठ विकास कृती समितीच्या विरोधानंतर विद्यापीठावर नामुष्की

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० जुलै -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील प्रवेश प्रक्रियेबाबत एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी प्रसिद्ध केलेले ऑनलाइन थेट प्रवेशाचे परिपत्रक रद्द केले आहे. आता पूर्वीप्रमाणेच महाविद्यालयांच्या स्तरावर प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार असल्याचे नऊ जुलैच्या पत्राने संलग्न महाविद्यालयाना कळवले आहे.

विद्यापीठाने १६ जून २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या परिपत्रक क्र. १० नुसार, महाविद्यालयातील सर्व प्रवेश शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून थेट विद्यार्थ्यांमार्फत ऑनलाइन त्यांच्या लॉगिन आयडीमधून करण्याचे आदेश दिले होते. मात्र, आता विद्यापीठाने हे परिपत्रक रद्द केले आहे.

ऑनलाइन थेट प्रवेशासाठी विद्यापीठाने नुकतीच सर्व महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची कार्यशाळाही घेतली होती. परंतु 'यू-डीलीप' या नवीन सॉफ्टवेअरवरील ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया तात्काळ रद्द करण्याची मागणी विद्यापीठ विकास कृती समितीने कुलगुरूंकडे केली होती.

समितीच्या अध्यक्षा पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील आणि सचिव प्राचार्य डॉ. महेंद्र कदम यांनी या प्रक्रियेतील गंभीर त्रुटींवर बोट ठेवले होते. त्यानुसार विद्यापीठाने चर्चेसाठी सोमवारी १३ जुलै रोजी दुपारी ३ वाजता कृती समिती व सर्व प्राचार्यांची एक ऑनलाईन बैठकही आयोजित केली होती. मात्र ही बैठकही विद्यापीठाने रद्द केली आहे

### कृती समितीची शुक्रवारची बैठकही रद्द

ही बैठक ऑनलाइन ऐवजी ऑफलाइन घ्यावी अशी भूमिका कृती समितीची होती. या ऑनलाइन बैठकीत काय भूमिका घ्यायची यासाठी कृती समितीने शुक्रवारी (दि. १०) सोशल महाविद्यालयात कृती समिती व सर्व प्राचार्यांची बैठक बोलावली होती. कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी कोणत्याही प्राधिकरणामध्ये चर्चा न करता तसेच त्यावर चर्चा न करता घेतलेला हा निर्णय अंगलट येतो की काय? या भावनेने ही बैठक न घेता ऑनलाइन बैठकही रद्द केली आणि परिपत्रकही मागे घेतले. त्यामुळे कृती समितीनेही ही बैठक रद्द केली आहे.

### नवीन आदेशानुसार प्रवेश प्रक्रिया आणि अटी

- डिजिटल डेटा आणि पेमेंट सबमिशन: महाविद्यालयांनी प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांचा डिजिटल डाटा आणि पेमेंट त्यांच्या संगणक प्रणालीमधून विद्यापीठास 'एपीआय'द्वारे सादर करणे बंधनकारक आहे. ही प्रक्रिया प्रवेश पूर्ण झाल्यापासून १५ दिवसांच्या आत करणे आवश्यक आहे.

२. निष्काळजीपणास महाविद्यालय जबाबदार: प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर १५ दिवसांत डिजिटल डेटा आणि पेमेंट विद्यापीठास प्राप्त न झाल्यास, विद्यार्थ्यांचे जे काही नुकसान होईल, त्याला सर्वस्वी संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील, असा स्पष्ट इशारा विद्यापीठाने दिला आहे.

### दुचाकींच्या धडकेत जखमी वृद्ध इसमाचा मृत्यू

**सोलापूर, दि.१० जुलै -**

दोन दुचाकींच्या धडकेत जखमी झालेल्या वृद्ध इसमाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज शुक्रवारी दुपारी एक वाजता मृत्यू झाला. महासिद्ध मल्लप्पा पुजारी (वय ८२, रा.कुसूर, ता. दक्षिण सोलापूर ) असे मयत इसमाचे नाव आहे. ते ६ जुलै रोजी सायंकाळी दुचाकीवर मागे बसून विजापूर मकनापूर मार्गावरून निघाले असताना विजापूर येथील गांधी चौकात त्यांना पाठीमागून एका दुचाकीने धडक दिली होती. यात मार लागून गंभीर जखमी झाल्याने त्यांना विजापूर येथील एका खाजगी दवाखान्यात उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात साडू मलकारी यांनी बेशुद्धास्थेत ८ जुलै रोजी पहाटे दाखल केले. त्यांचा उपचारादरम्यान आज मृत्यू झाला.

### तरुणाने सळईने मारून घेऊन डोके घेतले फोडून

**सोलापूर, दि.१० जुलै -**

एका १९ वर्षाच्या तरुणाने दारूच्या नशेमध्ये सळईने मारून घेऊन डोके फोडून घेतले. शेळगी भागात आज शुक्रवारी पहाटे ही घटना घडली शुभम फाळके (वय १९, रा. योगायोग नगर, शेळगी सोलापूर) असे तरुणाचे नाव आहे. तो आज पहाटे घरात असताना त्याने स्वतः डोक्यावर सळईने मारून घेतले. यात डोके फुटून जखमी झाल्याने त्याला उपचाराकरिता शेजारी शुभम बनकर यांनी पहाटे दोन वाजता दाखल केले.

# पहिल्याच सभेत ४.२३ कोटींच्या उपक्रम विवरणपत्रकाला मंजुरी

## महिला व बालकल्याण समितीची सभा; स्थायी समितीचीही मंजुरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० जुलै -**



सोलापूर महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीच्या पहिल्याच सभेत २०२६-२७ या वर्षातील ४ कोटी २३ लाख ७८ हजार १८ रुपयांच्या योजना व उपक्रमनिहाय विवरणपत्रकाला मंजुरी दिली.

महापालिकेतील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात शुक्रवारी सभापती निर्मला जंगम यांच्या अध्यक्षतेखाली समितीच्या पहिल्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा करून या निर्णयांना मंजुरी दिली. मागील आर्थिक वर्षातील १ कोटी १३ लाख ७८ हजार १८ रुपये अखर्चित निधी कॅरी फॉरवर्ड करण्यास मान्यता दिली. चालू वर्षासाठी मंजूर ३ कोटी १० लाख रुपयांच्या तरतुदीसह एकूण ४.२३ कोटी रुपयांच्या निधीतून विविध योजना राबविण्याचा निर्णय झाला. या विवरणपत्रकाला स्थायी समितीनेही मंजुरी दिली आहे. त्यानंतर आता महापालिका सर्वसाधारण सभेकडे मंजुरीसाठी हा विषय पाठवणार आहे.

यंदा महिला व मुलींसाठी पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आधारित कौशल्यविकास अभ्यासक्रम, स्वयंरोजगारासाठी व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण तसेच रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. याशिवाय मनपा अभ्यासिकांमध्ये विद्यार्थ्यांसाठी वाचनालय व प्रदर्शनी उपक्रम, तर मनपा शाळांमध्ये शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी वॉटर प्युरिफायर व पाण्याच्या टाक्यांची सुविधा उपलब्ध करून देणार आहे.

महिला, मुली आणि बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी १९ योजना व उपक्रमांसाठी ३ कोटी ८५ लाख ६० हजार ५२० रुपयांची तरतूद केली आहे. तसेच महापालिका शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून गुणवत्तापूर्ण शिक्षणाला प्राधान्य देणार असल्याचे जंगम म्हणाल्या.

### मनपा महिला व बालकल्याण समितीच्या प्रमुख योजना

- महिलांसाठी पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण
- एआय आधारित कौशल्य विकास अभ्यासक्रम
- स्वयंरोजगारासाठी व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण
- रोजगार मेळाव्यांचे आयोजन
- मनपा अभ्यासिकांमध्ये वाचनालय व प्रदर्शनी
- मनपा शाळांमध्ये वॉटर प्युरिफायर व पिण्याच्या पाण्याची सुविधा

### महिलांच्या सक्षमीकरणावर भर

महिलांचे सक्षमीकरण, बालकांचा सर्वांगीण विकास आणि मनपा शाळांतील सुविधांवर भर देणाऱ्या विविध नाविन्यपूर्ण योजना यंदा राबविण्यात येणार आहेत.

- **निर्मला जंगम**, सभापती, महिला व बालकल्याण समिती, सोलापूर महानगरपालिका.

# दुचाकीवरून पडलेल्या विवाहितेचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० जुलै -**

कुत्रा आडवा आल्याने दुचाकीवरुन खाली पडून जखमी झालेल्या तरुण विवाहितेचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात गुरुवारी रात्री दहा वाजता मृत्यू झाला.

भाग्यश्री दयानंद कोळी (वय ३०, रा. कारकल दक्षिण सोलापूर) असे मयत विवाहितेचे नाव आहे. ती १४ जून रोजी सकाळी आळंद येथून सोलापूरकडे दुचाकीवर मागे बसून येत असताना कर्नाटक राज्यातील सरसंबा येथे दुचाकीसमोर कुत्रा आडवा आला.

ब्रेक दाबताच ती खाली पडली. यात डोक्याला मार लागून जखमी झाल्याने तिला दोन ठिकाणच्या खाजगी दवाखान्यात उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात पती दयानंद कोळी यांनी ४ जुलै रोजी दाखल केले असता तिचा उपचारादरम्यान गुरुवारी रात्री मृत्यू झाला.

# उजनी धरण आज निम्मे भरणार

## पाटबंधारे विभागाची माहिती; पुण्यातील विसर्गात सातत्याने घट

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १० जुलै -**

उजनी धरणामध्ये येणाऱ्या पाण्याच्या आवकेत घट होत चालली आहे. गुरुवारी दि. ९ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजेपर्यंत दौंड येथून उजनी धरणात ५३ हजार ७१७ क्यूसेकने विसर्ग सुरू होता. तर आज शुक्रवारी सायंकाळी १४ हजार ६२ क्यूसेक इतका येत आहे. आज अखेर धरणातील पाणीसाठ्याची टक्केवारी ४५.८७ टक्क्यांवर पोहोचली आहे. उद्या सकाळी ५० टक्के साठा होत असल्याचा विश्वास पाटबंधारे विभागाने व्यक्त केला आहे.

पुणे जिल्ह्यातील भीमा खोऱ्यात गेल्या चार दिवसांपासून पावसाची उघडझाप होत आहे. परिणामी भीमा नदीवरील बहुतांश धरणांमधून सुरू असलेले विसर्ग कमी जास्त करण्यात येत आहेत. दौंड येथून उजनी धरणाकडे सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या विसर्गातही गेल्या दोन दिवसांपेक्षा आज जास्त घट झाली आहे. प्रत्येक तासाला विसर्ग कमी होत असल्याने नदीपात्रातील पाण्याचा प्रवाहही मंदावला आहे. पुणे जिल्ह्यात पावसाची उघडीप कायम राहिल्यास या विसर्गात आणखी घट होण्याची शक्यता जलसंपदा विभागाकडून व्यक्त केली जात आहे.

उजनी धरणातील पाणीसाठ्यात मात्र हळूहळू वाढत आहे. शुक्रवार दि. १० जुलै रोजी सायंकाळी ७ वाजेपर्यंत उजनी धरणातील एकूण पाणीसाठा ८८.२३ टीएमसी इतका झाला आहे. उपयुक्त पाणीसाठा २०.५७ टीएमसी झाला आहे. भीमा खोऱ्यात पुन्हा दमदार पावसाला सुरुवात झाल्यास उजनी धरणातील पाणीसाठ्यात वेगाने वाढ होऊन धरणाची वाटचाल पन्नास टक्क्यांच्या पुढे होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. परिणामी उजनी धरणावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. अनेक शेतकरी ऊस लागवड करण्यासाठी धावपळ करू लागले आहेत. मात्र उजनीच्या डाव्या व उजव्या कालव्यातून पाणी सोडण्याचा अजूनही पाटबंधारे विभाग व राजकीय नेते मंडळींनी कुठली हालचाल न केल्याने शेतकऱ्यांचे याकडे लक्ष वेधले आहे

### उजनी धरणाची पाणीस्थिती (दि. १० जुलै सायंकाळी ७:०० वा.)

- धरणातील पाणीपातळी : ४९४.०८० मीटर
- जलसाठ्याचे क्षेत्रफळ : २६३.२० चौ. कि.मी.
- एकूण पाणीसाठा : २,४९८.७३ दशलक्ष घनमीटर ( ८८.२३ टीएमसी)
- उपयुक्त पाणीसाठा : ६९५.९२ दशलक्ष घनमीटर (२४.५७ टीएमसी)
- उपयुक्त पाणीसाठ्याची टक्केवारी : ४५.८७ टक्के
- दौंड नदी मापन केंद्रावरील नदीची पाणीपातळी : ४९९.११० मीटर
- दौंड येथून पाण्याची आवक : १४,०६२ क्यूसेक









हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## महत्वाचे...

### राज्य व जिल्हा प्रशासनातर्फे धर्मपुरी येथे स्वागत कमान

**माळशिरस, दि. १० जुलै-**
धर्मपुरी येथे पालखी सोहळ्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून ग्रामविकास व पंचायत राज विभाग महाराष्ट्र शासन आणि जिल्हा प्रशासन सोलापूर यांच्या वतीने वारकऱ्यांसाठी स्वागत कमान बसविण्यात आली. सदर कामाची पाहणी गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे, सहायक गटविकास अधिकारी भारत कोळेकर, विस्तार अधिकारी कोळी, जिल्हा परिषद बांधकाम विभाग माळशिरस उपअभियंता आय. बी. मुलानी, कृषी अधिकारी सरवदे, ग्रामविकास अधिकारी निंबाळकर, स्थापत्य अभियंता अंकुश थोरात तसेच धर्मपुरी येथील पदाधिकारी बाजीराव काटकर यांनी केली.

### रागाने का बघतो म्हणून तरुणास मारहाण

**सोलापूर, दि. १० जुलै-**
रागाने का बघतो असे म्हणून एका तरुणाला लाथा बुक्क्याने मारहाण करण्यात आली. लक्ष्मी मार्केट जवळील रिक्षा स्टॉप येथे आज पहाटे एक वाजता ही घटना घडली. शोएब अ.वाहीद माडी (वय २९, रा. शनिवार पेठ, सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. तो आज पहाटे लक्ष्मी मार्केट येथील रिक्षा स्टॉपजवळ असताना त्याला अझीम सादिक चौधरी, अमजा रहीम चौधरी यांनी मारहाण केली. मुका मार लागल्याने त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात मित्र इम्रान शेखने पहाटे तीन वाजता दाखल केले.

### एमआयडीसी भागात तरुणीने घेतला गळफास

**सोलापूर, दि. १० जुलै-**
अज्ञात कारणावरून तरुणीने घरातील छताच्या पंख्याला साडीने गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. आज शुक्रवारी सकाळी साडेअकरा वाजता एमआयडीसी भागात ही घटना घडली. कविता स्वप्निल बासुतकर (वय २० ) असे त्या तरुणीचे नाव आहे. शुक्रवारी सकाळी तिने गळफास घेतल्याचे आईच्या निदर्शनास पडले.

# ‘नद्याजोड’ने बळीराजाची कर्जमुक्ती

## राज्यातील जाणकार शेतकऱ्यांचा आशावाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जुलै-**
केवळ कर्जमाफीतून शेतकऱ्यांना तात्पुरता दिलासा मिळेल. अशावेळी नद्याजोड प्रकल्प पुर्णत्वास नेल्यास राज्यातील बळीराजा कायम स्वरुपी कर्जाच्या ओझ्यातून मुक्त होईल, असा आशावाद राज्यातील जाणकार शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

राज्यातील जाणकार शेतकऱ्यांनी दै. तरूण भारतशी बोलताना आपल्या भावना व्यक्त केल्या. शेती ही महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून, राज्यातील लाखो कुटुंबांच्या उपजीविकेचा मुख्य आधार आहे. मात्र, हवामानातील अनिश्चितता, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, वाढता उत्पादन खर्च, बाजारपेठेतील धान्याच्या भावाची चढ-उतार आणि कर्जाचा वाढता बोजा यामुळे अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडतात. अशा परिस्थितीत तात्पुरती कर्जमाफी देणे पुरेसे नसून शेतकरी पुन्हा आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल, उत्पादनक्षम बनेल आणि भविष्यात कर्जाच्या दुष्टचक्रात अडकणार नाही, अशी दीर्घकालीन व्यवस्था उभी करणे आवश्यक ठरते. यामुळे शासनाने नद्याजोड प्रकल्प राज्यभर राबविल्यास दुष्काळग्रस्त



भागातील शेतकऱ्यांसाठी तो प्रकल्प अमृत संजीवनी ठरेल, असा सूर त्यांच्या बोलण्यातून निघाला.

शेतकऱ्यांचे हित साधण्यासाठीच राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देणारी आणि सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांची ही योजना केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित नसून, शाश्वत कृषी विकासाच्या व्यापक धोरणाचा महत्त्वाचा भाग म्हणून पाहिली जात आहे. मात्र या एका वेळच्या मदतीने शेतकऱ्यांचे भले होणार नाही तर कोणत्याही दुष्काळी स्थितीतही शेतकरी जगावा म्हणून 'नद्याजोड' सारखा महत्वाकांक्षी प्रकल्प राबवून शेतकऱ्यांचे दारिद्रय कायस्वरूपी हटविण्याची गरज आहे. राज्यभर नद्याजोड प्रकल्प राबविला तर ज्या भागात अतिवृष्टी होईल, त्या भागातील पाणी इतर दुष्काळी जिल्ह्यांकडे वळविता येईल आणि राज्यभरातील शेतकऱ्यांना या पाण्याचा मोठा लाभ होईल; इतकेच कायतर यामुळे कोणासही दुष्काळी स्थितीचा सामना करावा लागणार नाही.

कर्जमुक्तीचा मूलभूत उद्देशही शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देणे हा असला, तरी त्यामागील व्यापक विचार अधिक महत्त्वाचा आहे. कर्जमुक्त झालेला शेतकरी पुन्हा पतपुरवठ्यास पात्र होतो. नव्याने पीककर्ज उपलब्ध झाल्यामुळे तो वेळेवर बियाणे, खते, औषधे आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर करू शकतो. यामुळे उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होते आणि शेती अधिक सक्षम बनते. यामध्ये शासनाने नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचाही विशेष विचार केला आहे. त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूद केली आहे. यामुळे आर्थिक शिस्त, वेळेवर कर्जफेड आणि बँकिंग व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होण्यास मदत होईल. ही बाब शाश्वत वित्तीय व्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जाते. शाश्वत कृषी विकासाचा विचार केवळ कर्जमुक्तीपर्यंत मर्यादित राहत नाही.

नद्याजोड प्रकल्प राबवून विस्तार झाल्यास पावसावरील अवलंबित्व कमी होईल. आधुनिक तंत्रज्ञान, सूक्ष्म सिंचन, जलसंधारण आणि पीक नियोजन यामुळे उत्पादनात वाढ होईल आणि शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती होईल, असेही शेतकऱ्यांनी सांगितले.

### सात कलमी कार्यक्रम ठरेल प्रभावी

राज्य शासनाचे उद्दिष्ट शेतकऱ्यांना बारमाही सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून देणे, शेतीमालावर आधारित उद्योग-व्यवसायांना चालना देणे, कृषी प्रक्रिया उद्योगांचा विस्तार करणे, शेतीमालाला योग्य बाजारभाव मिळवून देणे, तातडीच्या पणन व्यवस्था विकसित करणे, वेळेवर पतपुरवठा सुनिश्चित करणे आणि ग्रामीण भागात आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे हे आहे. या सर्व बाबी परस्परपूरक असून, त्यांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास आणि शेती अधिक लाभदायक होण्यास मदत होईल.

# ‘त्या’ शिक्षकांची आंतरजिल्हा बदली करा

## ग्रामविकासमंत्र्यांकडे मागणी; राज्यातील सुमारे ३८ हजार शिक्षकांच्या अपेक्षा

### सोलापुरातील ६०० हून अधिक शिक्षकांचाही लाभ होण्याची शक्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० जुलै -**
राज्यात पवित्र पोर्टलच्या माध्यमातून नियुक्त शिक्षकांना आंतरजिल्हा बदलीचा अधिकार मिळावा, यासाठी डि.एड.-बी.एड. स्टुडंट्स व पवित्र पोर्टल शिक्षक भरती संघटनेने ग्रामविकास मंत्र्यांकडे निवेदन देत शासन निर्णयात तातडीने सुधारणा करण्याची मागणी केली आहे. या निर्णयामुळे राज्यातील सुमारे ३८ हजार शिक्षकांना दिलासा मिळू शकतो. सोलापूर जिल्ह्यातील ६०० हून अधिक शिक्षकांच्याही अपेक्षा या निर्णयाशी जोडल्या गेल्या आहेत.

शासनाने २१ जून २०२३ रोजी काढलेल्या निर्णयानुसार टेटच्या माध्यमातून जिल्हा परिषद शाळांमध्ये नियुक्त शिक्षकांना आंतरजिल्हा बदलीचा अधिकार नाकारला आहे. संबंधित शासन निर्णयातील कलम ४ व ५ नुसार दुसऱ्या जिल्ह्यात जाण्यासाठी शिक्षकांना राजीनामा देऊन पुन्हा टेट प्रक्रियेत सहभागी होण्याची अट घातली आहे. ही अट अन्यायकारक असून नैसर्गिक न्याय, समान संधी आणि कर्मचारी हिताच्या तत्त्वांना छेद देणारी असल्याचा संघटनेचा दावा आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, राज्यातील इतर शासकीय कर्मचारी आणि जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना आंतरजिल्हा बदलीची सुविधा उपलब्ध असताना पवित्र पोर्टलद्वारे नियुक्त शिक्षकांना त्यापासून वंचित ठेवणे योग्य नाही. वैद्यकीय कारणे, पती-पत्नी एकत्रीकरण, दिव्यांगत्व तसेच इतर अपरिहार्य कौटुंबिक परिस्थितीमुळे अनेक शिक्षकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

संघटनेने शासनाकडे २१ जून २०२३ च्या शासन निर्णयातील कलम ४ व ५ रद्द करण्याची, पवित्र पोर्टल शिक्षकांसाठी स्वतंत्र व पारदर्शक आंतरजिल्हा बदली धोरण जाहीर करण्याची, विशेष प्रकरणांना प्राधान्य देण्याची तसेच शिक्षणसेवकांनाही समान सेवा हक्कांसह बदलीचा अधिकार देण्याची मागणी केली आहे.

संघटनेचे राज्य उपाध्यक्ष प्रशांत शिरगुर यांनी सांगितले की, पवित्र पोर्टलमधून स्वजिल्ह्याबाहेर नियुक्त शिक्षकांना शिक्षणसेवक कालावधी पूर्ण झाल्यानंतरही आपल्या जिल्ह्यात परतण्यासाठी पुन्हा टेट परीक्षा द्यावी लागते, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. शिक्षकांच्या आर्थिक, मानसिक आणि कौटुंबिक अडचणींचा विचार करून शासनाने आंतरजिल्हा बदलीसाठी विशेष सवलत द्यावी आणि त्यांना न्याय मिळवून द्यावा. शासनाने या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतल्यास सोलापूर जिल्ह्यातील शेकडो शिक्षकांच्या स्वजिल्ह्यात परतण्याचा मार्गही मोकळा होणार आहे.



# बी-टूच्या निर्णयानंतर चाळींमध्ये फटाक्यांची आतषबाजी

## नागरिकांनी एकमेकांना मिठाई भरवून व्यक्त केला आनंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० जुलै -**
शहरातील बी-टू कराच्या कक्षेत असलेल्या तब्बल ८१३ मिळकतींना प्रश्न मार्गी लागल्याने प्रभावित नागरिकांनी जल्लोष साजरा केला. निर्णयानंतर संबंधित चाळींमध्ये फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. नागरिकांनी एकमेकांना मिठाई भरवून आनंद व्यक्त केला. तसेच पाठपुरावा करणारे आमदार देवेंद्र कोठे यांचे विशेष आभार मानले.

नगरसेवक विनोद भोसले म्हणाले, 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पावले' या म्हणीप्रमाणे आमदार देवेंद्र कोठे यांनी कामगार चाळीतील रहिवाशांना दिलेला शब्द पूर्ण केला आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली मागणी त्यांनी शासन दरबारी पाठपुरावा करून मार्गी लावली. त्यामुळे हजारो नागरिकांना आर्थिक दिलासा मिळाला आहे.

या प्रसंगी नगरसेवक विनोद भोसले, सामाजिक कार्यकर्ते नागेश खरात, विजय भोईटे, लक्ष्मण जगताप, शिवानंद कटीकर, पंढरीनाथ ताटे, सूर्यकांत शिरसागर, प्रदीप सावंत, दत्ता कोळी, रोहित खताळ, शाहू सलगर, बसू कोळी यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

### स्वातंत्र्य सेनानी डॉ. कृ. भि. अंत्रोळीकर यांच्या अर्धपुतळ्याचे आज अनावरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जुलै-**



स्वातंत्र्य सेनानी डॉ. कृ. भि. अंत्रोळीकर स्मृती न्यासातर्फे अंत्रोळी (ता. दक्षिण सोलापूर) येथे उभारण्यात आलेल्या स्वातंत्र्य सेनानी डॉ. कृ. भि. अंत्रोळीकर यांच्या अर्ध पुतळ्याचे उद्घाटन शनिवारी दि. ११ जुलै रोजी दुपारी ४ वाजता पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते होणार आहे. न्यासाचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी ही माहिती दिली.फ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार सुभाष देशमुख राहणार आहेत. प्रमुख पाहुण्या म्हणून खासदार प्रणिती शिंदे उपस्थित राहणार आहेत. यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, भाजपच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, आमदार राजेंद्र राऊत, माजी आमदार दिलीप माने, जिल्हा परिषद सदस्य सोनाली कडते, दक्षिण सोलापूर पंचायत समितीचे सभापती संदीप टेळे, पंचायत समिती सदस्या प्रियंका आसबे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमास सोलापूरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन स्वातंत्र्य सेनानी डॉ. कृ. भि. अंत्रोळीकर स्मृती न्यासाचे कार्याध्यक्ष मोहन अंत्रोळीकर यांनी केले आहे.

# ‘समाज कल्याण’च्या विस्तार अधिकाऱ्यांचा पदभार गायकवाड, रणदिवेंकडे

### निर्णय प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० जुलै**
जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांच्या बदल्या, पदस्थापना आणि निलंबनाच्या निर्णयांमुळे पुन्हा एकदा प्रशासनातील कार्यपद्धती चर्चेत आली आहे. विस्तार अधिकारी मनोज म्हेत्रे यांच्या निलंबनानंतर समाजकल्याण विभागातील जबाबदाऱ्या विजय रणदिवे आणि शाहूराज गायकवाड या दोन कर्मचाऱ्यांकडे सोपविल्या आहेत.

मनोज म्हेत्रे यांची मूळ नियुक्ती कृषी विभागात असली, तरी दोन वर्षांपासून ते समाजकल्याण विभागातील महत्त्वाची जबाबदारी सांभाळत होते. दरम्यान, करमाळा पंचायत समितीतील विस्तार अधिकारी पदावर त्यांची बदली केली होती. मात्र, वरिष्ठांच्या तोंडी आदेशानुसार ते समाजकल्याण विभागाचे कामही पाहत असल्याची चर्चा होती. याच पार्श्वभूमीवर करमाळा गटविकास अधिकाऱ्यांनी विनापरवानगी गैरहजर राहिल्याचे कारण देत म्हेत्रे यांना निलंबित केले. या कारवाईनंतर त्यांच्या जागी शाहूराज गायकवाड आणि विजय रणदिवे यांच्याकडे विभागातील कामकाजाची जबाबदारी सोपवली आहे.

विशेष म्हणजे, एका विभागात नियुक्ती असताना दुसऱ्या विभागाचे काम पाहणारे अनेक कर्मचारी असल्याचे बोलले जात असतानाही कारवाई केवळ एका अधिकाऱ्यावरच का करण्यात आली, असा प्रश्न कर्मचारी वर्तुळातून विचारला जात आहे. प्रशासनाने अशा प्रकरणांमध्ये एकसमान निकष लागू करावेत आणि निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता ठेवावी, अशी मागणी पुढे येत आहे.

### चेक बाऊन्ससमध्ये ‘धनश्री’च्या कर्जदाराची शिक्षा कायम; तुरुंगात रवानगी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१० जुलै -**
धनश्री पतसंस्थेच्या कर्जदारास चेक बाऊन्स केसमध्ये शिक्षा कायम केली आहे. मंगळवेढा येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी आरोपीची तुरुंगात रवानगी केली आहे.

धनश्री महिला ग्रामीण बिगरशेती पतसंस्था कर्जदारांना कर्ज पुरवठा करते. कर्जदार धोंडीबा शिवाप्पा कुटे यास नियमित कर्ज पुरवठा केला होता. परंतु त्याने कर्जाची परतफेड केली नाही. कर्ज थकीत गेल्यानंतर कर्जाचेपोटी परतफेडीसाठी म्हणून पतसंस्थेस आरोपीने त्याचे बँक खातेचा धनादेश दिला होता. तो वटता बँकेने परत केलेमुळे त्याचेविरुध्द धनश्री पतसंस्थेने मंगळवेढा येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे कोर्टात केस दाखल केलेली होती. तिच्या सुनावणीवेळी कर्जदाराविरुध्द मंगळवेढा येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांनी आरोपीस सदर गुन्ह्याकरीता १ महिना सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली होती. फिर्यादी संस्थेस १,१०,००० /- (रक्कम - एक लाख दहा हजार रुपये) नुकसानभरपाई देणेबाबत आरोपीस आदेशित केले होते, जर आरोपीने २ महिन्याचे आतमध्ये सदर नुकसानभरपाईची रक्कम देणेस कसूर केलेस आरोपीस अतिरिक्त १ महिना सश्रम कारावास ठोठावला होता. त्या निकाला विरोधात कर्जदाराने पतसंस्थेविरोधात पंढरपूर येथील जिल्हा न्यायालयात फौजदारी अपिल दाखल केले होते. अपिलामध्ये बँकेचेवतीने ॲड. एस.एम. हावनाळे यांनी काम पाहिले. पंढरपूर येथील जिल्हा न्यायालयाने सदरचे अपिल दि.१७ जानेवारी २०२६ रोजी नामंजूर केले. आरोपी धोंडीबा कुटे याचेविरोधात कॉन्विक्शन वॉरंट जारी केले होते. सदर न्यायालयीन आदेशानुसार मंगळवेढा येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयासमोर आरोपीस हजर केले असता, त्यांनी आरोपीची तुरुंगात रवानगी केली. यात धनश्री महिला ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेच्या वतीने विश्वनाथ नागणे, सतिश कोंडुभैरी तसेच संस्थेतर्फे ॲड. एस.एम.हावनाळे, ॲड.संगम सुकदेव मोरे यांनी काम पाहिले.

# डीपीसी बैठकीत आज धडाडणार पालकमंत्र्यांची तोफ

### जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांकडून बैठकीची जय्यत तयारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जुलै-**
ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर जिल्हा नियोजन समितीची महत्त्वपूर्ण बैठक शनिवार, दि. ११ जुलै रोजी दुपारी २.०० वाजता नियोजन भवन, सोलापूर येथील जिल्हा नियोजन समिती सभागृहात होत आहे. बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे यांची विविध विषयांवर तोफ धडाडणार आहे.

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव कार्तिकेयन एस. यांनी या बैठकीसंदर्भातील परिपत्रक जारी केले आहे. बैठकीत मागील बैठकीच्या इतिवृत्तांतास व त्यावरील कार्यवाहीच्या अहवालास मान्यता देण्यात येणार आहे. जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना यांचा दि. ३१ मार्च २०२६ अखेरच्या खर्चास मान्यता देण्यात येईल. जिल्हा वार्षिक योजना २०२६-२७ अंतर्गत सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना यांच्या कामांच्या प्रारूप आराखड्यावर चर्चा करून मान्यता दिली जाणार आहे. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळचे विषय बैठकीत मांडण्यात येतील. बैठकीस सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी परिपूर्ण माहितीसह स्वतः उपस्थित राहावे, प्रतिनिधी पाठवू नये, अशा स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिल्या आहेत.

# बार्शीत पहिली नगरपालिका संचलित सीबीएसई इंग्रजी माध्यम शाळा

- आमदार राजेंद्र राऊत यांच्या पाठपुराव्याला यश
- पहिली ते १२ वीपर्यत इंग्रजी माध्यम शाळा २०२६-२७ पासून सुरु

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १० जुलै -**
बार्शी शहराच्या शैक्षणिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. नगरपालिका शिक्षण मंडळ, बार्शी संचलित न.पा. शाळा क्र. २१ येथे इयत्ता १ ली ते १२ वीपर्यत इंग्रजी माध्यमाची (सीबीएसई) स्वयंअर्थसहायित शाळा सुरु होणार आहे. शासनाने त्याला २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून अधिकृत मान्यता दिली आहे. त्यामुळे बार्शीच्या इतिहासात प्रथमच नगरपालिका संचलित सीबीएसई इंग्रजी माध्यम शाळा सुरु होणार आहे.

शाळेला मान्यता मिळावी यासाठी विधान परिषद आमदार राजेंद्र राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश मिळाल्याने बार्शीकरांची अनेक वर्षांची अपेक्षा पूर्ण झाली आहे. निर्णयामुळे गोरगरीब, कष्टकरी, स्वच्छता कामगार, शेतकरी, मजूर तसेच मध्यमवर्गीय कुटुंबांतील विद्यार्थ्यांना मोठा लाभ होणार आहे. महागड्या खासगी सीबीएसई शाळांमध्ये प्रवेश घेणे आर्थिकदृष्ट्या शक्य नसलेल्या विद्यार्थ्यांना आता नगरपालिका संचलित शाळेतच दर्जेदार इंग्रजी माध्यमातील सीबीएसई शिक्षण घेण्याची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे.



बार्शीतील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक शिक्षणासाठी मोठ्या शहरांवर अवलंबून राहण्याची गरज कमी होणार आहे.

आधुनिक शैक्षणिक सुविधा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण स्थानिक पातळीवरच उपलब्ध होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा निर्णय मैलाचा दगड ठरणार असल्याची भावना व्यक्त होत आहे. ऐतिहासिक निर्णयाबद्दल आमदार राजेंद्र राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांचे आभार मानले.

### जनतेच्या हितासाठी कायम कटिबद्ध

बार्शीच्या शिक्षण, पायाभूत सुविधा आणि विकासाशी संबंधित विविध प्रश्नांसाठी यापुढेही शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करणार आहे. जनतेच्या हिताचे निर्णय मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध आहे.

**- आमदार राजेंद्र राऊत**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १४९८

**आतां हदय हें आपुलें । चौफळुनियां भलें ।**
**वरी बैसऊं पाउलें । श्रीगुरुचीं ।।**

संत श्री ज्ञानेश्वर माऊली या ओवीपासून पधंराव्या म्हणजे पुरुषोत्तमयोग या अध्यायाला प्रांरभ करीत आहेत. या अध्यायाचा प्रांरभ करतांना माऊलींनी नेहमी प्रमाणे आपल्या सदगुरुचे स्मरण केले आहे. आपण हे गीताख्य केवळ सदगुरु कृपेनेच मराठी भाषेत आणू शकल्याचे त्यांनी पुन्हा-पुन्हा सांगीतले आहे. माऊली सारखी गुरुभक्तीपर वचने क्वचितच इतरांकडे पाहायला मिळतील. माऊलीचे हृदय किती स्वच्छ आहे, याबद्दल बोलण्याची गरज नाही. तरी पण माऊली सदगुरुबद्दल बोलतांना काय म्हणतात ते पाहू या, आतां हदय हें आपुलें श्र चौफळुनिया भलें श्र वरी बैसऊं पाउलें श्र श्रीगुरुचीं श्रश्र. अर्थात, पंधराव्या अध्यायाला प्रारंभ करण्यापुर्वी, आपले हृदय चांगले स्वच्छ करुन, सदगुरुच्या श्रीचरणांना आपल्या हृदयावर स्थान देऊ व त्यांच्या कृपेने पूढील भाग स्पष्ट करु असे माऊली म्हणतात. आपली सर्व इंद्रिये हीच उमललेली फुले, ऐक्यभावनेच्या ओंजळीत घेऊन ही पुष्पांजली आपल्या श्रीगुरुरायाला अर्पण करण्याची इच्छा माऊली व्यक्त करीत आहेत. हे गीताख्य मी सांगत नाही, तर हे सर्व श्रीगुरुची कृपा आहे, असे म्हणतांना माऊली या



गीताख्याचे सर्व श्रेय आपल्या सदगुरु निवृतीनाथांनाच देत आहेत. श्री निवृतीनाथ हे माऊलीचे थोरले बंधू आहेत. माऊलीकडून थोरल्या बंधूना दयावयाच्या आदराचा धडा आपण शिकला पाहिजे. हा धडा आपण शिकला तर भावा-भावात, हाणा मा-या ,कोर्ट कचे-याची वेळ आपणावर येणार नाही. सदगुरुंच्या चरणसेवेला किती व कसा मान दयायचा हे फक्त ज्ञानदेवांकडून शिकावे. पधंराव्या अध्यायाच्या प्रारंभीच्या अनेक ओव्या माऊलीनी सदगूरु स्तवन म्हणून तयार केल्या आहेत. आपण अज्ञानी असतानांही, सदगुरुंनी आपल्यात ज्ञानाचा प्रकाश भरल्यानेच आपण बोलके झाल्याचे ते म्हणतात. स्वत:वर जेवढा विश्वास आहे, त्यापेक्षाही जास्त विश्वास माउली श्रीगुरुवर ठेवतात. आपल्या सदगुरुची स्तुती करण्याचे थांबविताना माऊली म्हणतात की, माझ्याकडे या पेक्षा जास्त शब्द नाहीत. स्तुतीसाठी शब्दांना मर्यादा पडल्याचे ते मान्य करतात ,पण आपल्या इच्छेप्रमाणे स्तुती मात्र पुर्ण करु शकलो नसल्याची खंतही ते व्यक्त करतात. आपण श्रीगुरुचे वर्णन आता पुरे करतो, कारण अधिक वर्णन करण्याने शुध्द प्रेम मलिन होत असते, असेही माऊली म्हणतात. आपली स्तुती करण्याचे कारण नाही, असे माऊलींना सदगुरु निवृतीनाथ अनेक वेळा सांगतात. आता माझी स्तुती बंद कर, आणि श्रोत्यांना श्रीकृष्णार्जुन संवाद सांग, असे निवृतीनाथ म्हणतात, माऊली या शब्दानाच आशीर्वाद समजून गीताख्य सांगायला सुरुवात करतात. गुरु शिष्याचे असे नाते जर सर्व गुरु-शिष्यात निर्माण झाले तर ज्ञानाची गंगा फार वेगाने वाहू लागेल. चांगल्या प्रकारे व मुक्तपणे ज्ञान देणा-या गुरुची संख्याही आज कमी झाल्याचे पाहायला मिळते. त्याचबरोबर माऊली सारखे नम्र होऊन, सदगुरुला सर्वस्व अर्पण करुन ज्ञान मिळविणारे शिष्य तर पाहायलाच मिळत नाहीत. असो, इतरांकडे पाहाण्यापेक्षा आपण स्वत:कडे पाहाणेच योग्य होईल. आपणाला ज्ञानेवरीच्या रुपाने माऊली हेच सदगुरु मिळाले आहेत. आपण आपले शिष्यत्व चांगल्याप्रकारे पार पाडण्यात कमी पडणार नाही, एवढी खात्री बाळगून वागलो तरी पुरेसे आहे. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शनिवार,**
**दि. ११ जुलै २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - ज्येष्ठ कृ. द्वादशी**
**ऋतु - ग्रीष्म ।**
**नक्षत्र- कृतिकर (११.०३)**
**योग - गंड (२४.०५)**
**करण - कौलव (१५.४६)**

**राहू काल : शनिवार**
**दु. ०९.०० ते १०.३०**
**दिनविशेष :**
**२००१: त्रिपुरा राज्यातील आगरताळा आणि बांगलादेशची राजधानी ढाका यांच्यादरम्यान आंतरराष्ट्रीय बससेवेची सुरुवात झाली. २००६: मुंबईत झालेल्या भीषण लोकल ट्रेन साखळी बॉम्बस्फोटांमध्ये २०९ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला**



## हरिभाई देवकरण महाविद्यालयातील एनसीसी विद्यार्थ्यांची मुंबई पोलिस दलात निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जुलै-**

हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालयातील एन. सी. सी. विद्यार्थी ज्युनिअर अंडर ऑफिसर प्रथमेश पाटील आणि ज्युनिअर अंडर ऑफिसर दत्ता चव्हाण यांची मुंबई पोलीस दलात निवड झाल्याबद्दल एनसीसी विभाग प्रमुख मेजर बी. डी. बनसोडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी मेजर बी. डी. बनसोडे म्हणाले, दरवर्षी दहा ते बारा एन. सी. सी. विद्यार्थी पोलीस दलात, सैन्य दलात भरती होऊन जनतेची, देशाची प्रामाणिकपणे सेवा करत आहेत. या वर्षभरात आर्मी मध्ये आदित्य कोल्हे, संदेश जाधव, प्रतीक खेडेकर, साईराज खांडेकर, आयन सय्यद, यश नलावडे तर महाराष्ट्र पोलीस दलात प्रथमेश पाटील, दत्ता चव्हाण, दत्ता इंगळे कु. वैभवी गवळी यांची निवड झाली आहे. १९७७ साली महाविद्यालयात एनसीसी विभाग सुरू झाला. तेंव्हा पासून असे हजारो विद्यार्थी घडले आहेत. मेजर बनसोडे हे सन २००१ पासून एन. सी. सी. विभागाचे काम पहात आहेत. तेंव्हा पासून आजपर्यंत चारशे ते पाचशे एन. सी. सी. विद्यार्थी आर्मी, नेव्ही, सी आर पी एफ, बी एस एफ, सी आय एस एफ, सी आर पी एफ, रेल्वे पोलीस, महाराष्ट्र पोलीस दल अशा विविध क्षेत्रात कार्यरत आहेत.

शाळा समिती अध्यक्ष सुरेशबाबू मंकणी, प्राचार्या स्मिता कांगुणे, उपप्राचार्य शांतप्पा कुंभार यांनी ही यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# वारकऱ्यांना सर्वोत्तम सुविधा द्या : महापौर कोंड्याल

### श्री संत गजानन महाराज पालखी सोहळ्याच्या तयारीला सोलापुरात वेग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जुलै-**

श्री संत गजानन महाराज (शेगाव) पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर सोलापूर महानगरपालिकेने तयारीला वेग दिला असून, शहरात मुक्काम करणाऱ्या हजारो भाविक व वारकऱ्यांना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश महापौर विनायक कोंड्याल यांनी दिले.



पालखी मार्गावरील स्वच्छता, रस्त्यांची दुरुस्ती, प्रकाश व्यवस्था, पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा, वाहतूक आणि सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात महापौरांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, पोलीस उपायुक्त प्रीतम यावलकर, उपायुक्त सोनाली यादव, सहाय्यक पोलीस आयुक्त सुधीर खिराडकर, नगर अभियंता सारिका आकूलवार, आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सतीश चौगुले, कार्यकारी अभियंता (विद्युत) राजेश परदेशी, नगरसेविका राजेश्री दोडमणी, पालखी सोहळ्याचे स्थानिक प्रतिनिधी सुनील फाळके, सुनील कुलकर्णी उपस्थित होते.

पालखी सोहळ्याच्या स्थानिक प्रतिनिधींनी दरवर्षी महापालिकेकडून मिळणाऱ्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त करत यंदा पाणी गिरणी येथील स्वागतस्थळी अतिरिक्त स्वच्छता कर्मचारी, फिरते स्वच्छता पथक, अधिक प्रकाश व्यवस्था, मुक्कामाच्या ठिकाणी फोकस लाईट, पिण्याच्या पाण्याचे टँकर आणि रुग्णवाहिका उपलब्ध ठेवण्याची मागणी केली. यावेळी महापौरांनी पालखी मार्गाची संपूर्ण स्वच्छता, खड्डे तातडीने बुजविणे, झाडांच्या धोकादायक फांद्यांची छाटणी, अखंड वीजपुरवठा, स्वच्छ पिण्याचे पाणी, मोबाइल स्वच्छतागृहे, अतिरिक्त स्वच्छता कर्मचारी, आरोग्य पथक, रुग्णवाहिका आणि औषधोपचाराची व्यवस्था वेळेत पूर्ण करण्याचे आदेश दिले.

**बैठकीतील प्रमुख निर्देश**
- पालखी मार्गाची विशेष स्वच्छता मोहीम.
- सर्व खड्डे तातडीने बुजविण्याचे आदेश.
- अतिरिक्त प्रकाश व्यवस्था व फोकस लाईट.
- पिण्याच्या पाण्याचे टँकर आणि मोबाइल स्वच्छतागृहे.
- आरोग्य पथक, रुग्णवाहिका व प्राथमिक उपचार केंद्र.
- वारकऱ्यांच्या मुक्कामस्थळी स्वच्छता व सुरक्षा.
- वाहतूक व गर्दी व्यवस्थापनासाठी पोलीस-महापालिका समन्वय.
- नव्या पालखी मार्गावरही सर्व नागरी सुविधा उपलब्ध करण्याचे निर्देश.

## भाजी मार्केट, नाले अन् पालखी मार्गावर आयुक्तांची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जुलै-**

प्रभाग क्रमांक १५ मधील नागरी समस्यांची प्रत्यक्ष पाहणी करत सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी रेल्वे लाईन परिसरातील भाजी मार्केट, नाल्याची स्वच्छता, रामवाडी येथील गजानन महाराज पालखी मार्ग तसेच मनपा शाळा क्रमांक २५ येथे भेट देऊन संबंधित विभागांना कामे पूर्ण करण्याचे आदेश दिले.

नगरसेविका श्रीदेवी जॉन फुलारे यांच्या निवेदनानंतर झालेल्या या पाहणीत भाजी मार्केट परिसरात साचलेला कचरा, दुर्गंधी, अपुरी स्वच्छता व्यवस्था आणि महिला विक्रेत्यांसाठी स्वतंत्र शौचालयाचा अभाव आयुक्तांच्या निदर्शनास आला. मंडईलगतच्या नाल्याच्या संरक्षण भिंतीचे अनेक ठिकाणी नुकसान झाल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही उपस्थित झाला. रामवाडी येथील गजानन महाराज पालखी मार्गावरील जुन्या बंद पोलीस ठाण्याची जीर्ण संरक्षण भिंत पाहून आयुक्तांनी दुरुस्तीचे आदेश दिले. दुरुस्तीला विलंब झाल्यास भिंतीसमोर बॅरिकेड्स उभारून सुरक्षितता सुनिश्चित करण्याच्या सूचनाही दिल्या. भाजी मार्केटमधील महिला विक्रेत्यांसाठी स्वतंत्र शौचालयासह आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सकारात्मक कार्यवाही केली जाईल, असेही त्यांनी सांगितले. या पाहणीवेळी नगरसेवक विनोद भोसले, नागेश खरात, विजय कदम, नगर अभियंता सारिका आकुलवार, विभागीय अधिकारी विजय लोखंडे, सफाई अधीक्षक अनिल चराटे, प्रशासन अधिकारी मल्हारी माने उपस्थित होते.



**आयुक्तांनी घेतली विद्यार्थ्यांची चाचणी**

दरम्यान, आयुक्तांनी मनपा शाळा क्रमांक २५ ला भेट देऊन शैक्षणिक गुणवत्तेचा आढावा घेत विद्यार्थ्यांची छोटेखानी चाचणीही घेतली. शासनाकडून प्राप्त सर्व शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना तातडीने वितरित करावे, तसेच शाळेच्या शेजारील मैदान कायम स्वच्छ ठेवण्याचे आदेश त्यांनी दिले.

## सोलापूर एनटीपीसी प्रमुखपदी मोहन व्ही. यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० जुलै-**

एनटीपीसी सोलापूरच्या प्रकल्प प्रमुख म्हणून मोहन व्ही. यांनी आज, १० जुलै २०२६ रोजी अधिकृतपणे आपला पदभार स्वीकारला आहे. मोहन व्ही. यांनी रायपूर येथील 'रविशंकर विश्वविद्यालय' मधून मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी घेतली आहे. त्यांनी वर्ष १९९० मध्ये 'एक्झिक्युटिव्ह ट्रेनी' म्हणून एनटीपीसी मध्ये आपल्या यशस्वी कारकिर्दीची सुरुवात केली होती. आपल्या सुमारे ३६ वर्षांच्या प्रदीर्घ आणि उत्कृष्ट सेवाकाळात त्यांनी एनटीपीसीच्या बाल्को (कोरबा), तालचेर कनिहा, सीपत, सोलापूर आणि खरगोन यांसारख्या विविध प्रमुख व महत्त्वपूर्ण प्रकल्पांमध्ये आपली भूमिका यशस्वीपणे पार पाडली आहे. आज पदभार स्वीकारल्यानंतर महाव्यवस्थापक (परिचालन व अनुरक्षण) शुभाशिस बंदोपाध्याय, अप्पर महाव्यवस्थापक (मानव संसाधन) कन्हैया दास यांनी मोहन व्ही. यांचे स्वागत केले.

## धूत मेगा साडी महोत्सवाला शनिवारी प्रारंभ

### लग्नसराई, श्रावण व सणोत्सवासाठी ब्रँडेड साड्या खरेदीची संधी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जुलै-**

सण-उत्सव आणि आगामी लग्नसराईच्या पार्श्वभूमीवर महिलांसाठी वाजवी दरात ब्रँडेड साड्या खरेदीची सुवर्णसंधी उपलब्ध करून देणाऱ्या धूत मेगा साडी महोत्सवाचे उद्घाटन शनिवारी दि. ११ जुलै रोजी सकाळी ११ वाजता बाळीवेस येथील धूत साडी सेंटरमध्ये होणार असल्याची माहिती धूत सारिजचे पुरुषोत्तम धूत यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या महोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या पत्नी सायली गोरे आणि खा. डॉ. ज्योती वाघमारे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी फॅमिली कोर्टाच्या न्यायाधीश स्मिता घार्गे-मोहिते, शिवसेना उपजिल्हाप्रमुख उषा गायकवाड, आमदार देवेंद्र कोठे यांच्या पत्नी मोनिका कोठे, महापौर विनायक कोंड्याल यांच्या पत्नी धनश्री कोंड्याल, श्रुती कोठे, भाजपच्या शहर सरचिटणीस सुधा अळळी मोरे, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, भारतीय जैन संघटनेच्या उपाध्यक्षा कांचनमाला संगवे, पुणे महापालिकेच्या माजी नगरसेविका सुनंदा गडाळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सोलापूर शहर, जिल्हा आणि परिसरातील महिला भगिनींनी धूत मेगा साडी महोत्सवाला आवर्जून भेट देऊन सणासुदीच्या खरेदीचा आनंद घ्यावा, असे आवाहन नंदकिशोर, पुरुषोत्तम यांच्यासह धूत परिवाराने केले. या पत्रकार परिषदेला नंदकिशोर धूत, चंदन धूत, अशोक जंगम, आदित्य दायमा, नटवर दायमा आदी उपस्थित होते.

## आर्यनंदी पतसंस्थेतर्फे कर्ज वितरण शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जुलै-**

सहकार सप्ताहाच्या निमित्ताने आर्यनंदी पतसंस्थेच्या वतीने कर्ज वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात पतसंस्थेचे उपाध्यक्ष बाहुबली दुरूगकर, अधिकारी, संचालक, कर्मचारी, सभासद यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली.



या शिबिरामध्ये पात्र सभासदांना पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजेश फडकुले, संचालिका डॉ. शिल्पा फडकुले, संचालक प्रा. निलेश एखंडे, संस्थापक अध्यक्ष वैभव आहेरकर यांच्या हस्ते विविध कर्जांचे फॉर्म वितरण करण्यात आले. सूत्रसंचालन वैभव आहेरकर, आभार प्रा. निलेश एखंडे यांनी मानले.



## निवडणुकीपूर्वी कष्टकरी कामगारांना दिलेल्या शब्दाची पूर्तता

### 'बी-२'चा शतकभराचा प्रश्न सुटताच महापौरांसह भाजप पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा मुख्य चौकात जल्लोष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जुलै-**

सोलापूर शहरातील शतकभर प्रलंबित असलेल्या 'बी-२' सत्ताप्रकाराच्या प्रश्नावर राज्य शासनाने ऐतिहासिक निर्णय जाहीर करताच शहरात भाजप कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. आमदार देवेंद्र कोठे यांच्या जनसंपर्क कार्यालयासमोर महापौर विनायक कोंड्याल, भाजप पदाधिकारी, आजी-माजी नगरसेवक आणि शेकडो कार्यकर्ते एकत्र आले. फटाक्यांची आतषबाजी, पेढे वाटप आणि घोषणाबाजी करत कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला.

महाराष्ट्र विधानसभा नियम ४७ अंतर्गत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानभवनात घोषणा करत सोलापूर नगर भूमापन हद्दीतील ८१३ भोगवटादार वर्ग-२ (लीजहोल्ड) मिळकतींचे भोगवटादार वर्ग-१ (फ्रीहोल्ड) मध्ये रूपांतर करण्याचा निर्णय जाहीर केला. या निर्णयाचा लाभ शहरातील सुमारे नऊ हजार कुटुंबांना आणि ४० ते ५० हजार नागरिकांना होणार आहे.निर्णयाची घोषणा होताच कार्यकर्त्यांनी स्वर्गीय विष्णुपंत कोठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. 'आमदार देवेंद्र कोठे तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. महापौर विनायक कोंड्याल, नगरसेवक विनोद भोसले, नगरसेविका श्रीकांचना यन्नम यांच्यासह अनेक पदाधिकारी या आनंदोत्सवात सहभागी झाले होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्या प्रयत्नांमुळे हा ऐतिहासिक निर्णय झाल्याची भावना नागरिक आणि विविध संघटनांनी व्यक्त केली. शहरातील कामगार चाळी आणि 'बी-२' मिळकतींच्या मालकांसाठी हा निर्णय मोठा दिलासा मानला जात आहे.

**कामगार, सर्वसामान्यांच्या हिताचे समाजकारण : महापौर कोंड्याल**

महापौर विनायक कोंड्याल म्हणाले, हा निर्णय केवळ राजकारण नसून कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे समाजकारण आहे. निवडणुकीपूर्वी कष्टकरी कामगारांना दिलेल्या शब्दाची पूर्तता करत आमदार देवेंद्र दादा कोठे यांनी गेल्या २० महिन्यांत या विषयावर विधानभवनात सातत्याने आवाज उठवला. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात अनेक बैठका घेऊन त्यांनी या जिव्हाळ्याच्या प्रश्नाचा सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. दोन वर्षांपूर्वीपर्यंत येथील कामगारांना अशक्यप्राय वाटणारे हे स्वप्न आमदारांच्या दमदार पाठपुराव्यामुळे अखेर प्रत्यक्षात आले आहे.

## स्टेट बोर्डाच्या खेळाडूंना दिलासा

### अन्य बोर्डातील खेळाडूंना 'एक खेळाडू, एक स्पर्धा' नियम

महाराष्ट्रातील क्रीडा क्षेत्रात गेल्या १३ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या एका महत्त्वाच्या मुद्द्यावर क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने अखेर पडदा टाकला आहे. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून सी.बी.एस.ई., आय.सी.एस.ई., नवोदय, केंद्रीय विद्यालय आणि आय.बी. अशा अन्य बोर्डांच्या खेळाडूंना एकाच क्रीडा प्रकारात दोन वेगवेगळ्या बोर्डांकडून खेळण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. यामुळे महाराष्ट्र स्टेट बोर्डाच्या खेळाडूंना आता समान संधी मिळून खऱ्या अर्थाने न्याय मिळणार आहे. या संदर्भातील अधिकृत आदेश क्रीडा खात्याचे सहसंचालक सुधीर मोरे यांनी २ जुलै २०२६ रोजीच्या पत्राद्वारे जारी केले आहेत.

**काय आहे नवीन नियम?**

नवीन नियमानुसार, जर ''क्ष'' हा खेळाडू सी.बी.एस.ई. किंवा तत्सम बोर्डाच्या शाळेत शिकत असेल आणि त्याने त्या वर्षात बॅडमिंटन या खेळात स्वतःच्या बोर्डाच्या स्पर्धेत भाग घेतला, तर त्याला महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागातर्फे आयोजित शालेय बॅडमिंटन स्पर्धेत खेळता येणार नाही. म्हणजेच, विशिष्ट खेळ प्रकारासाठी खेळाडूंना कोणत्याही एकाच बोर्डाची निवड करावी लागेल. तथापि, तोच खेळाडू दुसऱ्या एखाद्या वेगळ्या खेळ प्रकारात क्रीडा विभागाच्या स्पर्धेत भाग घेऊ इच्छित असल्यास त्याला परवानगी असेल. कारवाईचा इशारा: एकाच क्रीडा प्रकारात दोन्ही ठिकाणी (स्वतःचे बोर्ड आणि क्रीडा विभाग) खेळल्याचे सिद्ध झाल्यास, संबंधित खेळाडू किंवा संघाला चालू वर्षाच्या उर्वरित स्पर्धांसह पुढील संपूर्ण वर्षासाठी प्रतिबंधित (बॅन) करण्यात येईल.

**२०१३ पासून स्टेट बोर्डावर होत होता अन्याय**

राज्यात सध्या सी.बी.एस.ई.च्या १,६४१, सी.आय.एस.ई.च्या २७९ आणि आय.बी. बोर्डाच्या ६२ मान्यताप्राप्त शाळा असून त्यांमध्ये शिकणाऱ्या खेळाडूंची संख्या मोठी आहे. २०१३ मध्ये क्रीडा विभागाने या बोर्डांच्या खेळाडूंना शासकीय क्रीडा स्पर्धांमध्ये खेळण्याची सवलत दिली होती. याचा गैरफायदा घेत अनेक खेळाडू स्वतःच्या बोर्डातून आणि क्रीडा विभागातून अशा दोन्ही ठिकाणाहून राज्य पातळीपर्यंत खेळायचे. अनेकदा अन्य बोर्डाचे खेळाडू जिल्हा किंवा विभाग स्तरावर जिंकल्यानंतरही, पुढील निवड चाचणीला न थांबता थेट आपल्या बोर्डाच्या राष्ट्रीय स्पर्धेला प्राधान्य द्यायचे. यामुळे केवळ महाराष्ट्र स्टेट बोर्डाच्या खेळाडूंचेच नुकसान होत नव्हते, तर राज्याला मिळणारे हक्काचे अव्वल दर्जाचे खेळाडूही मिळत नव्हते.

**राष्ट्रीय स्पर्धेतील ऐनवेळची डोकेदुखी थांबणार**

भारतीय शालेय खेळ महासंघाशी देशपातळीवरील ४४ युनिट्स संलग्न आहेत, ज्यामध्ये २८ राज्यांसह सी.बी.एस.ई. सारख्या ८ शैक्षणिक बोर्डांचा स्वतंत्र युनिट म्हणून समावेश आहे. दोन्ही बाजूने खेळणारे प्रतिभावंत खेळाडू ऐनवेळी राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राऐवजी स्वतःच्या बोर्डाच्या संघातून खेळणे पसंत करायचे. अशा वेळी महाराष्ट्राच्या संघात प्रतीक्षा यादीतील खेळाडूंना समाविष्ट करणे क्रीडा विभागासाठी अत्यंत जिकिरीचे व्हायचे. या नवीन निर्णयामुळे ही ऐनवेळची डोकेदुखी थांबणार आहे.



**स्ट्रेट ड्राईव्ह**
**अजितकुमार संगवे**
**मो.9881133103**



**५% आरक्षण आणि सवलतींचा ओढा**

महाराष्ट्र शासनाने शासकीय व निमशासकीय सेवांमध्ये खेळाडूंसाठी ५% आरक्षण, शिष्यवृत्ती आणि शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांमध्ये शालेय राष्ट्रीय पदकांसाठी गुणांची तरतूद केली आहे. या सवलतींमुळे अन्य बोर्डातील खेळाडूंचा क्रीडा विभागाच्या स्पर्धांकडे मोठा ओढा असतो. परंतु, नवीन नियमामुळे अन्य बोर्डाचे खेळाडू खेळण्यापासून वंचित राहणार नाहीत, तर त्यांना समान संधी तत्त्वावर कोणत्याही एकाच स्पर्धा प्रणालीची निवड करावी लागेल. ज्यांना शासकीय सवलतींचा लाभ घ्यायचा आहे, ते क्रीडा विभागाच्या स्पर्धेची निवड करू शकतील.

**महाराष्ट्राची सुवर्ण हॅट्रिक, स्वतःचाच विक्रम मोडीत काढला**

शालेय राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांच्या पदक तालिकेत महाराष्ट्र गेल्या २० वर्षांपासून अव्वल ३ स्थानांवर कायम आहे. मागील २०२४-२५ च्या ६८व्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राने ५३० पदके जिंकली होती. मात्र, नुकत्याच पार पडलेल्या २०२५-२६ च्या सत्रात महाराष्ट्राने १८७ सुवर्ण, १६९ रौप्य आणि १९० कांस्य अशी एकूण ५४६ पदके जिंकून स्वतःचाच जुना रेकॉर्ड मोडीत हॅट्रिक केली आहे. यामध्ये अन्य बोर्डातील खेळाडूंचेही योगदान राहिले आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# पंढरपूर-लोणंद रेल्वे मार्गाला गती

## खासदार मोहिते-पाटील यांच्या पुढाकाराने शिवामृत येथे रेल्वे अधिकाऱ्यांसोबत बैठक



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १० जुलै-**

अनेक वर्षांपासून प्रलंबित प्रस्तावित पंढरपूर-लोणंद (पंढरपूर-फलटण) रेल्वे मार्गासंदर्भातील विविध प्रश्न, अडचणी, हरकती व नागरिकांच्या मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या पुढाकाराने शिवामृत दूध संघ येथे महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. बैठकीला रेल्वे निर्माण विभाग, पुणेचे उपमुख्य अभियंता मोहित सिंग उपस्थित होते. त्यांनी रेल्वे मार्गाबाबत नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि लोकप्रतिनिधींशी थेट संवाद साधत त्यांच्या सर्व शंकांचे समाधानकारक निरसन केले.

बैठकीदरम्यान प्रस्तावित रेल्वे मार्गाच्या संरेखन , भूसंपादन, शेतकऱ्यांच्या जमिनी, नुकसानभरपाई, रेल्वे क्रॉसिंग, सेवा रस्ते, पूल, स्थानके, पर्यायी मार्ग तसेच प्रकल्पाच्या पुढील टप्प्यांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. रेल्वे मार्गामुळे प्रभावित होणाऱ्या गावांतील नागरिकांनी आपल्या सूचना, हरकती आणि समस्या अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. बैठकीस पंढरपूर, माळशिरस आणि फलटण तालुक्यातील शेतकरी, ग्रामस्थ उपस्थित होते. अनेक वर्षांपासून रेल्वे प्रकल्पाबाबत नागरिकांच्या मनात असलेल्या शंका आणि गैरसमज दूर करण्यासाठी ही बैठक महत्त्वाची ठरली. नागरिकांचे म्हणणे ऐकून घेत संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांना सर्व सूचना व हरकतींचा सकारात्मक विचार करून निर्णय घ्यावेत, अशा सूचना खासदार मोहिते पाटील यांनी दिल्या. बैठकीनंतर अनेक नागरिकांनी प्रथमच रेल्वे प्रशासनाशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाल्याने समाधान व्यक्त केले. दरम्यान, शिवसेना (उबाठा) पक्षाचे नेते संभाजीराजे शिंदे यांनी या बैठकीचे आयोजन केल्याबद्दल खासदार मोहिते-पाटील यांचे आभार मानले.

**नागरिकांच्या हिताचे निर्णय घेण्याची सूचना**

खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी, हरकती अथवा सूचना असल्यास संबंधित ग्राम पंचायतींचे ठराव करून रेल्वे प्रशासनाकडे पाठवावेत, असे आवाहन केले. प्रकल्पामुळे प्रभावित होणाऱ्या प्रत्येक नागरिकाला न्याय मिळाला पाहिजे आणि विकासकामे करताना शेतकऱ्यांच्या हिताला कोणत्याही प्रकारे बाधा पोहोचू नये, अशी भूमिका त्यांनी बैठकीत मांडली.

## बार्शी तालुक्याला पावसाची नितांत गरज; शेतकरी हवालदिल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० जुलै-**

राज्यातील बहुतांश भागात मुसळधार पाऊस सुरु असताना बार्शी तालुक्याकडे मात्र पावसाने अद्यापही पाठ फिरवली आहे. जुलै महिन्याचे दहा दिवस उलटूनही तालुक्यात केवळ २७.५ मिमी सरासरी पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे खरीप हंगामातील पेरणी अद्यापही मोठ्या प्रमाणावर सुरु होऊ शकलेली नाही.

यापूर्वी जूनअखेर बार्शी तालुक्यात सुमारे ८२.५ मिमी पाऊस झाला होता. त्यानंतर जुलैच्या पहिल्या आठ दिवसांत केवळ २७.५ मिमी पाऊस झाल्याने एकूण पर्जन्यमान सुमारे ११० मिमीच्या आसपास पोहोचले आहे. मात्र, पेरणीसाठी आवश्यक सलग आणि दमदार पाऊस अद्याप झालेला नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढत आहे.

बार्शी तालुक्यातील अनेक भागांत रिमझिम किंवा तुरळक सरी पडत आहेत. काही मंडळांमध्ये तुलनेने अधिक पाऊस झाला असला तरी तालुक्याची सरासरी केवळ २७.५ मिमी असल्याने शेतजमिनीत पुरेसा ओलावा निमर्ाण झालेला नाही. त्यामुळे बहुतांश शेतकरी दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. दरम्यान, कोकण, मुंबई, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांत मुसळधार पाऊस सुरु असताना सोलापूर जिल्हा आणि विशेषतः बार्शी तालुका अजूनही सरासरी ५.६ मिमी पावसाची नोंद गुरुवार, दि. ९ जुलैच्या सकाळीपर्यंतच्या अधिकृत पर्जन्यमान अहवालानुसार बार्शी तालुक्यात सरासरी ५.६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे जुलै १ ते ९ या कालावधीतील एकूण पाऊस २७.५ मिमी झाला आहे.

समाधानकारक पावसापासून वंचित आहे. पुढील काही दिवसांत दमदार पाऊस न झाल्यास खरीप हंगामावर त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता कृषी क्षेत्रातून व्यक्त केली जात आहे.

## महत्वाचे...



### एनबी नवले सिंहगड महाविद्यालयात प्लेसमेंट ट्रेनिंगला प्रतिसाद

**सोलापूर, दि. १० जुलै-**

एनबी नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, केगाव येथील ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलच्या वतीने अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी एमएनसी कंपन्यांच्या प्लेसमेंट प्रक्रियेच्या दृष्टीने विशेष प्लेसमेंट ट्रेनिंग प्रोग्रॅम आयोजित करण्यात आला आहे. यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. २९ जून ते १० जुलै या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या प्रशिक्षणात सिव्हिल, कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन तसेच मेकॅनिकल अभियांत्रिकी शाखेतील अंतिम वर्षाचे विद्यार्थी सहभागी झाले आहेत. या प्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना Atitude आणि Soft Skills या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. नवले यांच्या नेतृत्वाखाली तसेच ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा. शशिकांत हिप्परगी यांच्या समन्वयातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.



### साहित्यिकांनी समाजातील दरी कमी करण्याचे कार्य करावे : डॉ. गोरे

**सांगोला, दि. १० जुलै-**

आजच्या काळात साहित्यिकांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजातील दरी कमी करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले पाहिजे. सांगोला शहराची साहित्यिक उंची अधिक उंचावण्यासाठी सर्वच साहित्यिकांनी सातत्याने प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन साहित्यिक डॉ. शरद गोरे यांनी केले. ते सांगोला येथे पलपब प्रकाशन संस्था अहमदाबाद शाखा-कराड, महाराष्ट्र साहित्य परिषद सांगोला, अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद सांगोला महिला आघाडी आणि सांगोला अर्बन बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित काव्य संमेलन व मान्यवरांच्या सन्मान सोहळ्यात बोलत होते. याप्रसंगी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या डॉ. शरद गोरे, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, डॉ. प्रभाकर माळी, साहित्यिक डॉ. कृष्णा इंगोले, डॉ. अविनाश सांगोलेकर, प्रा. धनाजी चव्हाण, डॉ. शीतल घोंगडे यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी डाळिंब फुलांचा शब्दोत्सव या कवी संमेलनात ४० हून अधिक कवींनी आपल्या विविध कविता सादर केली. प्रास्ताविक लीना पाटील, उपस्थितांचे स्वागत प्रा.राजेंद्र ठोंबरे व संकेत ठोंबरे, सूत्रसंचालन डॉ. शीतल घोंगडे यांनी केले. आभार मनिषा ठोंबरे यांनी मानले.



### ठराविक मेडिकल मधूनच औषधे घेण्याची सक्ती करणाऱ्या रुग्णालयांचे परवाने रद्द करा

**सोलापूर, दि. १० जुलै-**

सोलापुरातील नोबेल हॉस्पिटलने बाहेरून औषधे घेण्यास सक्ती करत रुग्णांची आर्थिक लूट केल्याचे प्रकरण समोर आले असून, अन्न व औषध प्रशासनाचे नियम धाब्यावर बसवत निम्म्या किमतीची औषधे दुप्पट दराने विकली जात असल्याचा आरोप संभाजी आरमार संघटनेने केला आहे. रुग्णांच्या नातेवाईकांना औषधांची यादी न देता सांकेतिक भाषेत थेट इन-हाउस मेडिकल स्टोअरला माहिती देऊन औषधे वॉर्डमध्ये पोहोचवली जात आहेत, ज्यामुळे कोणती औषधे वापरली गेली याची माहिती नातेवाईकांना मिळत नाही.रुग्णांच्या हतबलतेचा गैरफायदा घेणाऱ्या अशा रुग्णालयांचे आणि संबंधित फार्मसिस्टचे परवाने कायमस्वरूपी रद्द करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी संभाजी आरमारने जिल्हा प्रशासनाकडे केली आहे. प्रशासनाने कठोर पावले न उचलल्यास रस्त्यावर उतरून तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा संघटनेने दिला असून, अशा लुटीविरोधात नागरिकांनी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांच्या नेतृत्वाखाली नगरसेवक कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, सरचिटणीस गजानन जमदाडे, शहरप्रमुख सागर ढगे, शिक्षक संघटना प्रमुख अजिंक्य पाटील, राजाभाऊ आखाडे, शहर संघटक राज जगताप, अर्जुन शिवसिंगवाले, वाहतूक संघटना प्रमुख अविनाश विटकर, प्रभागप्रमुख मल्लिकार्जुन पोतदार, महिला आघाडी जिल्हा संघटक ॲड. गीता पवार, शहरप्रमुख संध्या हेब्बाळकर, भाग्यश्री काळे, बाई ओहोळ यांच्या शिष्टमंडळाने प्रशासकीय अधिकाऱ्यांची या गंभीर प्रश्नी भेट घेतली.

### बार्शी उपसा सिंचन टप्पा ३ च्या पूर्व आराखड्यासाठी मंगळवारी बैठक

**बार्शी, दि. १० जुलै-**

आमदार राजा राऊत यांनी सिंचन भवन पुणे येथे जलसंपदा विभाग (महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ) कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत धुमाळ यांची भेट घेऊन बार्शी उपसा सिंचन टप्पा ३ याविषयी विस्तृत चर्चा केली. बार्शी उपसा सिंचन टप्पा ३ चा पूर्वआराखडा तयार करण्यासंबंधी चर्चा झाली. मंगळवार दि. १४ जुलै रोजी मंत्रालयात बार्शी उपसा सिंचन योजना टप्पा ३ विषयी चर्चा करण्यासाठी बैठक होणार असून लवकरच योजना अंमलात येणार आहे. यावेळी बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांना बार्शी उपसा सिंचन योजनेला पाणी सोडण्याची आग्रही मागणी आमदार राजा यांनी डॉ. धुमाळ यांच्याकडे केली.

## मैंदर्गी अतिउच्चदाब उपकेंद्राला मंजुरी; ५२ गावांचा वीजप्रश्न लागणार मार्गी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १० जुलै-**

अक्कलकोट तालुक्यातील शेती व ग्रामीण भागातील वीजपुरवठा अधिक सक्षम आणि सुरळीत करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून, महापारेषणच्या नवीन १३२ के.व्ही./ ३३ के.व्ही. क्षमतेच्या मैंदर्गी अतिउच्चदाब उपकेंद्रास तत्त्वतः मंजुरी मिळाली आहे. ही माहिती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली.

या उपकेंद्राच्या उभारणीनंतर ३३ के. व्ही./ ११ के.व्ही. दुधनी, मैंदर्गी, बोरोटी व मिरजगी उपकेंद्रांवरील भार कमी होण्यास मदत होणार असून, शेतीपंपांसह ग्रामीण भागातील वीजपुरवठा अधिक स्थिर व गुणवत्तापूर्ण होणार आहे. विशेषतः वारंवार होणारे कमी दाबाचे प्रश्न, तांत्रिक अडचणी आणि खंडित वीजपुरवठ्याच्या समस्यांमध्ये लक्षणीय घट होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.या प्रकल्पामुळे अक्कलकोट तालुक्यातील एकूण ५२ गावांना थेट लाभ मिळणार असून, शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक असलेला नियमित वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे. परिणामी कृषी उत्पादनवाढीस चालना मिळून ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही बळकटी मिळेल.



अक्कलकोट तालुक्यातील शेतकरी व नागरिकांना दर्जेदार आणि अखंडित वीजपुरवठा मिळावा, यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. मैंदर्गी अतिउच्चदाब उपकेंद्राला मिळालेली मंजुरी हा तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा असून, यामुळे ५२ गावांतील वीजविषयक अडचणी मोठ्या प्रमाणात कमी होतील. शेतकरी आणि ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यास माझे प्राधान्य कायम राहील.
- सचिन कल्याणशेट्टी
आमदार, अक्कलकोट

## मनपा आयुक्तांच्या आदेशाचे उल्लंघन; चार कर्मचाऱ्यांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जुलै-**

सोलापूर महानगरपालिकेच्या अभय योजनेच्या अंमलबजावणीत हलगर्जीपणा केल्याप्रकरणी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी चार कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली आहे. आयुक्तांच्या स्पष्ट आदेशानंतरही संबंधितांनी थकबाकीदारांना नोटिसा न वाटल्याचे आढळून आल्याने प्रत्येकी दोन हजार रुपयांचा आर्थिक दंड आकारण्यात आला आहे.

मनपाने ६ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत अभय योजना राबविली असून, मालमत्ता कर थकबाकीदारांना १०० टक्के दंडमाफीचा लाभ देण्यासाठी सप्टेंबर २०२६ पर्यंत थकबाकी भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्यासाठी संबंधित गाळेधारकांना नोटिसा देण्याचे आदेश ७ जुलै रोजी आयुक्तांनी दिले होते. मात्र, आढावा बैठकीत संबंधित कर्मचाऱ्यांनी एकही नोटीस वाटप न केल्याचे समोर आले. या निष्काळजीपणामुळे महसूल वाढीस अडथळा निर्माण झाल्याचा ठपका ठेवत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियमांनुसार कारवाई करण्यात आली. चार कर्मचाऱ्यांवर प्रत्येकी दोन हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. ही रक्कम जुलै २०२६ च्या वेतनातून ऑगस्ट महिन्यात एकरकमी वसूल करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत. या कारवाईमुळे कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.



## आयुष्मान आरोग्य मंदिराला नागेश फाटे यांची भेट

**पंढरपूर, दि. १० जुलै-**

येथील जुना कराड नाका सुलेमान चाळ परिसरातील आयुष्मान आरोग्य मंदिर नंबर २ येथे राष्ट्रवादी काँग्रेस उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांनी सदिच्छा भेट देऊन आरोग्य केंद्रातील विविध सुविधा व आरोग्य सेवांची पाहणी केली. या भेटीदरम्यान मेडिकल ऑफिसर डॉ. राजश्री धनंजय सालविठ्ठल यांनी आरोग्य केंद्रातील शासना कडून दिल्या जाणाऱ्या सर्व मोफत तपासण्याची माहिती दिली. सदर आरोग्य केंद्रकडे सदर वॉर्ड चे नगरसेवक तथा विद्यमान उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे आणि सर्व आजी माजी नगरसेवकांचे लक्ष असते. यावेळी पुनम वाघमारे, प्रशांत पाटील, दत्तराज गाडे, स्मिता जोशी, सोनाली मोहिते, एस. यू. लिगाडे, औदुंबर नरोटे तसेच ॲड. पांडुरंग चवरे, नवनाथ बचूटे, भास्कर गायकवाड उपस्थित होते.

## बार्शीत उघड्या ११ केव्ही वीज वाहिनीचा शॉक

### सुदैवाने जीव वाचला; भूमिगत केबल असूनही महावितरणचा हलगर्जीपणा नागरिकांच्या जीवावर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० जुलै-**

बार्शी शहरातील देशमुख प्लॉटव्हनकळस प्लॉट परिसरातील धोकादायक ११ केव्ही उच्चदाब वीज वाहिनीमुळे पुन्हा एकदा गंभीर अपघात घडला असून, महावितरणच्या हलगर्जी कारभारामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरु असल्याचा आरोप परिसरातील रहिवाशांनी केला आहे. उघड्या उच्चदाब वीज वाहिनीचा जबरदस्त धक्का बसल्याने दत्तात्रय गडगंजे हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जगदाळे मामा रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात उपचार सुरु आहेत.

माहितीनुसार, माजी सैनिक भारत गव्हाणे यांच्या घरावर टीव्हीचा अँटेना बसविण्याचे काम सुरु असताना दत्तात्रय गडगंजे यांचा संपर्क घरावरुन गेलेल्या उघड्या ११ केव्ही वीज वाहिनीशी आला. विजेचा तीव्र धक्का बसल्याने ते बेशुद्ध झाले आणि त्यांचा गळा, मान व मांडी गंभीर भाजल्या गेल्या. मोठा आवाज झाल्यानंतर परिसरातील नागरिकांनी तातडीने धाव घेत त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. सुदैवाने या दुर्घटनेत त्यांचा जीव थोडक्यात बचावला.

दरम्यान, या घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी महावितरणच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. उपळाई रोड (चैतन्य दुकान) ते अलीपूर रोड (मोहिते पिठाची गिरणी) दरम्यान शासकीय निधीतून ११ केव्ही अंडरग्राउंड केबलचे काम अनेक महिन्यांपूर्वी पूर्ण झाले आहे. मात्र, अद्याप ती कार्यान्वित करण्यात आलेली नसल्याने जुनी ओव्हरहेड लाईन कायम ठेवण्यात आली आहे. परिणामी, वारंवार जीवघेणे अपघात घडत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

या धोकादायक वीज वाहिनीचे खांब खासगी मालकीच्या जागेत असून अनेक घरांवरुन उच्चदाब वाहिनी गेल्याने परिसरातील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे. भविष्यात आणखी मोठी जीवितहानी होण्यापूर्वी अंडरग्राउंड केबल तात्काळ सुरु करुन ओव्हरहेड लाईन हटवावी, तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांनी महावितरणकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## डॉ. मनीषा काटीकर यांची आयएसए राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जुलै-**



ज्येष्ठ न्यूरोअनेस्थेसियोलॉजिस्ट, आणि इंडियन सोसायटी ऑफ अनेस्थेसियोलॉजिस्ट्स मधील सक्रिय नेत्या डॉ. मनीषा डी. काटीकर यांची इंडियन सोसायटी ऑफ अनेस्थेसियोलॉजिस्ट्स राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून २०२६-२७ या कार्यकाळासाठी देशभरातील सदस्यांच्या भरघोस पाठिंब्याने निवड झाली आहे. डॉ. काटीकर या बलवंत इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरोसर्जरी अँड इंटेन्सिव्ह ट्रॉमा केअर, सोलापूर येथे न्यूरोअनेस्थेशिया व न्यूरोक्रिटिकल केअर विभागाच्या प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी ISA मध्ये विविध महत्त्वाच्या पदांवर उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांनी १८० हून अधिक व्याख्याने व वेबिनार घेतले असून प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय ओरेशन्ससाठी त्यांना निमंत्रित वक्त्या म्हणून गौरविण्यात आले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना ISA प्रोफिशियन्सी पुरस्कार (ISACON २०१७, २०१९ व २०२१), रुक्मिणी पंडित पुरस्कार आणि COLS पुरस्कार यांसारख्या प्रतिष्ठित सन्मानांनी गौरविण्यात आले आहे. डॉ. मनीषा काटीकर यांच्या या राष्ट्रीय निवडीमुळे सोलापूर व महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, वैद्यकीय क्षेत्रातील विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## आकर्षक नफ्याचे आमिष दाखवत ६१ लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १० जुलै-**

महिन्याला ५ टक्के परतावा आणि गुंतवलेल्या रकमेवर आकर्षक नफ्याचे आमिष दाखवत अनेक गुंतवणूकदारांची ६१ लाख ३६ हजार ६९० रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी अकलूज पोलिसांनी ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी सोमनाथ साधू खराडे व चंद्रकला सोमनाथ खराडे यांना न्यायालयाने १० दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून, अन्य आरोपींच्या तपासालाही वेग आला आहे.

याबाबत यशवंतनगर येथील रवी तात्यासाहेब शिंदे यांनी अकलूज पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादीनुसार, २१ एप्रिल २०२५ ते २० मार्च २०२६ या कालावधीत आरोपींनी 'लक्ष्मीकृपा अर्बन निधी लिमिटेड' या संस्थेच्या माध्यमातून गुंतवणुकीवर दरमहा ५ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून फिर्यादीसह अनेकांकडून मोठ्या प्रमाणावर रक्कम जमा करून घेतली.

फिर्यादीने ६ लाख ६० हजार रुपये गुंतवले होते. त्यापैकी काही रक्कम परतावा म्हणून मिळाली असली, तरी ३ लाख २४ हजार रुपये परत करण्यात आले नाहीत. तपासादरम्यान इतर गुंतवणूकदारांनाही अशाच प्रकारे फसवण्यात आल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात सोमनाथ साधू खराडे, चंद्रकला सोमनाथ खराडे, आनंदराव हरीबा मगर, मनीषा आनंदराव मगर, संतोष पांडुरंग निकम, सोनाली संतोष निकम, विशाल कुमार पवार, वर्षा विशाल पवार, विलास रामभाऊ लायघे, रेखा विलास लायघे आणि संग्राम शाहाजी गोडसे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अकलूज पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ मधील कलम ३१८(४), ३१६(२), ३१६(५), ३(५) तसेच महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंरक्षण अधिनियम, १९९९ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे. तपासात आरोपींच्या 'लक्ष्मीकृपा अर्बन निधी लिमिटेड', 'लक्ष्मीकृपा ॲग्रीकल्चर' आणि 'लक्ष्मीकृपा कन्सल्टन्सी' या कंपन्यांची माहिती, बँक खात्यांचे व्यवहार आणि संबंधित कागदपत्रांची पडताळणी सुरू असून, आणखी काही गुंतवणूकदार पुढे येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, अकलूज पोलिसांनी आरोपी क्रमांक १, २ आणि १० यांना अटक केली असून, त्यापैकी सोमनाथ खराडे व चंद्रकला खराडे यांना न्यायालयाने १० दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली आहे. या आर्थिक घोटाळ्याचा तपास पोलीस निरीक्षक नीरज उबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.



## महाराष्ट्र विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० जुलै-**

महाराष्ट्र विद्यालय, बार्शीच्या विद्यार्थ्यांनी सन २०२५२६ च्या शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयातील ७९ विद्यार्थी पात्र ठरले असून त्यापैकी १७ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे. तसेच इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत ९६ विद्यार्थी पात्र ठरले असून त्यापैकी २७ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळवली आहे. अशा प्रकारे दोन्ही गटांमध्ये मिळून १७५ विद्यार्थी पात्र ठरले असून ४४ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे. या यशासाठी इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना एस. डब्ल्यू. करंजकर, स्वप्निल पाटील, पी. एस. जाधव, जे. एम. तोगे, व्ही. डी. चव्हाण, ए. आर. जाधव, एस. एस. शेळके आणि व्ही. बी. पवार यांनी मार्गदर्शन केले. तसेच इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना एस. एम. डिसले, एस. एल. देशमुख, ए. व्ही. पवार आणि पी. सी. जुगदार यांचे मार्गदर्शन लाभले. यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष एन. एन. जगदाळे, सचिव तथा शाळा समितीचे अध्यक्ष पी. टी. पाटील, सहसचिव तथा शाळा समितीचे सदस्य ए. पी. देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्या डॉ. मिरा यादव, सदस्य एस. बी. शेळवणे व बी. के. भालके, प्राचार्या के. डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर. बी. सपताळे, पर्यवेक्षिका एन. बी. साठे, पर्यवेक्षक के. जी. मदने यांनी अभिनंदन केले.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शेगाव दुमाला चौक ते जुना दगडी पूल येथे दुकाने उभारण्यास मनाई

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१० जुलै-**

आषाढी यात्रेच्या अनुषंगाने शेगाव दुमाला चौक ते तीन रस्ता, जुना दगडी पूल या ठिकाणी दुकाने उभारण्यास, हातविक्री करण्यास तसेच हॉटेल्स, स्टॉल्स लावण्यास प्रतिबंध केला आहे. याबाबतचे आदेश उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी जारी केले आहेत.

आषाढी एकादशी सोहळ्याच्या कालावधीत लाखो भाविक पंढरपूरला येतात. ते चंद्रभागा नदीपात्रालगतच असणा-या शेगाव दुमाला येथील भक्तीसागर (६५ एकर) येथे वास्तव्यास असतात. त्यामुळे शेगाव दुमाला चौक ते तीन रस्ता या परिसरात भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी असते. तसेच या परिसरात व्यापाऱ्यांकडूनही मोठया प्रमाणात दुकाने, हातविक्रेते, तात्पुरती हॉटेल्स, स्टॉल्स लागतात.

चंद्रभागा नदीपात्रातील दगडी पूल ते तीन रस्त्यावर भाविकांची, वाहनांची मोठया प्रमाणात गर्दी होवून अपघातांची शक्यता वाढते. शेगाव दुमाला ते तीन रस्ता या परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी होवून चेंगराचेंगरी सारखी घडू नये, यासाठी शेगाव दुमाला रस्ता ते तीन रस्ता, जुना दगडी पूल या ठिकाणी दुकाने उभारण्यास, हातविक्री करण्यास तसेच हॉटेल्स, स्टॉल्स लावण्यास मनाई केली आहे.

या आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधितावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.



### महत्त्वाचे...



## प्राथमिक आरोग्य केंद्र उंबरे (पागे) अंतर्गत कंटेनर सर्वेक्षण

**करकंब, दि.१० जुलै -**

प्राथमिक आरोग्य केंद्र उंबरे (पागे) अंतर्गत उपकेंद्र करकंब पालखी मार्ग येथे कंटेनर सर्वेक्षण करण्यात आले. यावेळी दूषित कंटेनर रिकामे करून आरोग्य शिक्षण देण्यात आले. या मोहिमे अंतर्गत पालखी मार्गावरील कंटेनर सर्वेक्षण करण्यात आले. दूषित असलेले पाण्याचे कंटेनर यावेळी रिकामे करण्यात आले. त्यामुळे डेंगू,मलेरिया यासारख्या रोगांचा प्रसार न होण्यास मदत होणार आहे. या साथ रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यास मदत होणार आहे. पिण्यासाठी स्वच्छ पाण्याचा वापर करावा.नियमित रोगप्रतिबंधात्मक साबणांचा वापर करून हात धुवावेत.संसर्गजन्य आजारांपासून दूर राहण्यासाठी कोणत्या प्रकारची काळजी घेण्यात यावी याबद्दलही याप्रसंगी मार्गदर्शन करण्यात आले.आपला परिसर स्वच्छ ठेवण्याचे फायदेही या वेळेला सांगण्यात आले. वारीच्या कालावधीमध्ये नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ नये म्हणून अशा प्रकारच्या तपासण्या व जनजागृती उपक्रम पुढील काही दिवस चालू ठेवण्यात येणार आहेत. यावेळी आरोग्य निरीक्षक एम.आर.जेठे,प्राथमिक आरोग्य केंद्र उंबरे (पागे) येथील सर्व आरोग्य सेवक, आरोग्य सेविका,आशा गटप्रवर्तक, आशाताई उपस्थित होत्या.

## 'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' माहितीपटाचा प्रीमियर शो उत्साहात

**पंढरपूर, दि. १० जुलै-**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि वॉर्नर ब्रदर डिस्कवरी वाहिनी संयुक्तपणे निर्मित 'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' या माहितीपटाचा मुंबईतील आयनॉक्स चित्रपटगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत प्रीमियर शो झाला. प्रीमियर शोसाठी विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रवीण दरेकर, आमदार निरंजन डावखरे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, संचालक डॉ. किशोर गांगुर्डे, गोविंद अहंकारी, उपसंचालक वर्षा आंधळे आदी उपस्थित होते. हा माहितीपट पंढरपूर वारीची प्रत्यक्ष अनुभूती देतो. या चित्रपटातगृहात जणू काही पंढरपूरची वारी प्रत्यक्षात उतरली असल्याचेही अनुभव येत असल्याच्या भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या. 'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' हा २२ मिनिटांचा माहितीपट वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी यांच्या सहकार्याने तयार केला आहे. माहितीपटाचे मराठी, इंग्रजी, हिंदी, तमिळ, तेलगु, बंगाली, कन्नड, मल्याळम या भाषांमध्ये डबिंग करुन त्याचे डिस्कव्हरीच्या विविध उपग्रह वाहिन्यांवरुन प्रसारण होत आहे. त्याचप्रमाणे विविध भाषांमधील माहितीपटाचे प्रसारण डिस्कव्हरी, डिस्कव्हरी एचडी, टीएलसी, टीएलसी एचडी, ॲनिमल प्लॅनेट, ॲनिमल प्लॅनेट एचडी, इन्व्हेस्टिगेशन डिस्कव्हरी (आयडी), डिस्कव्हरी सायन्स, डिस्कव्हरी टर्बो अशा ९ वाहिन्यांवरुन होत आहे.



## करकंबमध्ये नवीन डीपी बसवा; अन्यथा आमरण उपोषणाचा इशारा

**करकंब, दि.१० जुलै -**

करकंबची वाढती लोकसंख्या आणि वाढलेला वीज वापर लक्षात घेता गावठाण भागात तातडीने दोन नवीन विद्युत डीपी बसविण्याची मागणी होत आहे. मुख्यमंत्री व ऊर्जामंत्र्यांना याबाबत निवेदन दिले आहे. मागणी मान्य न झाल्यास १७ जुलै रोजी आमरण उपोषण करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते सचिन शिंदे यांनी दिला आहे. करकंबमधील धाकटी वेस परिसरातील डीपी जळाल्याने वीजपुरवठा वारंवार खंडित होत आहे. नागरिकांसह व्यापाऱ्यांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिसरात कनेक्शन धारकांची संख्या क्षमतेपेक्षा जास्त झाल्याने वीजपुरवठ्यावर ताण वाढला आहे.थोरली वेस, रोजा गल्ली, जिल्हा परिषद उर्दू शाळा परिसर, सोमनाथ मंदिर परिसर तसेच गावठाणाबाहेरील शेती भागात नवीन डीपीची गरज असल्याचेही निवेदनात नमूद केले आहे. या भागातील नागरिकांनी यापूर्वीही महावितरणकडे मागणी केली आहे. काही शेतकरी डीपीसाठी जागा देण्यास तयार आहेत. कमी-जास्त दाबाने येणाऱ्या विजेमुळे घरगुती उपकरणे, संगणक, सीसीटीव्ही कॅमेरे जळून नुकसान झाल्याची तक्रारही केली आहे. गावातील लोखंडी वीज खांबांना संरक्षणात्मक पीव्हीसी पाईप बसविणे आणि नवीन वीज खांब उभारण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

# वारकरी, भाविकांसाठी ४,५०० औषध किट

### ▶▶ आषाढी वारीसाठी आरोग्य यंत्रणेचे नियोजन
### ▶▶ किट वितरणासाठी स्वतंत्र समिती; सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे जबाबदारी

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.१० जुलै-**

आषाढी वारीदरम्यान लाखो वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यात येत आहे. वारकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी जिल्हा आरोग्य विभागाने व्यापक नियोजन केले आहे. यंदा ४५०० औषध किटचे वितरण करण्यात येणार आहे. वारी मार्गावर त्याच्या वितरणासाठी स्वतंत्र समितीची स्थापना केली आहे. तिच्या कामकाजाची संपूर्ण जबाबदारी सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे सोपवल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ सतीश कोपूरवाड यांनी दिली.

वारीदरम्यान वारकऱ्यांना तातडीची आरोग्य सेवा देण्यासाठी प्रत्येक वैद्यकीय पथकाला औषध किट पुरवणार आहे. किटमध्ये ताप, अंगदुखी, सर्दी, खोकला, जुलाब, उलट्या, निर्जलीकरण, ॲलर्जी, जखमा तसेच इतर सामान्य आजारांवरील औषधांसह प्राथमिक उपचारासाठी लागणारे साहित्य उपलब्ध असेल. परिणामी किरकोळ आजारांवर त्वरित उपचार होतील. वारकऱ्यांना मोठ्या आरोग्य केंद्रात जाण्याची आवश्यकता कमी होईल.

औषध किटचे वितरण पारदर्शक आणि नियोजनबद्ध होण्यासाठी समिती संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवणार आहे. कोणत्या आरोग्य पथकाला किती किट द्यायचे, कोणत्या ठिकाणी अतिरिक्त साठा ठेवायचा आणि गरजेनुसार तातडीने पुरवठा कसा करायचा, याचे नियोजन समितीकडून केले आहे. वारी मार्गावरील प्रत्येक आरोग्य केंद्रात औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध राहील, याची दक्षताही घेतली आहे. याशिवाय, जिल्हा आरोग्य विभागाने जीवनरक्षक औषधे, इंजेक्शन्स, ओआरएस पावडर, आयव्ही फ्लुईड्स, ऑक्सिजन, सलाईन, बालकांसाठी आवश्यक सिरप तसेच विविध संसर्गजन्य आजारांवरील औषधांचा मोठ्या प्रमाणात साठा उपलब्ध केला आहे.



एचबीएसएजी, व्हीडीआरएल, सर्पदंश निदान किट यांसारख्या आवश्यक निदान किटही आरोग्य पथकांना दिल्या आहेत.

वारकऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेसाठी डॉक्टर, परिचारिका, औषधनिर्माण अधिकारी, आरोग्य कर्मचारी आणि आपत्कालीन वैद्यकीय पथके २४ तास सेवेत राहणार आहेत. यांसह उष्माघात, हृदयविकाराचा झटका, ॲनाफिलॅक्सिस, सर्पदंश किंवा इतर गंभीर आपत्कालीन परिस्थितीवर तातडीने उपचारांची विशेष व्यवस्था केली आहे.



### वारी मार्गावरील आरोग्य सेवा होईल सक्षम

वारकऱ्यांना सुरक्षित, निरोगी आणि दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी जिल्हा आरोग्य विभागाने केलेले हे नियोजन महत्त्वपूर्ण मानले जात आहे. विशेषतः ४५०० औषध किटचे नियोजन, त्यासाठी स्वतंत्र समितीची स्थापना आणि सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे जबाबदारी यामुळे वारी मार्गावरील आरोग्य सेवा अधिक सक्षम आणि परिणामकारक होईल.

**- डॉ सतीश कोपूरवाड, जिल्हा आरोग्य अधिकारी.**

## व्हीआयपी दर्शन दिल्यास फौजदारी; जिल्हाधिकाऱ्यांचे कडक आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१० जुलै -**

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. भाविकांना सुलभ व सुरळीत दर्शन मिळावे, यासाठी १५ जुलैपासून व्हीआयपी दर्शन व्यवस्था पूर्णपणे बंद केली आहे. आदेशाचे उल्लंघन करून कोणालाही व्हीआयपी दर्शन घडवुन आणल्यास संबंधित व्यक्तीवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे आदेश जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन यांनी जारी केले आहेत. त्यामुळे व्हीआयपी दर्शनाच्या नावाखाली गैरप्रकार करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात काही दलाल धनाढ्य भाविकांकडून पैसे घेऊन त्यांना व्हीआयपी दर्शन घडवून आणत असल्याच्या तक्रारी सातत्याने येत आहेत. दर्शन रांगेत उभ्या असलेल्या भाविकांना त्यामुळे तासनतास रांगेत थांबावे लागते. या बरोबरच दर्शनरांग खोळंबल्यामुळे रांगेतील वृध्द, महिला तसेच लहान मुलांचे अतोनात हाल होतात. आषाढी यात्रेमध्ये होणारी भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीनेही दर्शन व्यवस्थेचे काटेकोर नियोजन केले आहे. मात्र तरी देखील काही दलाल मंडळींकडून वशिल्याचे दर्शन, व्हीआयपी दर्शन घडविले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशा व्हीआयपी दर्शनाला यात्रेच्या काळात चाप बसावी यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश जारी केलेले आहेत.

कोणत्याही भाविकाने आमदार, खासदार, मंत्री किंवा इतर लोकप्रतिनिधींच्या शिफारसपत्रासह येऊन ही त्याला व्हीआयपी दर्शन देऊ नये, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. दलाल किंवा इतर कोणतीही व्यक्ती नियमबाह्य पद्धतीने व्हीआयपी दर्शनाची व्यवस्था करताना आढळल्यास संबंधितांवर तातडीने फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचेही जिल्हाधिकाऱ्यांनी आदेशात नमूद केले आहे.

### भरारी पथके नियुक्त करावीत

व्हीआयपी दर्शनावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी मंदिर समितीने विशेष भरारी पथके नियुक्त करावीत, तसेच मंदिर परिसरातील सीसीटीव्ही यंत्रणेद्वारे सतत देखरेख ठेवावी, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.



## पहिल्या रिंगण सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात

### सदाशिवनगरच्या सरपंच राणी मोहिते यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. १० जुलै -**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील पहिले गोल रिंगण पुरंदावडे ता. माळशिरस या ठिकाणी २० जुलै रोजी होत आहे. सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात असल्याची माहिती सरपंच राणी मोहिते यांनी दिली.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा १९ जुलै रोजी सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करीत आहे. या पालखी सोहळ्यातील पहिले गोल रिंगण पुरंदावडे ता. माळशिरस या ठिकाणी होत आहे. मैदानावरील काटेरी झुडपे काढण्यात आली आहेत. मैदानाचे मुरमीकरण करण्याचे काम सुरू आहे. रिंगण आखणी करण्यात आली आहे. स्वागत कमान उभारण्यात येणार आहे. तसेच तसेच पुरंदावडे गावातील सर्व रस्ते स्वच्छ करून काटेरी झुडपे काढली आहेत. गटारी स्वच्छ केल्या आहेत. औषध फवारणी करण्यात येणार आहे. सोहळ्याच्या तयारीसाठी सरपंच राणी मोहिते, उपसरपंच देविदास ढोपे, ग्रामसेवक सचिन बनकर, पोपट गरगडे, विठ्ठल अर्जुन, संतोष शिंदे, प्रकाश कुंभार, हरी राऊत, संतोष ढगे, ओम ओव्हाळ, महादेव बोराटे, चव्हाण, ज्ञानदेव पालवे, विजयसिंह पालवे आदी परिश्रम घेत आहेत

### ओव्हर ब्रीजमुळे रिंगण सोहळा पाहणे सुलभ

रिंगण सोहळ्यासाठी सदाशिवनगर ग्रामपंचायतच्या वतीने मैदान तयार केले आहे. रिंगण ठिकाणी पालखी मार्गाचा ओव्हर ब्रिज आहे. परिणामी वारकरी व भाविकांना नेत्रदीपक रिंगण सोहळा पाहणे सुलभ होणार आहे.

## भाविकांच्या सुरक्षेसाठी सीपीआर, प्रथमोपचार प्रशिक्षण शिबीर



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जुलै-**

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांना अचानक येणाऱ्या आरोग्य समस्यांवर उपायांसाठी पंचायत समिती, माळशिरस येथे एकदिवसीय प्रशिक्षण शिबिर पार पडले.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी सतीश कोपूरवाड तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली व बी. व्ही. जी. इंडिया लिमिटेड १०८ एमएएमएस यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन केले होते.

आषाढी यात्रा काळात पाण्यात पडणे/बुडणे, शारीरिक थकवा, फिट येणे, रक्तदाबातील चढ-उतार, रक्तातील साखरेचे असंतुलन, दम्याचा झटका यांसारख्या प्रसंगांमुळे जीवितहानी होण्याचा धोका वाढतो. अशा आपत्कालीन परिस्थितीत तातडीने व शास्त्रोक्त पद्धतीने हृदय-फुफ्फुस पुनरुज्जीवन (सीपीआर) व प्रथमोपचार दिल्यास अनेकांचे प्राण वाचवणे शक्य होते. याच उद्देशाने या शिबिराचे आयोजन केले होते. शिबिरात माळशिरस तालुक्यातील आशा स्वयंसेविका, आरोग्य सेवक, सीएचओ, कर्मचारी, स्वयंसेवक तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांना सीपीआर व प्रथमोपचाराचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले.

योग्य वेळी सीपीआर हीच जीव वाचविण्याची गुरुकिल्ली भाविकांच्या गर्दीत पाण्यात पडण्याच्या घटना घडल्यास किंवा कोणाला अचानक त्रास झाल्यास फक्त विलंब न करता तांत्रिकदृष्ट्या योग्य सीपीआर केल्यास मेंदूला ऑक्सिजन पुरवठा टिकून राहतो आणि जीवितहानी टाळता येते. म्हणून प्रशिक्षणाबरोबरच दैनंदिन सराव व उजळणी आवश्यक असल्याचे सांगण्यात आले.

### मागील अनुभवातून अधिक सक्षम बचावकार्य

गेल्या चार वर्षांत सीपीआरच्या माध्यमातून आपत्ती स्वयंसेवकांनी ३० हून अधिक वारकरी भाविकांचे प्राण वाचविण्यात यश मिळवले आहे. या यशाच्या पार्श्वभूमीवर आषाढी यात्रेतील बचावकार्य आणखी प्रभावी, तांत्रिकदृष्ट्या सक्षम व समन्वयपूर्ण करण्यासाठी प्रशिक्षण देण्यात आले.

### सीपीआर ही संजीवनी

सीपीआर ही संजीवनी असून, योग्य वेळी शास्त्रोक्त पद्धतीने दिल्यास व्यक्तीचा जीव वाचवता येतो. त्यासाठी नियमित सराव व प्रशिक्षण आवश्यक आहे.आषाढी यात्रेदरम्यान जीवित संरक्षणासाठी सज्ज राहणे गरजेचे आहे.

**- दत्तात्रय मगर, सभापती, माळशिरस पंचायत समिती.**

## आषाढी वारीच्या तोंडावर गुन्हेगार जेरबंद

### तीन आरोपींकडून ९ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर ,दि. १० जुलै -**

येथील शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेने आषाढी वारीच्या तोंडावर गंभीर गुन्ह्यातील तीन आरोपींना अटक केली आहे.

शहर पोलिस ठाण्यात दाखल गुन्हयातील फिर्यादी शोभा निलंगे (रा. शिक्षक कॉलनी, माळशिरस) या १७ एप्रिल रोजी माळशिरस ते पंढरपूर बसने प्रवास करत असताना २८ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र असा तीन लाख पंचेचाळीस हजार रुपयांचा ऐवज पंढरपूर बस स्थानकातुन चोरट्याने लंपास केला होता. याप्रकरणी दोन आरोपी प्रिया काळे (वय ३०, रा राजापूर ता. मंगळवेढा), संदीप मोरे (वय २६, रा. गरिबी हटाव झोपडपट्टी नंबर २, विजापूर रोड सोलापूर) यांच्याकडून मुद्देमाल हस्तगत केला.

दुसऱ्या गुन्ह्यात मुकुंद चव्हाण (रा सुस्ते ता.पंढरपूर) यांचे ३ मे रोजी यांचा मावस भाऊ वैभव जाधव यांचे इसबावीतील लग्न समारंभात नवरी चे २०.७८९ ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र, ५.९३० ग्रॅमचे सोन्याचे मिनी गंठण, ९.८०० ग्रॅमचे सोन्याचे चोकर्स असे एकूण ३६.४९९ ग्रॅम सोन्याचे दागिने किंमत ५ लाख ४0हजार रुपयांचा ऐवज चोरीस गेला होता. याप्रकरणीही पंढरपूर शहर व इतर गावांतील ६५ ते ७० सीसीटीव्ही फुटेजची पाहणी तसेच सीडीआरएसडीआर व मोबाईल टॉवरचे तांत्रिक विश्लेषण करून पहिल्या गुन्ह्यातील आरोपी संदीप मोरेकडून दागिने हस्तगत केले आहेत.

तिसऱ्या गुन्ह्यात फिर्यादी




स्वाती डुकरे (रा,आंबी ता. राहुरी जि. अहिल्यानगर) यांचे २७ जून रोजी पंढरपूर बसस्थानकावर ३ ग्रॅचे सोन्याचे मिनी मंगळसूत्र चोरले होते. तपासादरम्यान चांदणी भोसले (वय २०, रा माळवाडी, जिल्हा अहिल्यानगर) हिच्याकडून मुद्देमाल हस्तगत केला आहे. ३ गुन्ह्यात एकूण ६७.४०० ग्रॅम सोन्याचे दागिने किंमत ९ लाख ३० हजार रुपये हस्तगत केले.

ही कामगिरी जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक विजय कबाडे, उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग प्रशांत डगळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पंढरपूर शहर पोलीस ठाणे टी. वाय. मुजावर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक नितीन जगताप, राजेश गोसावी, शरद कदम, सिरमा गोडसे, उबाळे, सचिन हेंबाडे, पाटील, साहिल तांबोळी, कृष्णा पकाले, शहाजी मंडले, नवले, बजरंग बिचुकले, पोकों हर्षद ठाकर, लक्ष्मण वाघमोडे यांनी केली.